# The Sherlock Holmes

# शेरलॉक होम्स



वृषाली जोशी

# शेरलॉक होम्स

मूळ इंग्लीश लेखक – ऑर्थर कॉनन डॉयल

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

# शेरलॉक होम्स

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

**म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट**

**१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा**

**१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.**

**१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.**

**असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.**

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# शेरलॉक होम्स

## लेखक : ऑर्थर कॉनन डॉयल

अनुवादक : वृषाली जोशी
चलभाष : ९९२१७४६२४५
इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ९ डिसेंबर २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# शेरलॉक होम्सविषयी



ब्रिटीश लेखक सर आर्थर कॉनन डॉयल, यांच्या सिद्धहस्त लेखणीने निर्माण केलेले, शेरलॉक होम्स हे खासगी गुप्तहेराचे कपोलकल्पित पात्र आहे. निरीक्षणातील अचूकता, गुन्हेगारी शास्त्रातील जाणकारी व तर्कशास्त्रावरील हुकमत, ही त्याची गुन्हा अन्वेषणातील बलस्थाने आहेत. शेरलॉक होम्स हा, सतत तेवीस वर्षे गुप्तहेराचे काम करतो आहे. सतरा वर्षे त्याचा मदतनीस, डॉक्टर जॉन वॉटसन हा त्याच्या बरोबर काम करत असून, वॉटसनच्या लग्नापूर्वी व बायको वारल्यावर, तो आणि शेरलॉक हे दोघेही, २२१, ब, बेकर रस्ता येथे, मिसेस हडसन या मालकीणबाईंकडील सदनिकेत रहात असल्याचे दाखवले आहे. बहुतेक सगळ्या गोष्टी वॉटसनच्या तोंडून कथन केल्या गेल्या आहेत.

A Study In The Scarlet या आर्थर कॉनन डॉयल यांच्या पहिल्या पुस्तकातून हे पात्र उदयास आले व दिवसेदिवस त्याची लोकप्रियता वाढत गेली. काहीजण तर हे कल्पित पात्र नसून खराच माणूस असल्याचे समजू लागले व तो २२१, ब, बेकर रस्ता, येथे खरोखरच रहातो, असे मानू लागले. रेडिओ व दूरदर्शनवरील नाटके, सिनेमे, शिवाय व्हिडीओ गेम्स, अशी सर्व ठिकाणे; सुमारे शंभर वर्षे, शेरलॉक होम्सने गाजवून सोडली. लंडनमध्ये शेरलॉक होम्स वस्तुसंग्रहालय आहे. सर आर्थर कॉनन डॉयल याच्या जन्मगावी, म्हणजे एडिंबरो येथील पिकार्डो येथे शेरलॉक होम्सचा पुतळाही आहे.

पहिला रहस्यकथा लेखक ॲलन पो याच्या गुप्तहेराची थोडीशी छाप, शेरलॉक होम्समध्ये भासत असली तरी, जोसेफ बेल नावाचा सर्जन, फ्रान्सिस टॅन्की स्मिथ हा पोलीस व सर हेन्री लिटील जॉन हा वैद्यकीय वकील; या खऱ्याखुऱ्या लोकांची छटाही, शेरलॉक या पात्रात कॉननने रंगवलेली दिसते. मॅक्समिलन हेलर हे फ्रेंच लेखक हेन्री कॉव्हेन निर्मित पात्रही शेरलॉक होम्स रंगवण्यासाठी त्याच्याकडून वापरले गेल्यासारखे वाटते. तरीही शेरलॉक होम्स हे अत्यंत गाजलेले, एकमेवाद्वितीय व्यक्तीचित्र असल्याचे मान्य करावेच लागेल.

प्रस्तावना

पानागणिक उत्सुकता वाढवणाऱ्या रहस्यकथा वाचायला कोणाला आवडत नाहीत? त्याच कारणने मीदेखील त्या वाचत गेले व मराठी लोकांसाठी त्या अनुवादित कराव्या, असे वाटले. यास्तव हा सहा कथांचा संग्रह!

डॉ. वृषाली जोशी

अर्पणपत्रिका

रहस्ये उकलणाऱ्या शेरलॉक होम्सच्या चातुर्यास

कथानुक्रम पृष्ठ क्र.


| | |
|---|---|
| जोसची गोष्ट | १० |
| लाल वर्तुळांची दहशत | २९ |
| शॉसकोंबचा सर रॉबर्ट | ५३ |
| लेडी फ्रान्सिस गायब | ७५ |
| सिंहाच्या आयाळीचे रहस्य | १०२ |
| मार्झारीन हिरा | १२४ |

# जोसची गोष्ट



त्या दिवशी सकाळी शेरलॉक होम्स, एखाद्या तत्वज्ञाच्या मनस्थितीत होता. त्याच्या दक्ष व्यावहारिक स्वभावापेक्षा वेगळा, असा तो कधीकधी असे.

“तू त्याला पाहिलेस का ?“

“कोण? तो आता बाहेर गेलेला माणूस का?”

“अर्थात“

“हो. तो मला दरवाजात भेटला.”

“तुला तो कसा वाटला?“

“मला तो दयनीय व हताश वाटला.“

“बरोबर, वॉटसन. दयनीय व हताश ! पण सारे आयुष्य तसेच तर असते, नाही का? त्याची कथा हा साऱ्या आयुष्याचाचीच कहाणी आहे झाले! आपण, आयुष्य आपल्या पकडीत घ्यायला बघतो. आणि बहुतेक वेळा शेवटी आपल्या हातात काय राहते तर एक सावली — किवा त्याहीपेक्षा वाईट — दुखः.”

“तो तुझा अशील आहे का?“

“अं – मी तसे म्हणू शकतो. स्कॉटलंड यार्ड पोलिसांकडून, मला त्याची केस मिळाली आहे. जसे डॉक्टर त्यांच्या बऱ्या न होणाऱ्या रुग्णाला, कधीकधी भोंदू वैद्याकडे पाठवितात व म्हणतात की याच्या बाबतीत अजून काहीही करणे मला शक्य नाही.“

“काय केस आहे?“

होम्सने टेबलाखालून एक कार्ड काढले. “जोस अंबरली. तो म्हणतो, की तो ब्रिकफॉल अंबरली नावाच्या कलात्मक वस्तू बनविण्यासाठी लागणारा माल उत्पादित करणाऱ्या कंपनीमध्ये, कनिष्ठ भागीदार होता. रंगांच्या डब्यांवर तुला ते नाव दिसेल. वयाच्या एकसष्ठीला तो निवृत्त झाला. लेविशामला घर घेतले व धंद्याचा व्याप कमी करून घरीच थोडेफार काम चालू ठेवले. तसे त्याचे भविष्य सुरक्षित दिसत होते“

“हो खरेच आहे.“

एका पाकिटाच्या मागे खरडलेले काहीतरी, तो वाचू लागला. १८९६ मध्ये निवृत्त झाला. १८९७ च्या सुरवातीला, त्याने त्याच्यापेक्षा वीस वर्षाने लहान असलेल्या बाईशी लग्न केले. फोटो जर फसवत नसेल, तर ती दिसायला चांगली होती.

धंद्यातले कसब, बायको व रिकामा वेळ — त्याचे आयुष्य सुकर वाटत होते. तरीही दोन वर्षात तो, तू पाहिल्याप्रमाणे झाला."

"पण काय झाले? "

"जुनीच गोष्ट, वॉटसन. लबाड मित्र व एकनिष्ठ नसलेली बायको ! असे दिसते आहे की अंबरलीला आयुष्यात एकच छंद होता व तो म्हणजे बुद्धिबळ ! लेविशामपासून जवळच एक तरूण डॉक्टर रहायचा व त्यालाही बुद्धिबळ खेळायचा नाद होता. त्याचे नाव डॉ. रे अर्नेस्ट होते. तो नेहमी घरी यायचा. त्याची व मिसेस अंबरलीची घसट वाढणे साहजिकच होते. आणि हे कबूल केलेच पाहिजे, की आपल्या दुर्दैवी अशीलाच्या अंगी बायकांना आकर्षित करण्याचे गुण नव्हते. गेल्या आठवड्यात त्याची अविश्वासू बायको आपल्या प्रियकरासह कोठेतरी गायब झाली. आणि सांगायची गोष्ट म्हणजे, त्याच्या बायकोने, जाताना त्याची आयुष्यभराची कमाई असलेले कागदपत्र व पैसे पळवून नेले. ती बाई आपल्याला सापडेल का ? पैसे परत मिळतील का? उघड दिसणारे प्रश्न. पण जोस अंबरलीसाठी ते महत्वाचे आहेत."

"मग तू आता काय करणार ?"

"माझ्या प्रिय मित्रा, आता तू काय करणार हा प्रश्न आहे. मी एका दुसऱ्या केसमध्ये गळयापर्यंत बुडालो आहे. मला लेविशामला जायला खरच वेळ नाही. तिथे जाणे महत्वाचे आहे. तो म्हातारा मी यावे, म्हणून आग्रह करत होता. पण मी त्याला माझी अडचण सांगितली. तेव्हा तो तुला भेटायला तयार झाला आहे."

"ठीक आहे. मला गुन्ह्याचे अन्वेषण कितपत जमेल माहित नाही. पण मी जाईन" मी म्हणालो. तर अशा तऱ्हेने उन्ह्याळयातील त्या दुपारी, मी लेविशामला जायला निघालो. मी असे स्वप्न बघत होतो की, आठवड्याच्या आत मी हे रहस्य शोधून काढीन व इंग्लंडमध्ये प्रसिद्ध होईन.

मी बेकर रस्त्यावर परत येऊन माझ्या कामाचा अहवाल देईपर्यंत, संध्याकाळ उलटून गेली होती. होम्स मलूलपणे त्याच्या आरामखुर्चीत पहुडला होता व पाईपमधून धुराची वलये सोडीत होता. त्याच्या पापण्या जडावल्या होत्या. माझ्या कथनात काही प्रश्नार्थक आल्यास, तो वर बघत होता.

मी सांगत होतो, "जोस अंबरलीच्या घराचे नाव हॅवन, सुरक्षित निवारा, असे होते. सिगरेट ओढत रस्त्यात फिरणाऱ्या एका माणसाला विचारले नसते तर, मला ते सापडलेच नसते. त्या उंच, मिशाळ, काळ्या माणसाचा उल्लेख मी मुद्दाम करत आहे. त्याने माझ्याकडे एक चौकस नजर टाकल्याचे, जरा वेळाने माझ्या लक्षात आले.

मी गेटमधून आत शिरतो आहे तोच, मला मिस्टर अंबरली बाहेर येताना दिसले. सकाळी मी त्यांना ओझरते पहिले तेव्हा मला ते थोडे विचित्र वाटले होतेच. पण आता पूर्ण उजेडात बघून ते मला फारच विचित्र वाटले."

"मी अर्थात त्याचा अभ्यास केलेला आहे, पण तुझे मत ऐकण्यात मला रस आहे" होम्स म्हणाला.

"काळजीने अक्षरशः वाकलेला, असा तो माणूस मला वाटला. पाठीवर ओझे असल्यासारखी, त्याची पाठ वाकली होती. तरीही तो काही अशक्त वाटत नव्हता. त्याची शरीरयष्टी चांगली दणकट होती. मात्र त्याचे पाय — काहीतरी खटकत होते.

"डावा बूट थोडा चुण्या पडलेला व उजवा सरळ."

"माझ्या नाही लक्षात आले."

"नाही. तुझ्या नसेल लक्षात आले, पण त्याचा कृत्रिम पाय माझ्या नजरेत खुपला. बर, पुढे?"

“त्याच्या टोपीखाली दडलेल्या काळया पांढऱ्या कुरळया बटा, सुरकुतलेला चेहरा व हातपाय, आणि काहीतरी सांगण्यासाठी उत्सुक असलेला चेहरा बघून मी दचकलोच.“

“छान वॉटसन, तो काय म्हणाला?“

“त्याने त्याच्या दुःखाची कहाणी, भरभरून सांगायला सुरवात केली. आम्ही बरोबर चालत राहिलो व मी आसपासचा परिसर निरखून घेतला. इतकी गबाळी जागा, मी आजपर्यंत पहिली नव्हती. बागेत झाडेझुडुपे वेडीवाकडी वाढली होती. सर्वत्र कचरा साठला होता. काहीच कलात्मकता दिसत नव्हती. कोणतीही व्यवस्थित गृहिणी अशी दुरावस्था, कशी काय सहन करत असेल कोण जाणे ? घर आतूनही अगदी टोकाचे गचाळ दिसत होते. बिचाऱ्या माणसाला ते कळत होते व तो ते आवरण्याचा प्रयत्न करत होता. एक हिरव्या रंगाचा मोठा डबा, हॉलच्या मध्यभागी पडला होता व त्याच्या डाव्या हातात रंगवायचा ब्रश होता. तो लाकडाला रंग देत होता. त्याने मला आतल्या अंधाऱ्या खोलीमध्ये नेले व आम्ही बराच वेळ बोललो. तू स्वतः न आल्याने, तो थोडा नाराज झाला होता. ‘शेरलॉक होम्ससारख्या प्रसिद्ध गुप्तहेराचे पूर्ण लक्ष गरीब बिचाऱ्या मला मिळेल, अशी अपेक्षा मी कशी काय करू शकत होतो, विशेषतः माझे एवढे आर्थिक नुकसान झाल्यावर?’ तो म्हणत होता.”

मी त्याला समजावून सांगितले की, पैशाचा काही प्रश्न नाही. “असे कसे? पण त्याने निव्वळ पैशाचा विचार करायला नको होता. त्याच्या बाबतीत गुह्याचे अन्वेषण ही कला आहे व गुन्ह्याचा तपास करताना त्याला काही अभ्यासायलादेखील मिळाले असते. आणि मनुष्यस्वभाव सुद्धा. मी माझ्या बायकोची एखादी तरी विनंती कधी अमान्य केली होती का? पण उपकाराची फेड अपकाराने करायचा मानवी स्वभाव बरका हा, डॉ. वॉटसन ! एखादी बाई इतकी बिघडू शकते? आणि तो तरूण

मनुष्य? तो तर माझा मुलगा शोभला असता. तो माझ्या घरी नेहमी येत जात असे. आणि तरीही ते माझ्याशी कसे वागले बघा. वॉटसन, हे जग फार भयंकर आहे. “

“ही त्याची रडकथा, एक तासाहून अधिक वेळ चालली होती. त्याला कोणत्याही गुन्ह्याचा संशय असल्याचे वाटत नव्हते. घरात नवराबायको दोघेच राहत असत. दररोज घरकाम करायला येणारी व संध्याकाळी सहा वाजता परत जाणारी बाई होती. त्या विशिष्ट दिवशी संध्याकाळी, बायकोला खूष करायला म्हणून अंबरलीने, हेमार्केट सिनेमागृहाची दोन तिकिटे काढून आणली. अगदी निघायच्या आधी तिने, डोके दुखत असल्याची तक्रार करत सिनेमाला यायला नकार दिला. तो एकटाच गेला. याबाबतीत मी खातरजमा करू शकलो, कारण त्याने मला बायकोसाठी काढलेले, न वापरलेले, तिकीट दाखविले. “

“ हे उल्लेखनीय आहे. फारच उल्लेखनीय. पुढे चालू ठेव वॉटसन, तुझे सांगणे मला रोचक वाटते आहे. तू ते तिकीट व्यक्तीशः तपासलेस का ? नंबर घेतलास का ? बहुधा नाही“ शेरलॉक त्याचा केस मधला रस वाढत असल्याचे दाखवत म्हणाला.

मी गर्वाने म्हणालो, “हो. मी तो घेतला. तो माझा शाळेतील हजेरी क्रमांक असल्याने, माझ्या पक्का लक्षात राहिला. एकतीस.”

“छान वॉटसन, म्हणजे त्याचा तिकीट नंबर तीस किंवा बत्तीस असायला हवा.“

“नक्कीच. आणि ब रांग“ मी समाधानाने म्हणालो.

“त्याने मला त्याची तिजोरीची खोली दाखविली. ती एखाद्या बँकेसारखीच लोखंडी दार असलेली व चोरी न करता येणारी अशीच आहे. पण बहुधा त्याच्या बायकोकडे डुप्लीकेट किल्ली असावी, कारण सात हजार पौंड रक्कम व कागदपत्रे

गायब झाली आहेत. तो म्हणाला की त्याने पोलिसांना यादी दिली आहे. त्याला अशी आशा आहे की बहुधा स्थावर मालमत्ता विकता येणार नाही. साधारण मध्यरात्री तो सिनेमाहून परत आला व तेव्हा त्याने तिजोरीची खोली उघडी पाहिली व चोर पसार झालेले असावेत असा अंदाज केला. बायको घरात नव्हती. चिठ्ठी वगैरेही काही सापडली नाही किंवा काही निरोप, फोन काहीच नाही. त्याने ताबडतोब पोलिसांना कळविले".

होम्सने थोडा वेळ विचार केला.

"तू म्हणालास की तो रंगवत होता. काय रंगवत होता?"

"तो हॉलकडे जाणारा पॅसेज रंगवत होता. त्याने दार आधीच रंगविले होते हे मी तुला सांगितलेले आहे."

"त्या परिस्थितीत ते तुला विचित्र वाटले नाही का?"

"जड झालेले हृदय हलके होण्यासाठी काहीतरी करणे भाग होते, असे स्पष्टीकरण त्याने दिले. तसे ते विचित्र दिसत होतेच. पण तो विचित्र मनुष्यच आहे. त्याने माझ्या समोर, बायकोचा फोटो रागारागाने फाडून टाकला. "मला तिचे थोबाड देखील, बघायचे नाही" असे तो ओरडला.

"अजून काही, वॉटसन?"

"हो. अजून एक, मला खटकलेली गोष्ट. ब्लॅकहीथ स्टेशनवरून मी गाडी पकडली, तेव्हा माझ्या पुढच्या डब्यात एका माणसाला, मी घाईघाईने चढताना पहिला. तुला माहिती आहे की, एकदा बघितलेले चेहरे मी कधीच विसरत नाही. मी रस्त्यात ज्याला भेटलो, तोच तो उंच, काळा मनुष्य होता. मी अजून एकदा त्याला लंडन पुलावर पहिले व नंतर गर्दीत तो नाहीसा झाला. पण तो माझा पाठलाग करीत असल्याचे माझ्या लक्षात आले."

होम्स म्हणाला “नक्की. उंच, काळा, जाडजूड, हलक्या करड्या रंगाचा गॉगल घातलेला माणूस?“

“होम्स, तू अशक्य माणूस आहेस. एवढे मी कुठे म्हटले ? पण तसाच.“

“व फ्री मेसन क्लबच्या सभासदांच्या तऱ्हेची  मेसॉनिक टाय पिन?“

“होम्स!“

“माझ्या प्रिय मित्रा, अगदीच सोपे आहे. पण आपण व्यावहारिक मुद्द्यांकडे वळू. मला हे कबूल केले पाहिजे की मला अगदी साधी सोपी वाटणारी ही केस, भरभर वेगळीच गुंतागुंत निर्माण करीत आहे. हे खरे आहे, की या केसमधील महत्वाच्या बाबी तू लक्षात घेतलेल्या नाहीस, पण तरीही जेवढ्या बाबी, तुझ्या आपण होऊन लक्षात आल्या, त्यादेखील गंभीरपणे विचार करायला लावणाऱ्या आहेत.“

“मी काय लक्षात घेतले नाही?“

“अरे मित्रा रागावू नकोस. तुला माहिती आहे, की मी कुणाला उद्देशून बोलत नसतो. अजून चांगले काम कोणीच केले नसते. इतके चांगले नक्कीच नाही. पण अर्थातच काही महत्वाचे मुद्दे, सुटले आहेत. हा अंबरली व त्याची बायको यांच्याबद्दल शेजारीपाजारी काय म्हणतात ? ते नक्कीच महत्वाचे आहे. डॉ अर्नेस्टचे काय ? तो बायकांशी लैंगिक दृष्ट्या स्वैरपणे वागणारा आहे का ? बायका तुला गुन्हा शोधण्यात मदत करणाऱ्या असतात असा तुझा स्वाभविक गुण आहे, असे तुझे म्हणणे असते ना ? तू त्याच्या कानात काहीतरी कुजबुज करतोस, आणि त्या अगदी महत्वाच्या गोष्टी तुला सांगतात. आजूबाजूच्या स्त्रियांच्या बाबतीत हा प्रयोग तू केला नाहीस का?“

“अजूनही तो करता येईल.“

“ती माहिती मिळाली आहे. टेलीफोन व स्कॉटलंड पोलिसांचे आभार ! सहसा खोलीच्या बाहेर न जाता, मला पाहिजे ती माहिती मिळते. माझ्या माहितीतून, त्या माणसाच्या काही गोष्टींवर, शिक्कामोर्तब झाले आहे. तो भयंकर चिक्कू व छळीक नवरा होता. त्याच्या तिजोरीत, भरपूर पैसे सुद्धा होते. अंबरलीबरोबर तो तरुण अविवाहित डाँ रे अर्नेस्ट बुद्धिबळ खेळायचा, हे ही नक्की व त्याच्या बायकोला बहुधा, डाँ रे ने उल्लू बनविले असणार. हे सर्व अगदी सरळ दिसते आहे. एखाद्याला वाटेल, की आता अजून काय बरं बाकी राहिले?”

“मग माशी कुठे शिंकते आहे?“

“बहुतेक माझ्या कल्पनाशक्तीत. बर ते जाऊदे.  या दमविणाऱ्या कामातून बाजूला होऊन, आपण संगीताचा आस्वाद घेऊ या. आल्बर्ट हॉलमध्ये करीनाच्या गाण्याचा कार्यक्रम आहे. आपण कपडे करून, जेऊन तिकडे जाऊ शकतो.“

सकाळी मी उठलो तेव्हा, टेबलावर टोस्टचे कण व अंड्याची दोन टरफले पडली होती. माझा मित्र माझ्या आधीच उठल्याचे, मला कळले. टेबलावर एक चिठ्ठी पडली होती.

प्रिय वॉटसन,

मिस्टर अंबरलीबरोबर मला एकदोन बाबींविषयी बोलायचे आहे. ते झाल्यावर ह्या केसचा निकाल लागेल  --- किंवा नाही. तीन वाजता तू तयार रहा. मला बहुधा तुझी मदत लागेल.

शे. हो.

दिवसभर होम्सचा काही पत्ता नव्हता. पण ठरलेल्या वेळी तो आला. शून्यमनस्क व कशाशी संबंधित नसल्यासारखा तो दिसत होता. अशा वेळी त्याचे त्यालाच राहू देणे बरे असते.

“अंबरली अजून इथे आला नाही का?“

“नाही.“

“ओहो, मी त्याची वाट बघतो आहे “

आणि होम्सची निराशा झाली नाही. स्वतःच्या ताणलेल्या चेहेऱ्यावर काळजीने कोडे पडल्यासारखे हावभाव दाखवीत, तो वयस्क मनुष्य आला.

“मिस्टर होम्स, मला तार आली आहे. मला काहीच कळत नाही“

त्याने ती होम्सला दिली व होम्सने ती मोठ्याने वाचली.

“ताबडतोब या. नुकत्याच झालेल्या तुमच्या नुकसानासंबंधी मी माहिती देऊ शकतो.”

एलमन, व्हिकारेज (चर्च).

“पुर्लींग्टन या लहानश्या गावाहून, तार आलेली आहे. दोन वाजून दहा मिनिटांनी, ती पाठवली गेलेली आहे. मला वाटते ते गाव इथून फार लांब नसावे. अर्थात तुम्ही लवकर निघावे हे बरे. तार नक्कीच कुणातरी जबाबदार व्यक्तीकडून आलेली असणार. त्या गावातील तो वजनदार असामी असणार. माझी डायरी कुठे आहे ? हं इथे आहे. जे. एस. एलमन, एम. ए. रहाणार, पुर्लींगटन. वॉटसन, गाड्यांच्या वेळा बघ.“

“लिवरपूलपासून, पाच वाजून वीस मिनिटांनी गाडी आहे“

“छान. वॉटसन, तू त्याच्याबरोबर जा. त्याला मदतीची किवा सल्ल्याची गरज लागेल. या प्रकरणात हे मध्येच काहीतरी उपटले आहे.

पण आमचा अशील निघायला, फारसा उत्सुक दिसत नव्हता.

तो म्हणाला, “हे पूर्णपणे चुकीचे वाटते आहे. ह्या माणसाला काय माहिती असणार आहे ? त्याला तार करा की तुम्ही येत आहात. “

“मी जाईन, असे मला वाटत नाही.“ होम्सने ठामपणा दाखविला. “इतकी संधी येऊनही जर ती घालविली, तर माझे व स्कॉटलंड यार्ड पोलिसांचे नाव खराब होईल. या शोधमोहिमेत तुम्हाला काही रस नाही, असे पोलिसांना वाटेल“

ही मात्रा आमच्या अशिलाला लागू पडली.

“तुमचा असा समज होणार असेल तर, अर्थात मी जातो. त्या माणसाला काही माहिती असेल असे मला वाटत नाही. पण जर तुम्हाला वाटत असेल तर — “

“नक्कीच वाटते आहे. “होम्स ठामपणे म्हणाला. म्हणून मग आम्ही प्रवासाला निघालो. आम्ही निघण्यापूर्वी होम्सने मला बाजूला घेऊन सांगितले की, त्याला जाणे हे महत्वाचे वाटते आहे. तो म्हणाला, “काही झाले तरी जोस तुझ्याबरोबर असेल असे बघ. जर तो मध्येच बारगळला किंवा परतू लागला, तर मला फोन करून एवढेच बोल, की ‘कडी लागली‘ मी कुठेही असलो तरी मला तो फोन मिळेल, अशी व्यवस्था मी करतो”

पुर्लीग्टन गावाला जाणे, फार सोपे नव्हते. हवा गरम होती. गाडी फारच हळू चालली होती. माझा सहप्रवासी रागावलेला व गप्पगप्प होता. आपले जाणे कसे व्यर्थ आहे, या कुत्सित वाक्याशिवाय तो काहीच बोलत नव्हता. स्टेशनपासून तिथे जायला, दोन मैलांचे अंतर होते. ते आम्ही गाडीने कापले. एका थोराड, व्यवस्थित

पोषाख केलेल्या पण भपकेबाज दिसणाऱ्या, गंभीर धर्मगुरूने त्याच्या अभ्यासिकेत आमचे स्वागत केले. आम्ही तार त्याच्या समोर ठेवली.

त्याने ती पाहून विचारले, “मी तुमच्यासाठी काय करू शकतो?“

मी स्पष्टीकरण दिले, “ह्या तुमच्या तारेला अनुसरून, आम्ही आलो आहोत.“

“माझी तार? मी नाही पाठविली.“

“तुम्ही जोस अंबरलीला, त्याच्या बायको व पैशासंबंधी पाठवलेली तार, असे मला म्हणायचे आहे.”

“हा काहीतरी विनोद दिसतो आहे. मी हे नाव कधी ऐकले नाही व कोणाला तारही पाठविली नाही.“ तो

धर्मगुरू रागाने म्हणाला.

मी व आमचा अशील एकमेकांकडे पाहू लागलो.

मी म्हणालो, “कदाचित काही चूक झाली असावी. इथे दुसरे कोणी धर्मगुरू आहेत का? ही बघा एलमन

याने विकारेजहून पाठविलेली तार.“

“इथे एकच विकारेज आहे व एकच एलमन आहे. ही भानगड पोलिसच निपटतील. तर मग आता मला दुसरी कामे आहेत.”

मग आम्ही दोघे त्या लहानशा गावात रस्त्यावर, कडेला उभे होतो. आम्ही तार करायला म्हणून गेलो, पण ते ऑफिस बंद होते. मात्र मी होम्सला फोन करू शकलो. तो माझे बोलणे ऐकून आश्चर्यचकित झाला.

“फारच विचित्र! प्रिय वॉटसन, आज रात्री परतीची गाडीही नाही. नाईलाजाने, तुम्हाला तेथील एखाद्या लॉजमध्ये रहावे लागेल. तिथे निसर्गशोभा छान असेल. शिवाय अंबरलीबरोबर, तू संवादही साधू शकतोस.“ एवढे बोलून होम्सने फोन ठेवला.

थोड्याच वेळात माझ्या लक्षात आले, की माझ्या सहप्रवाश्याची चिक्कूपणाची ख्याती चुकीची नव्हती. प्रवासावर फुकट खर्च झाल्याबद्दल, तो कुरकुरत होता. आता परत जाताना, तिसऱ्या वर्गाने जाण्याच्या गोष्टी करत होता. आता इथे राहायचा खर्च होणार म्हणून तर त्याने, शिव्याच द्यायला सुरवात केली. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही एकदाचे लंडनला पोचलो, तेव्हा आम्ही फारच कंटाळून गेलो होतो.

मी म्हणालो, “जाताजाता आपण बेकर रस्त्याने जाऊ. होम्सचे काही काम असू शकेल.“

“काल जसा वेळ फुकट गेला, तसेच काही काम असेल, तर त्याचा काही उपयोग नाही.“ अंबरली छद्मीपणे म्हणाला. तरीही तो माझ्याबरोबर चालत राहिला. मी आधीच होम्सला, आमच्या तिथे पोचायच्या वेळेबद्दल कळवले होते. बेकर रस्त्याला आम्हाला असा निरोप मिळाला, की होम्स जोस अंबरलीच्या घरी लेविशामला असून तिथे आम्ही त्याला भेटावे. हे एक आश्चर्य होते. पण तेथे पोचल्यावर अजून आश्चर्य म्हणजे तो तिथे एकटाच नव्हता तर एक गंभीर दिसणारा, स्वस्थ बसलेला, काळा, हलक्या करड्या रंगाचा गॉंगल घातलेला व मेसॉंनीक टाय पिन लावलेला मनुष्य, त्याच्या शेजारी बसलेला होता.

होम्स म्हणाला, “हा माझा मित्र मिस्टर बार्कर. मिस्टर अंबरली, तुमच्या केसमध्ये त्यालाही रस आहे.

आम्ही स्वतंत्रपणे काम करीत असलो, तरी आम्हाला दोघानाही, तुम्हाला एकच प्रश्न विचारायचा आहे.”

मिस्टर अंबरली सुन्नपणे खाली बसले. त्यांना बहुधा काहीतरी धोका असल्याचे जाणवले. त्यांच्या ताणलेल्या डोळ्यात व थरारणाऱ्या शरीरात, मला ते दिसले.

“काय प्रश्न आहे, मिस्टर होम्स?“

“हा एवढाच. तुम्ही प्रेतांचे काय केले?”

तो माणूस किंचाळत उठून उभा राहिला. त्याने त्याचे हडकुळे हात, हवेत उचलले व तोंड उघडे टाकले. त्यामुळे तो क्षणभर भक्ष्यावर झडप घालणाऱ्या, ससाण्यासारखा दिसला. क्षणार्धात जोस अंबरलीचे भीषण राक्षसी स्वरूप, आमच्या नजरेसमोर आले. त्याचे मनही, त्याच्या बाह्य रूपाइतकेच कुरूप होते. तो खुर्चीत दाणकन बसला. खोकला येत असल्यासारखे, त्याने त्याचे दोन्ही हात ओठांपुढे धरले. होम्सने वाघासारखी त्याची गचांडी धरली.

“जोस अंबरली, आता सुटका नाही. जसे घडले, तसे शिस्तीने सांग. नाही का मिस्टर बार्कर?”

“माझी गाडी दाराशी उभी आहे “ ओठ शिवलेला माणूस म्हणाला.

“इथून काही शे फूट अंतरावरच, पोलीस स्टेशन आहे. आपण एकदमच जाऊ. वॉटसन, तू इथे थांब. मी अर्ध्या तासात येतोच.“

शक्तिमान असला, तरी माणसाना सरळ करणाऱ्या अनुभवी दोघांपुढे, त्या रंग देणाऱ्याचे काही चालेना.

फरफटत, ओढत त्याला गाडीत कोंबण्यात आले आणि मी तिथे एकटाच राहिलो. एका चटपटीत इन्स्पेक्टरला बरोबर घेऊन होम्स अर्ध्या तासानंतर परत आला व म्हणाला, “बार्करला शहानिशा करण्यासाठी मी तिथेच सोडले. वॉटसन, तू बार्करला भेटलेला नाहीस. मी ज्याचा मत्सर करतो असा तो, शोधमोहिमेतील माझा प्रतिस्पर्धी आहे. जेव्हा तू मला काळा, उंच माणूस म्हणालास तेव्हा ते चित्र पूर्ण करणे मला अवघड गेले नाही. त्याच्या खात्यावर खूप केसेस आहेत, नाही का इन्स्पेक्टर?“

इन्स्पेक्टर आब राखत म्हणाला, “त्याने खूप वेळा आमच्या कामात लुडबुड केलेली आहे.“

“त्याची पद्धत जरा माझ्यासारखीच वेगळी आहे, यात काही संशय नाही. कधीकधी तीच उपयोगी पडते. , उदाहरणार्थ गुन्हेगाराच्या हक्कांची जाणीव करून देण्याची तुमची मवाळ कायदेशीर पद्धत वापरली असती तर, त्या हलकटाच्या तोंडून खरा कबुलीजबाब आलाच नसता“

“कदाचित तुमचे बरोबर आहे. पण मिस्टर होम्स, आम्ही सुद्धा गुन्ह्याची उकल केली नसती, असे नाही.  ह्या केसबद्दल आम्हीही योग्य विचार केला होता. त्यामुळेच तर आम्हीही या माणसाच्या मागे होतो. तुम्ही वापरत असलेल्या कायद्याच्या बाहेरील पद्धती, आम्ही वापरू शकत नाही, केवळ म्हणून तुम्ही आमचे श्रेय हिरावून घेऊ शकत नाही.“

“इन्स्पेक्टर मॅकीनॉन, अशी आगळीक आमच्या हातून होणार नाही यांची खात्री बाळगा. बार्करचे म्हणाल तर मी सांगितलेल्यापेक्षा अजून वेगळे त्याने काहीच केलेले नाही.“

इन्स्पेक्टर बराच शांत झाल्यासारखा वाटला.

“मिस्टर होम्स, हा तुमचा चांगुलपणा आहे. तुमची स्तुती करा किवा दोष द्या. त्याने तुम्हाला काही फरक पडत नाही. पण जेव्हा वर्तमानपत्रे प्रश्न विचारू लागतात, तेव्हा आम्हाला तोंड द्यावे लागते.“

“असेल. पण ते प्रश्न विचारणार, हे नक्की व तुम्ही उत्तरे द्यायलाच हवी. उदाहरणार्थ, हुशार वार्ताहरांनी तुम्हाला विचारले, की तुम्हाला संशय कुठल्या बाबींमुळे आला व अशा कुठल्या गोष्टी घडल्या, की ज्यामुळे तुम्ही खऱ्या निकालापर्यंत पोचलात?“

इन्स्पेक्टर गोंधळून गेला.

“मिस्टर होम्स, अजून खऱ्या गोष्टी उजेडात यायच्या बाकीच आहेत. तुम्ही म्हणता की तीन साक्षीदारांसमोर कैद्याने आत्महत्या करायचा प्रयत्न करून जवळजवळ त्याची बायको व तिच्या प्रियकराचा खून केल्याची कबुली दिलेलीच आहे. पण याला अजून पुरावा काय?“

“तुम्ही त्यासाठी काही प्रयत्न केले का?“

“त्यासाठी तीन कॉन्स्टेबल मागावर आहेत.“

“मग लवकरच, तुम्हाला सर्व स्पष्ट होईल. प्रेते फार लांब असणे शक्य नाही. घराचा तळमजला वा बाग इथे शोध घेऊन बघा. या जागा खणायला फार वेळ लागणार नाही. हे घर तेथील पाण्याच्या पाईपपेक्षा जुने आहे. कुठेतरी न वापरात असलेली विहीरही असू शकेल. तिथे तुमचे नशीब आजमावून बघा.”

“पण तुम्हाला हे कसे माहिती? तुम्ही तुमचे शोधकार्य कसे केले?”

"आधी मी ते कसे केले, ते तुम्हाला दाखवतो. मग स्पष्टीकरण देतो. तुम्हाला, आणि माझ्या या खूप त्रास घेऊन मला अमूल्य मदत करणाऱ्या, मित्रालाही ते द्यायला हवे. पण प्रथम मी तुम्हाला या गुन्हेगाराच्या अंतर्मनाची कल्पना देतो. त्याची खरी जागा फाशीचे तख्त नसून वेड्यांचे हॉस्पिटल आहे. एखाद्या आधुनिक ब्रिटीश माणसापेक्षा, त्याचे मन मध्ययुगीन इटालियन माणसासारखे आहे. तो भयंकर कंजूष आहे. इतका कोत्या व त्रासदायक स्वभावाचा आहे. की बायको म्हणजे जणू त्याचे सावजच झालेली होती. अशा पार्श्वभूमीवर डॉ रेचा तिथे प्रवेश झाला. अंबरली बुद्धीबळपटू होता. आडाखे बांधण्यात निष्णात होता. तो कृपण होता. अति द्वेष करणाराही होता. त्याचा द्वेष इतका पराकोटीला पोचला की तो वेडाच झाला. चुकीचे वा बरोबर, त्याने या दोघांवर संशय घ्यायला सुरवात केली व सूड उगविण्याचे ठरविले. मोठ्या सैतानी चाणाक्षपणे बेत आखला. इकडे या."

या घरात तो जणू राहत असल्याच्या थाटात, होम्सने आम्हाला अगदी खात्रीपूर्वक, पॅसेजमधून तिजोरीच्या खोलीकडे नेले.

इन्स्पेक्टरने नाक मुरडून म्हटले, "काय हा रंगाचा भपकारा!"

होम्स म्हणाला, "तोच आमच्या संशयाचा पहिला मुद्दा होता. डॉ वॉटसनचे या बाबतीत तुम्ही आभार मानायला हवेत. त्याने निरीक्षण उत्तम केले पण अनुमान काढू शकला नाही. पण मी त्यामुळे अनुमानाच्या दिशेने जाऊ शकलो. घरात चोरी झालेली आहे, बायको गायब आहे, अशा वेळी हा माणूस घरभर रंगाचा वास का भरतो आहे? नक्कीच कुठला तरी वास लपविण्यासाठी, त्याचा हा उद्योग असणार. संशय येईल असा वास आणि लोखंडी बारने कडेकोट बंदोबस्तात सीलबंद केलेली तिजोरीच्या खोलीची कल्पना! या दोन गोष्टी एकत्र करा आणि तुम्ही कुठल्या निष्कर्षाला पोचता ते बघा. घरात नुसते फिरून माझ्या ही गोष्ट लक्षात आली. हेमार्केट सिनेमागृहातील त्या दिवसाच्या तिकिटांचा मी शोध घेतला, तेव्हा माझ्या

लक्षात आले की हे काहीतरी गंभीर प्रकरण आहे. वॉटसनच्या चाणाक्ष नजरेतून सुटलेली गोष्ट. ब रांगेतील तीस वा बत्तीस दोन्ही जागा त्या रात्री रिकाम्याच होत्या. अंबरली त्या रात्री सिनेमागृहात गेलाच नव्हता. त्याचा बचाव मग कोलमडूनच पडला. त्याच्या बायकोचा तिकीट नंबर, माझ्या मित्राला त्याने सांगितला, तिथेच तो घसरला. मग माझ्यापुढे असा प्रश्न होता की, त्याच्या घराची झडती कशी घ्यायची? मग मी काय केले, तर एका माणसाला अगदी लांबच्या एका गावातून, अंबरलीला तार पाठवून बोलावून घ्यायला सांगितले. तो मध्येच कुठेतरी गडप व्हायला नको म्हणून, डॉ वॉटसनला त्याच्याबरोबर पाठविले. त्यामुळे मला दोन निवांत दिवस मिळाले. त्या धर्मगुरूचे नाव मी माझ्या डायरीतून काढले. सर्व बाबी तुम्हाला स्पष्ट झाल्या का ?“

आश्चर्यचकित होऊन इन्स्पेक्टर उद्गारला, “काय हुशारी आहे!“

“कोणी मध्ये यायची शक्यता नसल्याने, मी घराची झडती घ्यायला सुरवात केली. झडती घेण्याचे एक वेगळे कसब आहे. ह्यातून काही निष्पन्न होईल की नाही हे मला ठाऊक नव्हते. पण मला काहीतरी सापडले. काय ते बघा. घराच्या कडेने हे गॅस पाईप गेलेले दिसत आहेत, बरोबर? ते इथून भिंतीवर चढले आहेत इथे कोपऱ्यावर त्याला उघडमीट करण्याची तोटी आहे. वर जाऊन ते तिजोरीच्या खोलीच्या छतातून, आत गेले आहेत व ते दिसू नयेत म्हणून त्यावर गिलावा दिला आहे. त्याचे खोलीतील तोंड रुंद असून, उघडेच आहे. म्हणजे बाहेरील तोटी उघडल्याबरोबर, खोली गॅसने भरून जाणार हे नक्की. दार व शटर घट्ट लाऊन घेतले, की ती खोली म्हणजे हिटलरची गॅस चेंबरच होणार. कुठल्या अमानुषतेने, त्याने त्या दोघांना आत ढकलले कुणास ठाऊक? पण एकदा ते तिथे बंद झाले, की मग ते त्याच्याच तावडीत होते”.

इन्स्पेक्टरने मोठ्या उत्सुकतेने पाईपचे निरीक्षण केले. तो म्हणाला, “आमच्या एका ऑफिसरने, गॅसचा वास येत असल्याचे सांगितले होते. पण अर्थात तेव्हा दार व शटर उघडे होते. त्याने सांगितल्याप्रमाणे आदल्या दिवशी अंबरलीने, रंग द्यायला सुरवात केली होती. थोडेसे बाकी राहिलेले काम चालू होते. पण पुढे काय, मिस्टर होम्स?“

“तर नंतर जे घडले ते मला अनपेक्षित होते. जेव्हा मी स्वयंपाकघराशेजारील सामान ठेवायच्या खोलीतील खिडकीखाली पहाटे झोपलो होतो, तेव्हा एक हात माझ्या कॉलरवर पडला. “ए नालायका, तू इथे काय करतो आहेस?” असा आवाज आला. मी डोके वळवून बघितले तर तो उंच, काळा, करड्या रंगाचा गॉगल घातलेला माझा मित्र, उर्फ प्रतिस्पर्धी मिस्टर बार्कर, मला दिसला. असे आम्ही अचानक भेटलो व आम्हाला हसू आवरेना. डॉ रे अर्नेस्ट यांच्या कुटुंबाने, तपासकामासाठी त्याला नेमले होते व तोही त्या भयाण नाट्याबद्दलच्या निष्कर्षाप्रत, येऊन पोचला होता. त्याने घरावर काही दिवस पाळत ठेवली. त्याला असे वाटले कीेएका ऑफिसर ने घडल्या तीन तिथे दिसणारा डॉ वॉटसन हा संशयास्पद माणूस आहे व त्याला अटक करावी. पण मला तिथे पाहिल्यावर, मी त्याला सर्व गोष्टींचा खुलासा केला. मग आम्ही दोघे मिळून केस उलगडू लागलो.”

“तुम्ही त्याच्याबरोबर हातमिळवणी केली, मग आमच्याबरोबर का नाही केली?”

“कारण, जे घडले असल्याचा संशय मला येत होता, त्याची खात्री करण्यासाठी! तुम्ही इथपर्यंत पोचला नसणार, असे मला वाटत होते.“

इन्स्पेक्टर हसला.

"पोचलो नसू. पण मिस्टर होम्स, आता तुम्हाला तुमचा शब्द पाळून, ही केस आमच्या हवाली करायला हवी. आतापर्यंत तुम्हाला सापडलेल्या धाग्यादोऱ्यासकट!"

"अर्थात. ती माझी नेहमीचीच पद्धत आहे"

"ठीक आहे. स्कॉटलंड यार्ड पोलिसांतर्फे तुमचे आभार. तुम्ही सांगितल्याबरहुकूम, ही केस अगदी स्पष्ट दिसते आहे. प्रेते ताब्यात घ्यायला, फारशी अडचण येऊ नये"

"मी तुम्हाला एक लहानसा छुपा पुरावा दाखवतो. मला खात्री आहे स्वतः अंबरलीलासुद्धा तो कधी दिसला नसेल. इन्स्पेक्टर, तुम्ही नेहमी स्वतःला दुसऱ्याच्या जागी कल्पून, आपण तेव्हा काय केले असते असा विचार करायला हवा. त्यासाठी थोडी कल्पकता हवी. त्याने निश्चित फायदा होतो. समजा, या लहानशा खोलीत तुम्हाला बंद केले आहे व दोन मिनिटेदेखील तुम्ही जिवंत रहाणार नाही आहात पण दारापलीकडील सैतानाला तुम्हाला अद्दल घडवायची आहे तर तुम्ही काय कराल?"

"निरोप लिहू"

"बरोबर. तुम्हाला कसे मारण्यात आले हे तुम्हाला लोकांना सांगायचे असणार. कागदावर लिहून काही उपयोग नाही कारण तो नाहीसा केला जाईल. पण तुम्ही भिंतीवर लिहिलेत तर कोणाच्या तरी ते नजरेस पडेल. आता इकडे पहा. जांभळया टिकाऊ पेन्सिलीने भिंतीवर लिहिलेले हे पहा. "आमचा — आमचा — " एवढेच.

"त्याने काय सिद्ध होईल?"

"असे बघा. हे जमिनीपासून फक्त फुटभर अंतरावर आहे. बिचारा माणूस जमिनीवर मरत पडलेला असताना, त्याने हे लिहिले असणार व ते पूर्ण लिहून व्हायच्या आत तो मेला असणार"

"'आमचा खून केलेला आहे' असे त्याला लिहायचे असणार"

"असेच मी ते वाचले. तुम्हाला प्रेतांवर टिकाऊ जांभळी पेन्सिल मिळाली तर --- "

"नक्कीच, आम्ही ती मिळाली तर बघू. पण तिजोरीच्या खोलीचा एवढा बंदोबस्त असताना, चोरी झालीच नसणार. ती कागदपत्रे त्याच्याकडेच असणार. पण आम्हाला ती सापडली नाहीत."

"ती त्याने एखाद्या सुरक्षित ठिकाणी ठेवली असणार, याची खात्री बाळगा. त्याची बायको आणि तिचा प्रियकर पळून गेल्याची बाब एकदा विस्मृतीत गेली की त्याने सांगितले असते की, त्या दोघांनी ती कागदपत्रे टाकून दिलेली सापडली."

इन्स्पेक्टर म्हणाला, "तुम्ही प्रत्येक अडचण हुशारीने सोडविलेली आहे. अर्थात त्याने आम्हालाही कळवले असते पण मुळात तो स्वतः होऊन तुमच्याकडे का आला हे मला कळत नाही."

"तो इतका वृथा आत्मविश्वास असलेला होता, की तो पकडला जाईल असे, त्याच्या स्वप्नातदेखील आले नसणार. कोणत्याही संशय घेणाऱ्या शेजाऱ्याला तो म्हणू शकला असता की "बघा, मी काय काय केले! फक्त पोलिसांनाच नव्हे, तर शेरलॉक होम्सला देखील बोलाविले."

इन्स्पेक्टर हसला.

"देखील शब्दाबद्दल तुम्हाला माफ केले पाहिजे. मला आठवते त्याप्रमाणे, तुमचे काम एकदम नंबर वन असते, मिस्टर होम्स "


काही आठवड्यानी माझ्या मित्राने, मला एका पाक्षिकात आलेले 'हॅवन बंगल्यातील भयंकर घटना' अशा मथळयाखालील आलेल्या मजकुराचे कात्रण पाठविले. त्याचा शेवट 'पोलिसांची तपासातील अक्कलहुशारी'

असा केलेला होता. परिच्छेद खालीलप्रमाणे होता.

“इन्स्पेक्टर मॅकीनॉनने रंगाच्या वासावरून ओळखून काढले की दुसऱ्या कुठल्या वासाला लपविण्यासाठी तो निर्माण केलेला असावा. नंतर त्याने अगदी हुशारीने शोधून काढले की, तिजोरीची लोखंडी दार असलेली बंदिस्त खोली, मृत्युची खोली झाली असावी. वर कुत्र्यांचे घर बांधून झाकून ठेवलेल्या पडीक विहिरीमध्ये, प्रेतांचा शोध लागला. आमच्या व्यावसायिक गुप्तहेरांच्या बुद्धीमत्तेचे उदाहरण म्हणून, गुन्हेगारीच्या इतिहासात संस्मरणीय, अशी ह्या प्रकरणाची नोंद होईल”.

होम्स सहनशीलतेने हसत म्हणाला, “हो हो, मॅकीनॉन तसा चांगला माणूस आहे. वॉटसन, आपल्या फाईलमध्ये याची नोंद करून ठेव. कधीतरी खरी गोष्ट बाहेर येईलच.“

# लाल वर्तुळांची दहशत



"हे पहा मिसेस वॅरन, तुम्ही अस्वस्थ व्हायचे विशेष काही कारण मला दिसत नाही. शिवाय माझा अमूल्य वेळ मी यात का घालवावा, हे देखील मला कळत नाही. मला इतर पुष्कळ कामे आहेत." असे बोलून शेरलॉक होम्स त्याच्या नोंदवहीत, ताज्या घडामोडींचा क्रम लावू लागला.

पण ती घरमालकीण चिवटपणे, स्त्रीसुलभ चाणाक्षपणे, आपल्या मुद्द्यावर ठाम राहिली.

"मिस्टर फेअरडेल नावाच्या माझ्या भाडेकरूचे प्रकरण, गेल्या वर्षी तुम्ही चांगले हाताळले होते."

"हो. हो. ते अगदी साधे होते."

"पण सर, तो अजूनही तुमच्या दयाळूपणाची आठवण काढतो. आणि ज्याप्रकारे तुम्ही त्या बाबीवर प्रकाश टाकला त्याचीदेखील! मी स्वतः अंधारात चाचपडत होते. तुम्ही एकदा एखाद्या गोष्टीत लक्ष घातले की ती तडीस नेताच."

एवढी स्तुती ऐकल्यावर होम्सने एक सुस्कारा टाकून हातातले काम बाजूला ठेवले व खुर्चीत रेलून बसत म्हणाला, “ठीक आहे. मिसेस वॅरन, आपण सुरु करू. मी सिगरेट ओढायला, तुमची हरकत नसावी. वॉटसन, काडेपेटी कुठे आहे? तुमचा नवीन भाडेकरू, त्याच्या जागेत सतत रहातो पण तरीही तुम्हाला तो दिसत नाही म्हणून तुम्ही अस्वस्थ आहात, हे समजले. खरे तर असे बघा, मी तुमचा भाडेकरू असतो, तर तुम्ही मला आठवडेच्या आठवडे पाहिलेच नसते.”

“त्यात काही संशय नाही. पण सर, हे वेगळे आहे. मी त्यामुळे घाबरते. मला झोपही येत नाही. सकाळपासून रात्रीपर्यंत, त्याचा स्पष्ट पायरव इकडे तिकडे ऐकू येतो. पण त्याचे नखसुद्धा दिसत नाही. हे मला काही समजत नाही. माझा नवराही यामुळे काळजीत पडला आहे. पण तो दिवसभर कामानिमित्त बाहेर असतो आणि मी इकडे अस्वस्थ असते. तो भाडेकरू अशी लपवाछपवी का करतो आहे? त्याने काय केले आहे? ती एक कामवाली मुलगी सोडली, तर दिवसभर मी घरात एकटी असते. आता मला हे अगदी असह्य झाले आहे.”

होम्स पुढे वाकला व त्याने त्याची लांब निमुळती बोटे त्या बाईच्या खांद्यावर ठेवली. जेव्हा पाहिजे तेव्हा अगदी जादुई असा, हळूवारपणे शांत करणारा परिणाम, तो घडवून आणू शके. तिची दृष्टी निवली. ती शांत झाली. त्याने दाखविलेल्या खुर्चीत ती बसली.

तो म्हणाला, “जर ही केस मला घ्यायची असेल, तर मला प्रत्येक बारीकसारीक गोष्ट माहिती पाहिजे. आठवायला वेळ घ्या पण प्रत्येक लहानशी गोष्टदेखील महत्वाची असू शकते. तुम्ही म्हणालात त्याप्रमाणे तो मनुष्य दहा दिवसांपूर्वी आला व पंधरा दिवसांचे रहाण्याजेवणाचे पैसे त्याने दिले. बरोबर?”

“त्याने माझ्या अटी विचारल्या. सर, मी त्याला एका आठवड्याला पन्नास शिलींग सांगितले. घराच्या वरच्या मजल्यावर छोटी लिव्हींगरूम व बेडरूम आहे.”

“बरं”

तो म्हणाला, ”मी तुम्हाला आठवड्याचे पाच पौड देईन, पण तुम्ही माझ्या अटी मान्य केल्या तरच!’ मी गरीब बाई आहे, सर. मिस्टर वॅरन फार काही मिळवत नाहीत. पैसा माझ्या दृष्टीने महत्वाचा आहे. त्याने तिथल्या तिथे मला दहा पौडाची नोट काढून दिली. ‘तुम्हाला असे पैसे दर पंधरा दिवसांनी, खूप दिवस देत राहीन पण तुम्ही माझ्या अटी मान्य केल्यात तरच! नाहीतर हा मी चाललो.’ असे तो म्हणाला.

“काय अटी होत्या?”

“त्याच्याकडे त्याच्या जागेची किल्ली हवी. ते ठीक होते. ती मी भाडेकरूना नेहमीच देते. त्याला त्याच्या हवाल्यावर सोडायचे व काही फालतू चौकशा करायच्या नाहीत.”

“त्यात काही आश्चर्यकारक नाही, नाही का?”

“सर, खरे पहाता नाही. पण काहीतरी पाणी मुरते आहे. आता त्याला इथे येऊन दहा दिवस झाले. मी, मिस्टर वॅरन किंवा त्या मुलीनेही त्याचे नखदेखील पाहीले नाही. रात्रंदिवस वरखाली खालीवर त्याचा जोरदार पायरव तर ऐकू येतो. पण पहिल्या रात्री तो बाहेर जाताना दिसला, त्यानंतर कधीच नाही.”

“ओहो, पहिल्या रात्री तो बाहेर गेला का?“

‘हो सर, आणि खूप उशीरा घरी परतला. आम्ही सगळे झोपलो होतो. तुम्ही तसदी घ्यायची काही जरुरी नाही असे तो पूर्वीच म्हणाला होता. मध्यरात्रीनंतर मी त्याचा जिना चढतानाचा आवाज ऐकला.”

“पण त्याचे जेवण?”

“त्याने असे सांगून ठेवले होते, की त्याने बेल वाजविल्यावर त्याचे जेवण दाराबाहेरील खुर्चीवर ठेवावे. मग ते संपल्यावर, तो परत बेल वाजवी आणि मग आम्ही खुर्चीवर ठेवलेले उष्टे ताट खाली आणत असू. जर त्याला अजून कसली जरूर असेल तर तो एका कागदाच्या तुकड्यावर कॅपिटल अक्षरात लिहून तो खुर्चीवर ठेवे.”

“कॅपिटल अक्षरात?”

“हो सर. अगदी नेमकेच शब्द कॅपिटल अक्षरात लिहून! कमी जास्त काही नाही. हा बघा एक तुम्हाला दाखवायला मी आणला आहे. SOAP (साबण). हा दुसरा. MATCH (काडी). पहिल्या दिवशी सकाळी त्याने ठेवलेला हा कागद. रोजचे वर्तमानपत्र त्याच्या न्याहारीबरोबर मी रोज ठेवते.”

ती चिटोरी चौकसपणे बघताना होम्स मला म्हणाला, “वॉटसन, हे नक्की जरा वेगळेच वाटते आहे. स्वतःचे खाजगी आयुष्य वगैरे मी समजू शकतो, पण कॅपिटल अक्षर कशासाठी? कॅपिटल अक्षरात लिहिणे काही सोपे नाही. नेहमीसारखे का लिहायचे नाही? वॉटसन, तू काही सुचवू शकतोस का?”

“त्याला त्याचे हस्ताक्षर, गुप्त ठेवायचे असेल.”

“पण का? त्याच्या मालकिणीला त्याचे हस्ताक्षर समजले तर काय बिघडले? तरीही तू म्हणतोस तसे असू शकेल .पण असा संक्षिप्त निरोप का?”

“काही कळत नाही.”

“डोके वापरून तर्क लढविण्याची सुंदर संधी आहे. नेहमीच्याच पद्धतीने लिहिलेले, जाड टोकाच्या किरमिजी पेन्सिलचे हे अक्षर आहे आणि SOAP असे

लिहिलेल्या कागदाचा टवका उडून SO हे अक्षर अर्धवट गेलेले दिसते आहे. वॉटसन, हे काहीतरी सूचक वाटते नाही का?"

"लक्ष द्यावे असे काहीतरी"

"बरोबर. या कागदावर नक्कीच काहीतरी खूण, अंगठ्याचा ठसा, ज्यामुळे माणूस ओळखता येईल, असे काहीतरी सापडू शकते. आता मिसेस वॅरन, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे हा मनुष्य मध्यम चणीचा, सावळा व दाढी असलेला आहे. तो काय वयाचा असेल?"

"तरुणच वाटतो सर, तीसहून अधिक नाही."

"बर. अजून काही सांगू शकाल?"

"तो चांगले इंग्लिश बोलत होता. तरीही त्याच्या उच्चारावरून तो परदेशी वाटतो."

"आणि त्याने व्यवस्थित पोषाख केला होता?"

"अगदी. चुणचुणीतही वाटत होता. सभ्य गृहस्थासारखा दिसत होता. कपडे जरा गडद रंगाचे होते पण खास वेगळे असे नव्हते."

"त्याने नाव सांगितले नाही?"

"नाही सर."

"त्याला काही फोन, पत्रे यायची का? किवा कुणी भेटायला यायचे का?"

"काहीच नाही."

एखाद्या सकाळी तुम्ही किंवा ती मुलगी त्याच्या खोलीत शिरला असाल."

"नाही. त्याचे सर्व काही एकट्यानेच चालायचे."

"हे जरा वेगळेच आहे. बरं, त्याचे काही सामानसुमान?"

"एक मोठी तपकिरी बॅग. बाकी काही नाही."

"या माहितीवरून काही निष्पन्न होईल असे वाटत नाही. खोलीतून काहीच कधी बाहेर आले नाही का? अगदी काहीच नाही?"

मालकिणीने तिच्या बॅगमधून एक पाकीट काढले. त्यात दोन जळक्या काड्या व सिगरेटचे थोटूक होते.

"सकाळी, त्याच्या खुर्चीवरील ट्रेमध्ये हे होते. तुम्हाला क्षुल्लक गोष्टींमधून काहीतरी पुरावे सापडतात म्हणे! म्हणून मी हे जपून ठेवले."

होम्सने खांदे उडविले.

"यात काहीच नाही. काड्या अर्थात सिगरेट पेटविण्यासाठी ओढलेल्या असणार. हे सहज कळते आहे की अर्धी काडी जळालेली आहे. हे सिगरेटचे थोटूक पण जरा विशेषच आहे. त्या माणसाला दाढीमिशा होत्या, बरोबर ना?"

"हो सर."

"मला हे समजत नाही. फक्त घोटून दाढी केलेला मनुष्यच, असे थोटूक टाकू शकतो. वॉटसन, तुझ्या आखूड मिशादेखील खूण उमटवतात"

"त्या थोटुकावर खुणा आहेत?" मी विचारले.

"नाही. पण त्या थोटुकाचा शेवटचा भाग, थोडा गुंडाळल्यासारखा वाटतो आहे. नाही का वॉटसन? मिसेस वॅरन, दोन भाडेकरू आहेत का?"

“नाही सर. तो इतके कमी खातो, की एक माणूस तरी त्यात कसा काय जगू शकतो, असे मला नेहमी वाटते.”

“मला वाटते, अजून काही पुरावे मिळेपर्यंत आपण थांबूया. तसे पाहिले तर तुमची तक्रार काहीच नाही. तुम्हाला भाडे मिळते आहे. जरी तो थोडा विक्षिप्त असला, तरी त्रासदायक तर नाहीच. तो चांगले पैसे देतो आहे. मग त्याला काही गोष्टी लपवायच्या असतील, तर तुमचा विरोध असायचे काय कारण आहे? जोपर्यंत तो काही गुन्हा करत नाही, तोपर्यंत त्याच्या खासगीपणाबद्दल आक्षेप घेण्याचे काही कारण नाही. मी एकंदर वस्तुस्थिती पाहिली आहे. माझे लक्ष राहीलच. जर नवीन काही घडले तर मला कळवा. गरज लागल्यास मी मदतीला आहेच.”

“वॉटसन, या केसमध्ये नक्कीच काही लक्ष वेधून घेणारे मुद्दे आहेत.” मालकीणबाई निघून गेल्यावर तो मला म्हणाला. “व्यक्तिगत वेगळेपणा किंवा वरवर दिसते त्यापेक्षा अधिक खोलवर काहीतरी दडलेले असे! चक्रावून टाकणारी एक शक्यता अशी वाटते की ज्याने जागा भाड्याने घेतली त्यापेक्षा वेगळाच कोणीतरी तिथे रहात आहे.”

“असा विचार करायचे काय कारण?”

“ठीक आहे. सिगरेटचे राहूद्या. पण रहायला आल्यावरच्या पहिल्याच दिवशी तो बाहेर गेला, हे जरा खटकत नाही का? अपरात्री तो आला की कुणी वेगळेच आले? कारण मध्यरात्र उलटल्यावर बघणारे कुणीच नव्हते. जी व्यक्ती बाहेर गेली तीच आत आली याला पुरावा काहीच नाही. त्याशिवाय प्रथम आलेला भाडेकरू उत्तम इंग्लिश बोलत होता तर हा दुसरा (?) काडेपेटी असे लिहिण्याऐवजी काडी असे लिहितो आहे. हा अडाणी वाटतो. लिहिण्यातील वेगळेपणा हा अज्ञान झाकण्यासाठी असावा. हो. नक्कीच, वॉटसन, नक्कीच हा दुसराच कुणीतरी घुसलेला असावा.”

“पण असे का?”

“तोच तर प्रश्न आहे. तपासाच्या दिशेची एक शक्यता दिसते आहे.” लंडनच्या वर्तमानपत्रातील वैयक्तिक अडचणी, सल्ला, आवाहने यासंबंधी मजकूर चिकटवलेले मोठे पुस्तक त्याने बाहेर काढले व त्याची पाने चाळत म्हणाला, “किती या क्लेशदायक घटना! जणू काही, समाजातील विचित्र घटनांचा अभ्यास करणाऱ्यासाठी उघडलेला मौल्यवान असा खजिनाच! ज्या खाजगी गुप्तपणाचा तो भाडेकरू अंगीकार करतो आहे, तो मोडून एखादी बातमी किंवा निरोप, या एकलकोंड्या माणसापर्यंत पोचवण्यासाठी त्याला जे वर्तमानपत्र दिले जाते, त्या वर्तमानपत्रातील ह्या सदराचा आधार घेतला जात असावा. दुसरा काही मार्ग दिसत नाही. त्यातील जाहिराती आपण वाचून बघू. गेल्या पंधरवड्यातील बातम्यांची, ही कात्रणे आहेत. ‘राजपुत्राच्या स्केटिंग क्लबमधील काळा मफलर घातलेली महिला’, ही आपण बाजूला सारू. ‘जिमी नक्कीच त्याच्या आईचे मन मोडणार नाही’ ही तर आपल्या हेतूशी काहीच संबंधित वाटत नाही. ‘ब्रिक्स्टन बसमध्ये चक्कर आलेली महिला’ ‘रोज माझे हृद्य तळमळते.’ यात मला काही रस नाही. ओहो, युरेका, नक्कीच सापडले. वॉटसन, हे ऐक. ’धीर धरा. संपर्काचे साधन नक्कीच सापडेल.’ ही तारीख बघ. मिसेस वॅरनचा भाडेकरू आल्यावर दोन दिवसानंतरची ही बातमी आहे. हे शक्य वाटते आहे, नाही का? एखाद्याला इंग्लिश बोलता येते, पण लिहिता येत नाही, यावरून काही धागादोरा मिळतो का बघू. आता तीन दिवसांनतर — ’मी काहीतरी यशस्वी बेत आखतो आहे. सबुरी व शहाणपणा हवा. सगळे काही स्पष्ट होत जाईल.’ त्यानंतर आठवडाभर जैसे थे. मग, ‘सबळ असे हाती लागून, मार्ग स्पष्ट होतो आहे. A म्हणजे १, B म्हणजे २ व असेच पुढे!’ ‘ही गुप्त भाषा लक्षात ठेव. लवकरच तू पाहशील.’ हे कालच्या पेपरमध्ये होते. आजच्या पेपरमध्ये काही नाही. मिसेस

वॅरनच्या भाडेकरूला, हे संदेश चपखलपणे लागू पडतात. वॉटसन, आपण थोडे थांबलो तर हे प्रकरण अजून जास्त समजू लागेल.”

आणि तसेच झाले. सकाळी मी माझा मित्र, शेकोटीकडे पाठ करून उभा असलेला पाहिला. त्याच्या चेहऱ्यावर पूर्ण समाधानाचे हास्य झळकत होते. टेबलावरील पेपर उचलत तो ओरडला, “हे बघ वॉटसन, हा मजकूर बघ. ‘दर्शनी भाग पांढऱ्या दगडांचे असलेल्या लाल घराकडे पहा. तिसऱ्या मजल्यावरील डावीकडून दुसरी खिडकी – ‘सूर्यास्तानंतर — ” हे नक्की पुरेसे आहे. मला वाटतं संध्याकाळनंतर आपण मिसेस वॅरनच्या घराच्या आसपास पाळत ठेवू.”

इतक्यात मिसेस वॅरनच घाईघाईने आमच्या खोलीमध्ये शिरल्या. “अरे! मिसेस वॅरन! आज सकाळी तुम्ही काय बातमी आणली आहे?”

“एक नवीनच महत्वाची बातमी आहे”. मिसेस वॅरन जवळजवळ ओरडल्याच ”आता हे पोलीसांवरच सोपवायला हवे. आता हे वाढतच चालले आहे. त्याच्या सामानासकट, त्याला बाहेर काढायला हवे. मी सरळ जाऊन त्याला तसे सांगणारच होते. पण मग असा विचार केला की आधी तुमचे मत घ्यावे. पण आता माझी सहनशक्ती संपली आहे. आता हे माझ्या नवऱ्या पर्यंत येऊन ठेपले आहे --- “

“मिस्टर वॅरनबद्दल काय म्हणालात?”

“त्याच्याबरोबर आडदांडपणा केल्याबद्दल!”

“पण तो कोणी केला?”

“अहो, तेच तर आम्हाला हवे आहे.” मिसेस वॅरन म्हणाल्या. “सर, हे या सकाळी झाले. टॉटनहॅम टेनिस कोर्टमध्ये टाईमकीपर म्हणून मिस्टर वॅरन काम करतात. सकाळी सातच्या आधीच त्याना घराबाहेर पडावे लागते. आज सकाळी ते दहा पाऊले जातात न जातात, तोच मागून दोन माणसे आली. त्यांच्या डोक्यावर

कोट टाकला व गठडी वळून, त्यांना रस्त्यावर दगडी भिंतीशी उभ्या असलेल्या मोटारीत कोंबले. एक तास त्याना घुमवले. मग दार उघडून, त्याना बाहेर ढकलून दिले. ते रस्त्यामध्ये पडले व इतके घाबरुन गेले की त्या मोटारीचे काय झाले, ते त्याना कळलेच नाही. जेव्हा ते भानावर आले, तेव्हा त्याना ते हॅम्पस्टेड या गवताळ भागात असल्याचे लक्षात आले. मग ते बसने घरी आले व आता सोफ्यावर पहुडले आहेत. हे सर्व सांगायला मी आता इथे आले आहे."

होम्स उद्गारला, "असे झाले होय! त्यांनी त्या लोकाना पाहिले का? त्यांचे बोलणे ऐकले का?'

"नाही. ते फारच घाबरून गेले होते. काहीतरी जादूने त्याना उचलले गेले व तसेच परत टाकले गेले असे त्याना वाटले. ते दोघेजण नक्की होते. कदाचित तिघेही."

"आणि याचा संबंध तुम्ही तुमच्या भाडेकरूशी जोडता?"

"असं बघा, आम्ही इथे पंधरा वर्षे राहत आहोत आणि असं पूर्वी कधीच झालं नाही. त्याचा फार त्रास मी सोसला. पैसा हे काही सर्वस्व नाही. आज दिवस मावळायच्या आत, मला त्याला घराबाहेर काढलेच पाहिजे."

"मिसेस वॅरन, थोडे थांबा. एकदम घाई करू नका. मला पहिल्यांदा वाटले, त्यापेक्षा हे प्रकरण खूपच महत्वाचे वाटते आहे. तुमच्या भाडेकरूला नक्कीच कोणीतरी, धमकावले आहे. दाट धुक्याच्या सकाळी, ते त्याच्यासाठी दबा धरून बसले होते व मिस्टर वॅरनलाच तुमचा भाडेकरू समजले. त्या शत्रूंना त्यांची चूक लक्षात आल्यावर, त्यांनी मिस्टर वॅरनला सोडून दिले. जर तो भाडेकरू त्यांच्या तावडीत सापडला असता, तर त्यांनी त्याचे काय केले असते, याची आपण कल्पना करू शकतो."

"ठीक आहे मिस्टर होम्स. मग मी आता काय करायचे आहे?"

‘मिसेस वॅरन, तुमच्या या भाडेकरुला बघायची मला फार इच्छा आहे.”

“ते कसे करायचे, ते मला कळत नाही. तुम्हाला त्याचे दारच तोडावे लागेल. मी खुर्चीवर जेवण ठेवून जिना उतरू लागताच, त्याने धाडकन दार लावल्याचा, मला आवाज येतो.”

“त्याला ट्रे आत तर घ्यावा लागतो. आपण लपून बसलो तर नक्कीच त्याला पाहू शकतो.”

मालकीणबाईने क्षणभर विचार केला.

“हो सर. त्याच्या खोलीच्या दारासमोर एक छोटी साठवणीची खोली, बॉक्सरूम आहे. त्या खोलीत दारामागे तुम्ही दडून बसा. मी समोर एक आरसा ठेवू शकते.”

“छान कल्पना आहे. त्याची जेवणाची वेळ काय आहे?”

“साधारण दुपारी एक वाजता.”

“मग मी व वॉटसन  साधारण त्या सुमारास येतो. बरय तर मग.”

साडेबारा वाजता आम्ही मिसेस वॅरनच्या घराच्या जिन्यावर होतो. ऑर्मे रस्त्याच्या ईशान्य दिशेला, हे घर होते. रस्त्याच्या कोपऱ्यावर असल्याने इथून सर्व रस्ता नीट दिसे. समोरच होवे स्ट्रीट होता. त्यावर, रहायचे फ्लॅट असलेल्या घरांची लांबलचक रांग होती.

होम्स म्हणाला, “होवे स्ट्रीटवरचे हे दर्शनी भाग पांढऱ्या दगडांचे असलेले, लाल घर बघ. तिथेच ती खाणाखुणा करायची जागा असावी. आपल्याला ती जागा माहिती आहे व  मिसेस वॅरनची जागाही माहिती आहे. म्हणजे नक्कीच आपले काम सोपे आहे. तिथल्या खिडकीला ‘भाड्याने देणे आहे’ अशी पाटी लटकते आहे म्हणजे

तो फ्लॅट नक्की रिकामा आहे. आपल्या या भाडेकरूच्या साथीदाराला, तिथे जागा मिळू शकेल. बरं मिसेस वॅरन, आता काय करायचे आहे?"

"मी तुमच्यासाठी सर्व तयार ठेवले आहे .तुम्ही दोघे तुमचे बूट खाली काढा व वर या."

ती एक छान लपायची जागा होती. तिने आरसा असा ठेवला होता, की अंधारात बसून आम्हाला समोरच्या  दाराचे दृष्य सहजपणे स्पष्ट दिसेल. आम्ही त्या बॉक्सरूममध्ये लपून बसलो व मग मिसेस वॅरन निघून गेली. त्या विचित्र भाडेकरूने बेल वाजवलेली, आम्ही ऐकली. मग मालकीणबाई ट्रे घेऊन वरती आल्या व तो खुर्चीवर ठेवला. त्या खाली गेल्यावर, आम्ही सरसावून बसलो. आरशावर नजर स्थिर केली. जसजसा मालकीणबाईंचा पदरव कमी होत गेला, तसा किल्लीने दार उघडल्याचा व हँडल फिरवल्याचा आवाज आला. दोन कृश हात बाहेर आले. एक भेदरलेला सुंदर चेहरा, आम्हाला पुसटसा दिसला. मग ट्रे आत घेतला गेला व दार परत बंद झाले. शांतता पसरली. होम्सने माझ्या हाताला धक्का दिला व आम्ही दोघे जिना उतरून खाली आलो.

खाली आमची वाट पहाणाऱ्या मालकीणबाईंना, होम्स म्हणाला, "मी संध्याकाळी परत येतो. वॉटसन, आपण घरी जाऊन याबद्दल बोलू."

"तू बघतो आहेस की माझा अंदाज खरा ठरला आहे. वेगळाच भाडेकरू, खरे तर वेगळीच भाडेकरू, तिथे राहत आहे. तिथे बाई रहात असेल, असे मला वाटले नव्हते."

"तिने आपल्याला पाहीले?"

"काहीतरी वेगळे पाहिल्याचे तिच्या लक्षात आले, हे नक्की! साधारण घटनाक्रम अगदी स्पष्ट आहे. भयंकर व ताबडतोब घडू शकेल, अशी काहीतरी धोक्याची परिस्थिती या जोडप्यावर ओढविली आहे व त्यामुळे लंडनमध्ये ते आश्रय शोधत आहेत. धोक्याच्या छायेत असल्याने, ते गुप्ततेची काळजी घेत आहेत. त्या माणसाला काम करायचे असल्याने, त्याने त्या काळात ती बाई सुरक्षित राहील अशी जागा निवडली आहे. हा तसा अवघडच प्रश्न आहे, पण त्याने तो हुशारीने सोडविला आहे. इतक्या हुशारीने की घराच्या मालकिणीलाही, तिच्या अस्तित्वाची कल्पना नाही. पहिल्यांदा तिने पाहिलेल्या पुरुष भाडेकरूलाच, आपण अन्न पुरवित आहोत, अशा समजुतीत ती आहे. बाईचे हस्ताक्षर ओळखू येऊ नये, म्हणून कॅपिटल अक्षरात लिहीलेला निरोप!

तो साथीदार, त्या बाईला भेटायला येऊ शकत नाही, कारण मग शत्रूंना, तिचा ठावठिकाणा कळेल. तो सरळ तिच्याशी बोलू शकत नाही. मग पेपरमधील विशिष्ट रकान्यांशिवाय, त्याला दुसरा काही मार्गच नाही. आत्तापर्यंत सर्व स्पष्ट झाले आहे.

"पण या सर्वामागे कारण काय?"

"हो, वॉटसन. नेहमीप्रमाणे ते शोधणे शहाणपणाचे ठरेल. सर्वामागचे कारण काय? मिसेस वॅरनच्या वरवर सरळ प्रश्नामागे काहीतरी भयंकर बाब दडलेली आहे, असे या गुंत्याच्या खोलात जाताना, मला वाटू लागले आहे. हे नेहमीचे प्रेमप्रकरणातले साहस नाही. आपण त्या बाईच्या तोंडावरची भीती पाहिली. त्यावरून, ती काहीतरी संकटात सापडली आहे हे नक्की. घरमालकावरील हल्ल्यासंबंधी आपण ऐकलेच. तो नक्की त्या भाडेकरूसाठीच होता. त्यामुळे गुप्ततेची गरज, जास्त ठळकपणे समोर येते. हा जीवनमरणाचा प्रश्न असल्याचेही लक्षात येते.

मिस्टर वॅरनवरील हल्ल्यावरून आपल्याला हेदेखील कळते की त्या शत्रूना त्या भाडेकरूच्या जागी एक स्त्री रहात असल्याचेही, माहिती नव्हते असे दिसते. वॉटसन, हा प्रकार फारच गुंतागुंतीचा व उत्सुकता वाढवणारा दिसतो आहे."

"याच्या खोलात आपण का पडावे? यातून आपल्याला काय मिळणार आहे?"

"खरच आहे ते. निव्वळ कलेसाठी कला! वॉटसन, मला वाटतं तू जेव्हा डॉक्टर होण्यासाठी केसेसचा अभ्यास करत होतास तेव्हा पुढे रुग्णांकडून मिळणाऱ्या फीचा विचार तुझ्या डोक्यात नक्कीच नव्हता."

"होम्स, ते शिक्षणासाठी होते"

"शिक्षण कधीच संपत नाही, वॉटसन. प्रत्येक केसमधून, आपण नवीननवीन शिकतो. ही आपल्याला काहीतरी सुचवित असलेली केस आहे. यात पैसाही नाही. मोठेपणाही मिळणार नाही. पण तरीही आपल्याला हा गुंता सोडवायला हवा. जेव्हा चहुबाजूनी अंधार दाटून येतो, तेव्हा तर आपण आपल्या तपासात आणखी आघाडी घेतली पाहिजे."

जेव्हा आम्ही मिसेस वॅरनच्या घरी पोचलो, तेव्हा लंडनमधील हिवाळयातील संध्याकाळ अगदी दाटून अंधारी झाली होती. एकसुरी करड्या रंगाचा पडदाच, जणू तयार झाला होता. फक्त पिवळया चौकोनी खिडक्या व गॅसच्या दिव्यांच्या उजेडानेच, तो छेदला जात होता. जेव्हा आम्ही घराच्या लिव्हिंग रुमच्या अंधारातून वर पाहिले, तेव्हा एक मिणमिणता दिवा आम्हाला वर प्रकाशताना दिसला.

होम्स म्हणाला, "पलीकडच्या घरातील वरच्या खोल्यांमधून काहीतरी हालचाल जाणवते आहे. उत्सुकतेने तो खिडकीतून डोकावला, "हो मला त्याची

सावली दिसते आहे. तो परत आला आहे. त्याच्या हातात मेणबत्ती आहे. आता तो समोर बघतो आहे. ती बघते आहे ना याची तो खात्री करतो आहे. आता तो उजेडाची तिरीप टाकायला लागला आहे. वॉटसन, काय निरोप आहे त्याकडे लक्ष दे. उजेडाची एक तिरीप म्हणजे अक्षर A. आता किती? वीस. म्हणजे अक्षर T. म्हणजे AT. आता दुसरा शब्द सुरु झाला. तो TENTA असावा व तिरीप टाकणे थांबले. झाले? वॉटसन, ATTENTA ला काय अर्थ आहे? किंवा त्याचे असे तीन शब्दही होतात. AT, TEN, TA. किंवा A व T ही एखाद्या व्यक्तीच्या नावाची अद्याक्षरे असू शकतील. किंवा असे असेल का? ATTE - हा एखादा निरोप असेल का? की तोच निरोप दुसऱ्यांदा असेल? कळत नाही. वॉटसन, तो गेला. AT तो तिसऱ्यांदा परत तेच सांगतो आहे. ATTENTA तीन वेळा - -- किती वेळा तो ते परत परत सांगणार आहे?. नाही. आता ते संपले. तो खिडकीपासून बाजूला झाला. वॉटसन, तू यावरून तू काय अंदाज बांधू शकतोस?”

“हा गुप्त निरोप आहे, होम्स”

माझ्या मित्राने अचानक काहीतरी लक्षात आल्याची खूण केली. “हा गुप्त निरोप नाही वॉटसन, कारण तो इटालियनमध्ये आहे. A चा अर्थ तो एका स्त्रीला उद्देशून आहे. BEWARE! BEWARE! BEWARE! असा तो असावा.”

“मला वाटते, तू तो निरोप उकलला आहेस.”

“यात काहीच संशय नाही. हा खूप तातडीचा निरोप आहे. म्हणून तो तीनदा, परत परत सांगितला गेला आहे. पण कशापासून सावध रहा? थांब. तो परत खिडकीशी येतो आहे.” परत आम्ही त्या येणाऱ्या माणसाची पुसट सावली पाहिली आणि झटकन खिडकीबाहेर उजेडाची एक ज्योत झळकली. परत तोच निरोप

सांगितला गेला. आता त्या खाणाखुणा जास्त जोराने होत होत्या. इतक्या जोराने की त्याचा अर्थ लावणे कठीण होत होते.

“PERICOLO—PERICOLO ‘ हे काय असावे वॉटसन, ‘धोका’ असे तर नसावे? हो नक्कीच ही धोक्याची सूचना आहे. तो परत तिरीप पाडतो आहे. ‘PERI HALLOA’ काय चाललयं — “

उजेड पडायचा अचानक थांबला. चकाकणारी खिडकीची चौकट, दिसेनाशी झाली. त्या उंच इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर अंधार दाटून आला. फक्त खिडकीच्या बिजागरीवर, थोडा उजेड होता. शेवटचा धोक्याची सूचना देणारा निरोप, एकदम थांबला. कसा व कोणाकडून? दोघांच्या मनात एकदमच हा प्रश्न उमटला.

“वॉटसन, हे काहीतरी गंभीर दिसते आहे. इथे काहीतरी गुन्हेगारीचा वास येतो आहे. स्कॉटलंड यार्ड पोलिसाना, कळवलेले बरे. तरी आपणही हे प्रकरण सोडून देऊ शकत नाही.”

“आपण पोलिसाना कळवायला जाऊया का?”

“काय परिस्थिती आहे हे अजून स्पष्ट व्हायला हवे. अजून काही धागेदोरे, सापडू शकतील. चल

वॉटसन, आपण जाऊन काय करू शकतो ते बघू.”

ऑर्मे रस्त्यावरून होवे रस्त्याकडे आम्ही भराभर खाली चालत गेलो आणि मिसेस वॅरनच्या घराकडे मागे वळून एक नजर टाकली. तिथे वरच्या मजल्यावरील खिडकीत, मला बाईच्या डोक्याची पुसट आकृती दिसली. अधीरपणे, निःस्तब्धतेने, ताण सहन करत, श्वास रोधून, अंधारात; ती अर्धवट निरोप पुन्हा मिळण्याची वाट

बघत उभी होती. ऑर्मे रस्त्यावरील फ्लॅट्स असलेल्या कॉलनीच्या दाराशी, एक मनुष्य उभा होता. त्याने लांब कोट व मफलर घातलेला होता. तो कुंपणावर रेलून उभा होता. आमच्या चेहऱ्यावर उजेड पडताच तो चालू लागला.

“होम्स” तो ओरडला.

“काय रे ग्रेगसन, आपल्या भेटीने आता हे प्रकरण संपण्याचा रंग दिसतो आहे. तू इकडे कसा?” स्कॉटलंड यार्ड गुप्त हेराला, उंचावून हात करत माझा मित्र म्हणाला.

“तू ज्या कारणासाठी इथे आहेस, त्याच कारणासाठी, असं मला वाटतं. तू इथे असशील, असे मला वाटले नव्हते.”

“आपले धागे वेगवेगळे असतील पण निरगाठ एकच आहे. मी खाणाखुणा न्याहाळतो आहे.”

“खाणाखुणा?”

“हो खिडकीमधल्या. मध्येच त्या थांबल्या. का थांबल्या, ते बघायला आम्ही इथे आलो. पण तुझ्या हाती सर्व सुरक्षित आहे असे वाटते आहे. मग आता आमचे काही काम उरले नाही.”

“जरा थांब, मिस्टर होम्स. मी तुला न्याय देतो. मी या केसच्या मागे नव्हतोच. पण तरीही तू या केसच्या मागे असल्यामुळे, मला धीर येऊन बरे वाटते आहे. या फ्लॅट्समधून बाहेर यायचा हा एकच रस्ता आहे. तेव्हा तो आपल्याला नक्कीच सापडेल.” ग्रेगसन उत्सुकतेने म्हणाला.

“तो कोण आहे?”

“एकदा आम्ही तुझ्यापेक्षा, वरचढ ठरलो होतो. आताही तू आम्हाला शुभेच्छा द्यायला हव्यास.” त्याने त्याची काठी, जोराने जमिनीवर आपटली. रस्त्याच्या दूरवर एक घोडागाडी उभी होती. तिच्या चालकाने त्याच्या हातातील चाबूक हळूच फटकारला. त्या गाडीच्या चालकाला ग्रेगसन म्हणाला, “मी तुला शेरलॉक होम्सची ओळख करून देऊ का?” चालक जवळ आल्यावर, ग्रेगसन ओळख करून देत म्हणाला, “हे पिंकरटन. अमेरिकन गुप्तहेर एजन्सीचे मिस्टर पिंकरटन”

”हो. हो. ती लाँग आयलंड केव्ह मिस्टरी सोडविणारे प्रमुख डिटेक्टिव्ह, बरोबर? तुम्हाला भेटून आनंद झाला.”

शांत असणाऱ्या त्या तरूण व्यावसायिकाने घोटून दाढी केली होती. त्याची स्तुती ऐकल्यावर त्याचा कठोर चेहरा लालेलाल झाला. “मी आत्ता कुठे माझ्या आयुष्याला सुरवात केली आहे. मिस्टर होम्स, जर मला जॉर्जियानो मिळाला — “

“काय? लाल वर्तुळांचा जॉर्जियानो?”

“हो. युरोपमध्ये तो प्रसिध्द आहे. बरोबर? आम्ही त्याच्याबद्दल सर्व अमेरिकेतही ऐकले. पन्नास खुनांमध्ये त्याचे नाव गोवले गेलेले आहे. तरीही त्याच्याविरुद्ध काही पुरावा सापडत नसल्याने आपण काहीच करू शकत नाही. मी न्यूयॉर्कपासून त्याचा पाठलाग करतो आहे व गेला आठवडाभर लंडनमध्ये मी त्याच्या मागावर आहे. त्याची गचांडी धरायची संधी मी शोधतो आहे. मिस्टर ग्रेगसन व मी त्याच्या मागावर या फ्लॅट्सच्या मोठ्या कॉलनीपर्यंत आलो. या कॉलनीतून बाहेर पडायला एकच दार असल्याने, आता तो आमच्या तावडीतून निसटू शकणार नाही. तो आत गेल्यापासून तीन लोक बाहेर आले पण त्यात तो नक्की नव्हता.”

“मिस्टर होम्स खाणाखुणासंबंधी बोलत आहेत. मला वाटते, नेहमीप्रमाणे आपल्यापेक्षा त्याना जास्त माहिती असणार.” आमच्या जशी लक्षात आली होती तशी परिस्थिती, होम्सने अगदी थोडक्या पण स्पष्ट शब्दात समजावून सांगितली.

अमेरिकनाने त्याचे दोन्ही हात रागाने एकमेकांवर चोळले.

“त्याला आपला सुगावा लागलेला आहे” तो निराशेच्या स्वरात म्हणाला.

“असं तुला का वाटतं?”

“एकंदरीत सर्व गोष्टींचा विचार करता तसे वाटते आहे. नाही का? तो गुन्ह्यात साथ देणाऱ्या त्याच्या मदतनीसाला निरोप पाठवितो आहे. लंडनमध्ये त्यांची मोठी टोळी आहे. तुमच्या म्हणण्याप्रमाणे मग तो धोका असल्याचे सुचवित असताना मध्येच थांबला. बहुधा त्याने रस्त्यावर आपल्याला पाहिले किंवा धोका फारच जवळ येऊन ठेपला आहे असे त्याला नक्कीच जाणवले. लवकरच काहीतरी उपाययोजना केली पाहिजे व धोका टाळला पहिजे हे त्याच्या लक्षात आले असणार. मिस्टर होम्स, तुम्ही काय सुचवाल?”

“आपण ताबडतोप वरती जाऊन स्वतःच्या डोळयांनी पाहू.”

“पण आपल्याकडे त्याला पकडायचे वॉरंट नाही.”

“संशयास्पद परिस्थितीत, कोणी रहात नसलेल्या ठिकाणी तो आहे, ते या क्षणासाठी चांगलेच आहे. जेव्हा प्रत्यक्ष तो आपल्या समोर असेल, तेव्हा न्यूयॉर्क पोलिसांना त्याला पकडायला, आपल्याला परवानगी द्यावीच लागेल. आत्ता त्याला पकडायची जबाबदारी मी घेतो.”

अशा जोखमीच्या कामी आपले डिटेक्टिव्ह डोके वापरताना, चुका करू शकतात पण साहसाच्या बाबतीत नव्हे. ग्रेगसन जिना चढून गेला. त्या खुन्याला पकडण्यासाठी, स्कॉटलंड यार्डच्या ऑफिसचा जिना तो ज्या शांतपणे, व्यावसायिक

पद्धतीने चढेल, तसाच तो चढला. तो तरुण मनुष्य, पिंकरटन, त्याच्यापुढे जाऊ लागला. पण ग्रेगसनने त्याला कोपराने ढोसत, मागे ढकलले. “लंडनच्या धोक्यांना लंडनच्या पोलिसांनाच तोंड देऊ दे” तो पुटपुटला.

तिसऱ्या मजल्यावरील डावीकडील फ्लॅटचे दार, थोडेसे उघडे होते. ग्रेगसनने ढकलून ते उघडले. सर्वत्र अंधार व सामसूम होते. मी काडी ओढून त्याचा कंदील पेटविला. ज्योत पेटली तेव्हा आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला. गालिचा न अंथरलेल्या लाकडी जमिनीवर ताज्या रक्ताचा सडा पडला होता. आतल्या खोलीतून लाल रक्ताच्या खुणा आमच्या दिशेने येऊन बंद दाराकडे जात होत्या. ग्रेगसनने विजेरीने उजेड पाडला. त्याच्या खांद्यावरून आम्ही सर्वजण, उत्सुकतेने बघत होतो. रिकाम्या खोलीच्या मध्यभागी, एक धिप्पाड माणूस निपचित पडला होता. घोटून दाढी केलेला, सावळया कुरूप चेहऱ्याचा, लोळागोळा झालेला देह व भयानक लाल रक्ताच्या सड्यात पडलेले डोके, असा तो मनुष्य, पांढऱ्या लाकडी जमिनीवर अस्ताव्यस्त पसरला होता. पांढरी मूठ असलेल्या मोठ्या तपकिरी चाकूचे पाते त्याच्या शरीरात, वरच्या दिशेने केलेल्या घशात, घुसले होते. ते घुसण्यापूर्वी माजलेल्या बैलाप्रमाणे, त्याने नक्कीच झुंज खेळली असणार. त्याच्या उजव्या हाताजवळ दोन पात्यांचा, शिंगाची मूठ असलेला, भयानक सुरा पडला होता.

“अरे बापरे, हा तर काळा जॉर्जियानो स्वतःच आहे. कोणीतरी यावेळी आपल्याआधीच, त्याचा खातमा  केलेला दिसतो आहे.” अमेरिकन डिटेक्टिव्ह ओरडला.

“मिस्टर होम्स, खिडकीमध्ये ही मेणबत्ती आहे.” ग्रेगसन म्हणाला.

होम्सने पुढे होऊन मेणबत्ती पेटवली.

“काय करतो आहेस व का?’ इति ग्रेगसन

होम्स खिडकीच्या तावदानावरून ती मेणबत्ती मागेपुढे फिरवत राहीला. मग अंधारात डोकावून त्याने ती विझवून टाकली व जमिनीवर फेकून दिली.

तो म्हणाला, “मला वाटते यामुळे आपल्याला मदत होईल. दुसरे दोन पोलीस शवचिकित्सा करत असताना तो शेजारी येऊन उभा राहीला. तो पूर्णपणे विचारात गढलेला होता. “तुम्ही खाली थांबला होतात, तेव्हा फ्लॅटमधून तीन लोक बाहेर आल्याचे तुम्ही सांगितलेत.” शेवटी तो बोलला.

“तुम्ही जवळून त्यांचे निरीक्षण केलेत का?”

“हो. केले.”

“काळया दाढीचा, सावळा, मध्यम चणीचा व तिशीच्या आसपासचा असा कुणी त्यात होता का’

‘हो. तो त्या तिघांमध्ये सर्वात शेवटी होता.”

“मला वाटतं, तोच आपल्याला हवा असलेला मिसेस वॅरनचा भाडेकरू होता. मी त्याचे अचूक वर्णन करू शकतो. त्याच्या हालचालींची पूर्ण माहिती आम्हाला आहे. ती तुम्हाला पुरेशी आहे.”

“ती काही फार नाही, मिस्टर होम्स. लंडनमध्ये असी लाखो लोक आहेत.”

“कदाचित नसावे. म्हणूनच मला वाटते की या महिलेला मदतीसाठी तुम्ही ताबडतोब बोलावून घ्यावे.” त्याच्या बोलण्यावर, आम्ही सगळयांनी वळून त्याच्याकडे पाहीले. तेवढ्यात दारात, ती गूढ भाडेकरू येऊन उभी राहीली. ती उंच व सुंदर होती. हळूहळू ती पुढे आली व काळजीयुक्त भेदरलेल्या चेहऱ्याने, बघू लागली. जमिनीवर पडलेल्या त्या गडद आकृतीकडे, ती डोळे विस्फारून बघत राहीली

ती पुटपुटली, “तुम्ही त्याला मारले. ओहो! तुम्ही त्याला मारले.” मग तिने जोराने श्वास घेतला. खिदळत, हवेत उड्या मारू लागली. मग ती टाळया पिटत, खोलीभर नाचू लागली. तिचे डोळे आनंदाने व आश्चर्याने चकाकत होते. हजारो सुंदर इटालियन शब्द, तिच्या तोंडून बाहेर पडत होते. ती स्त्री अशी बेभानपणे आनंदाने नाचताना बघणे, भयानक आश्चर्यकारक होते. अचानक ती थांबली व आमच्याकडे प्रश्नार्थक नजरेने, टक लाऊन पाहू लागली.

“पण तुम्ही! तुम्ही पोलीस आहात, बरोबर? तुम्ही जॉर्जियानोला ठार केलेत, असेच आहे ना?”

“आम्ही पोलीस आहोत, मॅडम पण --- ”

ती खोलीत पसरलेल्या सावल्यांकडे बघू लागली.

“पण मग गेनॅरो कुठे गेला? तो माझा नवरा आहे, गेनॅरो लुका. मी एमिलीया लुका आणि आम्ही दोघेही न्यूयॉर्कचे आहोत. गेनॅरो कुठे आहे? या क्षणी त्याने मला खिडकीतून मला बोलाविले, म्हणून मी धावत आले.” तिने विचारले.

“तो बोलाविणारा मी होतो.’ होम्स बोलला.

“तुम्ही? तुम्ही कसे काय बोलाविले?”

“तुमच्या खाणाखुणा, समजायला फार काही अवघड नव्हत्या. तुम्ही इथे हजर असणे आवश्यक होते. मी Vieni अशी उजेडाची तिरीप टाकली, की तुम्ही नक्की येणार हे मला माहिती होते.

त्या सुंदर इटालिअन स्त्रीने, माझ्या मित्राकडे आश्चर्याने पाहीले.

ती म्हणाली, “या गोष्टी तुम्हाला कशा माहिती झाल्या, ते मला कळत नाही. जॉर्जियानो — तो इथे कसा काय?” ती थांबली. अचानक तिचा चेहरा गर्वाने व आनंदाने उजळला. “असं आहे तर! मिस्टर गेनॅरो, माझ्या लाडक्या गेनॅरो, तू सर्व संकटातून माझे रक्षण केलेस. स्वतःच्या बळकट हाताने, त्याने या राक्षसाला ठार केले. ओहोहो! गेनॅरो, तू किती चांगला आहेस!”

ग्रेगसन सहजपणे म्हणाला, “बरका मिसेस लुका, अजून मला हे कळले नाही, की तुम्ही कोण आहात पण तुमच्या बोलण्यावरून एवढे स्पष्ट होते आहे, की पोलीस चौकीमध्ये तुमची गरज आहे.” ती जणू लंडनमधील सर्वसामान्य रहिवासी असल्याप्रमाणे, त्याने भावनामयतेने, तिच्या ड्रेसच्या बाहीवर हात ठेवला.

होम्स म्हणाला, “एक मिनिट ग्रेगसन, आपल्याला माहिती द्यायला, त्या जितक्या उत्सुक आहेत, तितकेच आपण ती ऐकायलाही आहोत. मॅडम, तुमच्या लक्षात येते आहे का, की आपल्यासमोर जो मनुष्य मरून पडला आहे, त्याचा खून केल्याच्या आरोपाखाली, तुमच्या नवऱ्याला अटक करून, खटला भरण्यात येईल. तुम्ही जे सांगाल, ते पुरावा म्हणून धरले जाईल. पण त्याने, जर गुन्हेगारी दृष्टीकोनातून हे केले नसेल व त्याला ते तसे उघड करायचे असेल, तर तुम्ही आम्हाला सर्व हकीगत सांगितलेले, त्याच्या फायद्याचेच ठरेल.”

“आता जॉर्जियानो मेल्यामुळे, आपल्याला कसली भीती उरली नाही. तो क्रूर राक्षस होता आणि त्याला मारल्याबद्दल जगातला कुठलाही जज्ज, माझ्या नवऱ्याला शिक्षा करणार नाही.” ती स्त्री म्हणाली.

होम्स म्हणाला, “तर मग आता आपण असे करू इथे जसे काही आहे तसे सर्व टाकून या खोलीला कुलूप लावू. या बाईबरोबर तिच्या रूमवर जाऊ व तिला जे काही सांगायचे आहे ते ऐकल्यावर आपले काय ते मत बनवू.”

अर्ध्या तासाने आम्ही चौघे मिसेस वॅरनच्या घरातील लुकाच्या लहानशा रुममध्ये तिच्याकडून उल्लेखनीय व घातक अशा घटनांचे वर्णन ऐकत होतो. या घटनाक्रमाच्या शेवटाचे आम्ही साक्षीदार होतो. ती अस्खलितपणे भरभर इंग्लिश बोलत होती, पण त्यात व्याकरणाच्या बऱ्याच चुका होत असल्याने ते नेहमीप्रमाणे वाटत नव्हते.

“मी पेसिलीप्पोम्ध्ये जन्मले. हे नेपल्समध्ये आहे. ऑगस्टो बरेली हे माझे वडील. ते तेथील भागाचे काही काळ डेप्युटी व मुख्य वकील होते. गेनॅरो माझ्या वडिलांकडे काम करत असताना, आमचे प्रेम जमले. हे एखाद्या सर्वसाधारण स्त्रीसारखेच झाले. त्याच्याकडे त्याचे देखणेपण, शक्ती व उत्साह सोडून काहीच नव्हते. त्यामुळे माझ्या वडीलांचा याला विरोध होता. आम्ही पळून जाऊन, बारी ह्या गावी लग्न केले. अमेरिकेला जाण्यासाठी, मी माझ्याजवळील रत्ने विकली. ही चार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. तेव्हापासून आम्ही न्यूयॉर्कमध्येच रहात होतो.

पहिल्यांदा आमचे नशीब जोरावर होते. एका इटालिअन सद्गृहस्थाकडे, गेनॅरो नोकरी करत होता. बॉवेरी नावाच्या गावी गेनॅरोने त्याच्या मालकाला काही गुन्हेगारांच्या तावडीतून सोडविले. त्यामुळे त्यांची घट्ट मैत्री झाली. त्याचे नाव टिटो कॅस्टॅलोट होते. न्यूयॉर्कमधून फळे निर्यात करणाऱ्या ‘कॅस्टॅलोट आणि झांबा’ या मोठ्या फर्मचा, तो वरिष्ठ भागीदार होता. सिनॉर झांबा हा अपंग होता. तीनशेपेक्षा जास्त माणसे कामाला असलेल्या फर्मची सर्व सत्ता, आमचा नवीन मित्र कॅस्टॅलोट याच्याच हाती होती. त्याने माझ्या नवऱ्याला विभागप्रमुख बनविले. प्रत्येक बाबतीत, तो आमचे भले इच्छिणारा बनला. तो अविवाहित होता. मला असे वाटत होते, की तो

गेनॅरोला मुलाप्रमाणे मानतो. मी व माझा नवरा दोघेही, त्याला वडिलांप्रमाणे मानू लागलो. ब्रुकलिनमध्ये आम्ही एक लहानसे घर घेऊन, ते सजविले. आता आम्ही स्थिरस्थावर झालो, असे वाटत असतानाच संकटाची काळी छाया आमच्या आकाशात दाटून आली.

एका रात्री गेनॅरो जेव्हा कामावरून परतला तेव्हा त्याने त्याच्याबरोबर एका माणसाला आणले. त्याचे नाव

जॉर्जियानो होते. तो देखील पेसिलीप्पोहूनच आला होता. तो एक दांडगा माणूस होता. हे तुम्हाला त्याच्या प्रेताकडे बघून कळले असेलच. त्याचे केवळ शरीर आडदांड होते असे नाही, तर तो बेढब व भीतीदायकही होता. त्या लहानशा घरात, त्याचा आवाज गडगडाटी भासे. तो बोलताना हातवारे करे, त्यासाठी आमचे घर फारच लहान होते. त्याचे विचार, त्याच्या भावना, त्याच्या इच्छा, सारेच अवाजवी व राक्षसी होते. तो इतका दरडावून बोले, की दुसऱ्यांना गप्प बसून ऐकण्याशिवाय, काही इलाज नसे. जोरकस शब्दांचा झराच जणू, त्याच्या तोंडून बाहेर पडे. त्याच्या नजरेत जरब असे. तो एक वेगळाच, भयानक माणूस होता. तो मेला, ही देवाची कृपाच म्हणावी लागेल.

हळूहळू तो वारंवार येऊ लागला. गेनॅरो व मी दोघेही, तो आला की नाखूष असू. तो अथकपणे राजकारण व सामाजिक प्रश्न, यावर रानटीपणे बोलत राही व माझा नवरा बिचारा गप्प बसून, त्याची बडबड ऐकत राही. गेनॅरो काही बोलत नसे पण अनुभवाने, मला त्याच्या चेहऱ्यावरचे वेगळेच भाव जाणवत. पहिल्यांदा मला वाटले, ती फक्त नाराजी आहे पण हळूहळू ते भाव त्याही पलीकडे जात असल्याचे, माझ्या लक्षात आले. ती खोलवर जाणवणारी भीती होती. गूढतेची डूब असलेली भीती! एका रात्री मी त्याच्या गळयात हात टाकून त्याला, त्याच्या माझ्यावरील

प्रेमाची शपथ घातली व माझ्यापासून काही लपवून न ठेवता जॉर्जियानोच्या भीतीने तो एवढा का ग्रासून गेला आहे, ते सांगण्याची गळ घातली.

त्याने ते सांगितले व ते ऐकून माझे हृदय बर्फासारखे थंडगार पडले. माझ्या गरीब बिचाऱ्या गेनॅरोवर, वाईट दिवस आले होते. सर्व जग जणू त्याच्यावर उलटले होते. आयुष्याच्या सारीपाटावरील या विचित्र खेळीने तो वेडा झाला होता. इटलीमध्ये असताना कार्बोनरी ह्या गुन्हेगारी संघटनेशी संबंधित अशा, नेपल्समधील रहिवासी असलेल्या, 'रेड सर्कल — 'लाल वर्तुळ' नावाच्या दुसऱ्या गुन्हेगारी संघटनेमध्ये, तो गोवला गेला होता. त्यांच्या शपथा व गुपिते भीतीदायक होती. गटाची बांधिलकी, जबरदस्त होती आणि एकदा त्यात शिरकाव झाल्यावर, त्यातून सुटका नव्हती. जेव्हा आम्ही अमेरिकेला पळालो तेव्हा गेनॅरोला असे वाटले, की आता तो यातून सुटला. पण त्याच्या वाईट नशिबामुळे, त्याला एका संध्याकाळी, रस्त्यात जॉर्जियानो भेटला. दक्षिण इटालीमध्ये खुनाच्या आरोपाखाली, त्याचे हात कोपरापर्यंत रक्ताने माखले होते व म्हणून त्याला कर्दनकाळ, असे नाव पडले होते. इटालियन पोलिसांच्या हातावर तुरी देऊन, तो न्यूयॉर्कला आला होता व इथेही त्याने त्याच्या संघटनेची शाखा काढली होती. हे सर्व मला गेनॅरोने सांगितले. त्याला आलेले, एक धमकीवजा पत्रही दाखवले. ते त्याला त्याच दिवशी मिळाले होते. त्यावर लाल वर्तुळे होती त्यात त्याला अमुक दिवशी कोर्टात हजर रहाण्याची, आज्ञा दिलेली होती.

हे वाईट होतेच, पण अजून वाईट तर अजून पुढे वाढून ठेवलेले होते. माझ्या असे लक्षात आले की जेव्हा जॉर्जियानो आमच्याकडे आला — तसा तो नेहमीच येत असे — तेव्हा, त्या संध्याकाळी तो माझ्याशी खूप बोलला. आणि जेव्हा तो माझ्या नवऱ्याबद्दल बोलत होता तेव्हा त्या रानटी पशूचे भयानक डोळे, सारखे माझ्यावर रोखलेले होते. एका रात्री त्याचे गुपित फुटले. तो ज्याला प्रेम म्हणत होता ते रानटी

पशुतुल्य प्रेम होते. एकदा गेनॅरो अजून घरी आलेला नसताना, तो घरात घुसला. मला त्याच्या शक्तिमान बाहूत पकडून त्याने जवळ घेतले व माझ्यावर चुंबनांचा वर्षाव करू लागला. नंतर तो मला, त्याच्याबरोबर बाहेर येण्यास सांगू लागला. मी किंचाळून त्याच्या तावडीतून निसटायचा प्रयत्न करत होते, तेवढ्यात गेनॅरो आत आला व त्याच्यावर तुटून पडला. त्याने गेनॅरोला बेशुध्द पाडले व पळून गेला. तो परत कधीच आला नाही. त्या रात्री आम्ही पक्के शत्रू बनलो.

काही दिवसांनतर एका सभेहून गेनॅरो परतला, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरून मी ताडले की काहीतरी भयंकर घडले आहे. आमच्या कल्पनेपलिकडे ते वाईट होते. अमेरिकेतील श्रीमंत इटालीयन लोकांविरुध्द, खोट्यानाट्या कंड्या पिकवून, त्याना लुबाडून, संघटनेची तुंबडी भरायचे निंद्य काम, ते करत. पैसे न दिल्यास धमक्या देत व हिंसाचार करायलाही, मागेपुढे बघत नसत. आम्हाला वडिलांच्या जागी असणाऱ्या कॅस्टॅलोटला, धमकवायला त्यांनी सुरवात केली होती. त्याना तो काही धूप घालत नव्हता व त्याने पोलिसांकडे याबद्दल तक्रार केली होती. कॅस्टॅलोटला अशी अद्दल घडवायची, की अजून इतर कोणी श्रीमंत इटालिअन माणसे जॉर्जियानो विरुद्ध काही कृती करू धजावणार नाहीत असा त्यांचा विचार चालला होता. कॅस्टॅलोटसकट त्याचे घर बाँबने उध्वस्त करायचे, असे त्यांच्या संघटनेच्या सभेत ठरले. हे कृत्य गेनॅरोने करायचे असाही बेत ठरला. गेनॅरोने त्यावर लाल वर्तुळे असलेली, स्फोटके भरलेली डिस्क काढण्यासाठी बॅगेत हात घातला, तेव्हा त्याला शत्रूचा दुष्ट चेहरा त्याच्याकडे बघून हसताना दिसला. त्या डिस्कच्या योगे कॅस्टॅलोटला ठार मारायचे होते व ती गेनॅरोच्या हातात होती. त्याच्या वडिलांच्या जागी असलेल्या प्रिय व्यक्तीला मारण्याची कामगिरी, लाल वर्तुळ संघटनेने, गेनॅरोवर टाकली होती. ते न केल्यास, गेनॅरो व मी, आमच्या दोघांवर, ते नक्की सूड उगवणार होते. ज्यांच्यापासून त्यांना धोका वाटे किंवा ज्यांचा ते द्वेष करत त्यांचा ते सरळ काटा काढत. मग ते

त्यांच्या संघटनेमधील लोक असोत किंवा त्यांचे आवडते लोक असोत. हे माहिती असल्याने गेनॅरो फारच घाबरून गेला होता व काळजीने जवळजवळ वेडा झाला होता.

त्या रात्री आम्ही दोघे एकमेकांच्या संगतीत बसून राहिलो. आलेल्या संकटावर मात करण्यासाठी आम्ही एकमेकांना धीर देत होतो. दुसऱ्या दिवसाची संध्याकाळ, ही ते काळे कृत्य करण्याची वेळ ठरली होती. पण आम्ही दुपारीच अमेरिकेतून निसटून लंडनला जाण्यासाठी निघालो. तत्पूर्वी आम्ही कॅस्टॅलोटला धोक्याची पूर्ण कल्पना दिली. त्याच्या जीवितास धोका पोचू नये, म्हणून पोलिसांनादेखील ही माहिती देऊन सुरक्षेचा बंदोबस्त केला.

सभ्य गृहस्थहो, बाकी पुढचे तुम्हाला माहिती आहेच. आमच्या सावलीसारखे आमचे शत्रू, आमच्या मागावर असणार, हे आम्हाला माहिती होतेच. जॉर्जियानोला सूड उगवण्यासाठी व्यक्तिगत कारणे होतीच, पण तो किती पाषाणहृद्यी, लबाड व सतत मागावर रहाणारा होता हे आम्ही समजून होतो. अमेरिका व इटली या दोन्ही ठिकाणी तो त्याच्या अरेरावीबद्दल व भयानक दुष्कृत्यांबद्दल कुप्रसिद्ध होता. या सगळ्या गोष्टींचा आता गवगवा होऊ लागला होता. काही चांगले, धोका नसलेले दिवस आम्हाला मिळाले. तेवढ्यात माझ्या सख्याने माझी अशी रहाण्याची व्यवस्था केली, की ती अगदी सुरक्षित होती. अमेरिका व इटली दोन्हीकडील पोलिसांच्या संपर्कात रहाता यावे, म्हणून त्याला स्वतःला स्वातंत्र्य हवे होते. तो कुठे व कसा रहात होता, हे मला माहिती नव्हते. फक्त पेपरमधील रकान्यांमधूनच, ते मला कळत असे. एकदा मी खिडकीतून पाहिले आणि मला दोन इटालिअन घरावर पाळत ठेवताना दिसले. जॉर्जियानोला आमचा ठावाठिकाणा समजल्याचे माझ्या लक्षात आले. मला गेनॅरोने पेपरमधून सांगितले की तो मला एका विशिष्ट खिडकीतून खाणाखुणा करेल, पण त्या फक्त दक्ष रहाण्याच्या

होत्या. त्याही मध्येच अचानक थांबल्या. जॉर्जियानो जवळ येऊन ठेपल्याचे त्याच्या लक्षात आले असावे. पण ते एक प्रकारे बरेच झाले, कारण त्यामुळे तो सावध झाला. आणि आता मला असे विचारायचे आहे, की आम्हाला कायद्यापासून काही भीती आहे का, किंवा माझ्या गेनॅरोला जगातला कुठलाही जज्ज, त्याने हे जे कृत्य केले त्याबद्दल शिक्षा देईल का?"

तो अमेरिकन म्हणाला, "हे बघा मिस्टर ग्रेगसन, तुमचे ब्रिटीश मत काय असेल ते मला माहित नाही पण न्यूयॉर्कमध्ये तरी या बाईच्या नवऱ्याला लोकांचा दुवाच मिळेल."

ग्रेगसन, उत्तरला, "तिला माझ्याबरोबर येऊन माझ्या बॉसला भेटावे लागेल. जर तिने आता जे कथन केले ते सत्य असेल, तर मला नाही वाटत, की तिला किंवा तिच्या नवऱ्याला भीतीचे काही कारण आहे. पण मिस्टर होम्स, मला हे कळत नाही आहे की या सर्व प्रकरणात तुम्ही कुठून अवतीर्ण झालात?"

"शिक्षण ग्रेगसन, शिक्षण! अजून मी अनुभवाच्या विद्यापीठातून शिकत असतो. वॉटसन, तुझ्याकडील गोष्टींच्या खजिन्यात आणखी एका गुन्हेगारकथेची भर पडली. बरं अजून आठ वाजले नाहीत. आपल्याला कोव्हेट बागेतील वॅग्नर नाट्यगृहात चालू होणारे दुसरे नाटक मिळू शकेल."

# शॉसकोंबचा सर रॉबर्ट



शेरलॉक होम्स खूप वेळापासून एका सूक्ष्मदर्शकाखाली काहीतरी बघत होता. मग विजयाने वर बघून तो मला म्हणाला, “वॉटसन, हा डिंक आहे. अगदी खात्रीने डिंक आहे. शेतामध्ये विखुरलेल्या या वस्तूंकडे बघ.”

मी वाकून त्या सूक्ष्मदर्शकाला माझा डोळा लावून बघू लागलो.

“ट्वीड कोटावरील केसांचे ते अवशेष आहेत. विखुरलेल्या करड्या रंगाच्या खुणा म्हणजे धूळ आहे. डावीकडे विशेष प्रकारचे ठसे आहेत.  हे मध्यभागी असलेले दोन मोठे डाग निःसंशय डिंकाचे आहेत.”  होम्सने वर्णन केले.

मी हसत म्हणालो, “तू म्हणतोस ते खरे आहे. पण त्यावर काय अवलंबून आहे?”

“हे अगदी सूक्ष्म अवलोकन आहे. सेंट पॅनक्रॉसच्या केसमध्ये तुला आठवत असेल की, मृत पोलीसाजवळ एक टोपी सापडली होती. आरोपी ती त्याची असल्याचे नाकारत होता. पण तो चित्रांची फ्रेम बनवणारा होता व त्याला नेहमीच डिंक वापरावा लागत असे.”

“ही तुझ्या एका केसपैकी होती का ?”

“नाही. स्कॉटलंड यार्ड मधील मेरीव्हेल याने, मला त्यात लक्ष घालायची विनंती केली होती. मी त्या माणसाच्या शर्टाच्या दुमडलेल्या बाहीत जस्त व तांब्याचे कण सापडल्याचे लक्षात आणून दिले तेव्हा मग टांकसाळीत काम करणाऱ्या त्याला अटक झाली व सूक्ष्मदर्शकाचे महत्व अधोरेखित झाले.”

त्याने अधीरतेने, त्याच्या घड्याळाकडे पाहीले. “माझा एक अशील मला बरेच दिवस बोलावतो आहे. वॉटसन, मला असे सांग की तुला रेसबद्दल काही माहिती आहे का?”

“अर्थात. मी माझे अर्धे पेन्शन त्यात घालवले आहे.”

“मग मी त्या रेसकोर्ससंबंधीच्या केससाठी, तुला माझा मार्गदर्शक करतो. सर रॉबर्ट नॉरबर्टन, हे नाव तू कधी ऐकले आहेस काय? त्याच्याबद्दल काही आठवते का?”

“हो. मी सांगतो. तो शॉसकोंब या जुन्या ठिकाणी राहतो आणि त्याला मी चांगले ओळखतो. कारण एका उन्हाळयात, मी तिकडे रहात होतो. नॉरबर्टन हा एकदा जवळजवळ तुझ्या कार्यक्षेत्रात आला होता”.

“कसा काय?”

"कर्झन रस्त्यावरील प्रसिध्द सावकार ब्रुअरला, त्याने न्यूमार्केटच्या रेसकोर्सवर घोड्याच्या चाबकाने फटकावून काढले होते. तो सावकार जवळजवळ मरायला टेकला होता."

"वा! तो मला रोचक वाटतो आहे. तो नेहमीच असे करतो का?"

"तो भयंकर माणूस म्हणून प्रसिध्द आहे. इंग्लडमधील तो सर्वात जिगरबाज घोडेस्वार आहे. काही वर्षांपूर्वीच्या आंतरदेशीय स्पर्धेत तो दुसरा आला होता. त्याच्या पिढीतला तो नावाजलेला घोडेस्वार होता. तो घोड्याना काबूत आणणारा होताच पण बॉक्सर, खेळाडू, घोड्यांच्या शर्यतीतील कसबी व स्त्रियांचा आवडता होता."

"उत्तम वॉटसन, उत्कृष्ट चित्र रेखाटलेस. मलाही तो ओळखीचा वाटतो आहे. आता तू मला शॉसकोंब प्लेससंबंधी काही सांगशील का?"

"ती जागा शॉसकोंब पार्कच्या मध्यभागी आहे. तिथे घोड्यांचे प्रसिध्द पैदास व प्रशिक्षण केंद्रही आहे."'

"'आणि मुख्य प्रशिक्षक जॉन मेसन आहे. वॉटसन, मला हे माहीती आहे म्हणून आश्चर्याने बघू नकोस. हे बघ. त्याच्याकडून आलेले पत्र मी उघडतो. पण शॉसकोंब प्लेसबद्दल अजून थोडे बोलूया. चांगला गब्बर अशील मला मिळणार, असं दिसतयं."

मी म्हणालो, "शॉसकोंब प्लेसमधील स्पॅनिएल हे जातीवंत कुत्रे प्रसिध्द आहेत. कुत्र्यांच्या प्रदर्शनात तुम्ही त्याबद्दल ऐकले असेल. कुत्र्यांची इंग्लंडमधील, ही प्रसिध्द जात आहे. शॉसकोंब प्लेसमध्ये राहणाऱ्या मालकीणबाईची ती अभिमानाची गोष्ट आहे.

"मला वाटतं, सर रॉबर्ट नॉरबर्टनची पत्नी?"

“रॉबर्टने कधी लग्न केले नव्हते, असे मला वाटते. त्याची विधवा बहीण, लेडी बिट्राइस फाल्डर बरोबर तो राहतो.’

“म्हणजे ती त्याच्याबरोबर रहाते, असे तुला म्हणायचे आहे का?’

“नाही. नाही. ती जागा तिचा कैलासवासी नवरा सर जेम्स नॉरबर्टन याची आहे. खरे तर ती जेम्सच्या भावाची होती. पण भाऊ अचानक वारल्यावर ती प्रचंड वास्तू त्याच्या एकट्याच्या मालकीची झाली व आता लेडी बिट्राइसची!”

“आणि तो भाऊ रॉबर्ट ते पैसे उधळतो.”

“असे एकंदर ते आहे. तो त्रासदायक आहे व तिचे आयुष्य त्याने कठीण करून टाकले आहे. तरीही ती त्याच्याशी एकनिष्ठ असल्याचे मी ऐकले आहे. पण शॉसकोंबचे कुठून मध्येच उपटले?”

“हं. मला फक्त ते जाणून घ्यायचे होते. इथे आलेला मनुष्य त्याबद्दल सांगू शकेल.”

एक उंच, घोटून दाढी केलेला मनुष्य, दार उघडून आत आला. घोडे, तिथे काम करणारी मुले व माणसे याना काबूत ठेवणाऱ्या चेहऱ्यावर दिसते, तसे हुकमतीचे व जरबेचे हावभाव, त्याच्या चेहऱ्यावर दिसत होते. जॉन मेसन असे खूपसे काही संभाळत होता. ते काम करायला तो अगदी योग्य होता. त्याने थंडपणे अभिवादन केले व तो बसला.

“मिस्टर होम्स, तुम्हाला माझे पत्र मिळाले?”

“हो. पण त्यावरून काहीच स्पष्ट होत नाही.”

"लिहायला ते प्रकरण फारच नाजूक होते व फारच गुंतागुंतीचे! ते समोरासमोर बसूनच बोलायला हवे."

"ठीक आहे. तर मग आपण सुरवात करू."

"मिस्टर होम्स, सर्वप्रथम मला वाटते मी ज्याच्यासाठी काम करतो, तो सर रॉबर्ट वेडा झाला आहे."

होम्सने त्याच्या भुवया उंचावल्या. "हा बेकर रस्ता आहे. वेड्यांबद्दल प्रसिध्द असा हार्ले रस्ता नव्हे. पण तुम्ही असे कशावरून म्हणता?"

"जेव्हा माणूस एकदोन गोष्टी वेड्यासारख्या करतो तोपर्यत ठीक असते. पण सगळ्याच गोष्टी विचित्रपणे करू लागला, तर आपण आश्चर्यचकीत होतो. शॉसकोंबचा 'प्रिन्स' घोडा व वार्षिक घोड्यांच्या शर्यतीने त्याचे डोके फिरविले आहे."

"म्हणजे तुमच्यातर्फे शर्यतीत भाग घेणारा घोडा?"

"इंग्लंडमधील सर्वात चांगला! आता मी तुम्हाला अगदी सरळ सांगतो. कारण तुम्ही एक सभ्य गृहस्थ आहात. त्यामुळे ही गोष्ट इथून बाहेर जाणार नाही याची मला खात्री वाटते. ही शर्यत रॉबर्टला जिंकायलाच हवी. तो देण्यांमध्ये गळयापर्यंत बुडाला आहे व त्यातून सुटण्याची ही शेवटची संधी आहे. आता सर्व काही, तो ही रेस जिंकण्यावर अवलंबून आहे. तो घोडा पैसे मिळवून देऊ शकतो. आता बोली एकास चाळीसपर्यंत खाली आली आहे. पण आधी ती एकास शंभरपर्यंत होती."

"पण घोडा इतका चांगला असेल तर बोली इतकी जास्त का?"

"तो किती चांगला आहे हे लोकाना माहीत नाही. घोड्यावर बोली लावायच्या बाबतीत रॉबर्ट खूप हुशार आहे. प्रिन्स घोड्याचा एक भाऊदेखील त्याच्यासारखाच आहे. रॉबर्ट त्याला लोकांसमोर पळवतो. पण दौडीचा प्रश्न येतो

तेव्हा दोन घोड्यात जमीनअस्मानाचा फरक आहे. सध्या रॉबर्टला घोडे आणि शर्यत, याशिवाय काहीच सुचत नाही. त्याचे जीवनच त्यावर अवलंबून आहे. आत्तापर्यंत त्याने देणेकऱ्यांना रोखून धरले आहे. पण जर प्रिन्स घोड्याने त्याला दगा दिला, तर तर मग रॉबर्ट संपलाच."

"हा निव्वळ जुगार आहे. पण यात वेडेपणा कुठे आला?"

"प्रथम फक्त त्याच्याकडे बघा. तो रात्री झोपतो असे मला वाटत नाही. तो सर्व वेळ तबेल्यातच असतो. त्याचे डोळे तारवटले आहेत. हे अगदी त्याच्या अंगावर आले आहे. आणि आता बहीण लेडी बिट्राइसबरोबरच्या त्याच्या वर्तनाबद्दल!"

"ओहो, ते काय आहे?"

"ते नेहमीच चांगले मित्र होते. दोघांचीही आवड सारखीच आहे. तिचे पण घोड्यावर, त्याच्याइतकेच प्रेम आहे. दररोज ठरल्या वेळी ती त्याना बघायला बाहेर पडतेच. कहर म्हणजे, तिचेही प्रिन्स घोड्यावर खूपच प्रेम आहे. ती आल्याचा सुगावा लागताच तो कान उंचावतो व तिच्या गाडीकडे त्याचा साखरेचा खुराक मिळवण्यासाठी धावू लागतो. पण आता ते सर्व संपले आहे."

"का?'

"तिचा घोड्यांमधला रस बहुधा संपला असावा. आठवडाभर ती 'शुभ सकाळ' असे म्ह्णायलादेखील, तबेल्याकडे फिरकली नाही.

"काही भांडण झाले असावे, असे तुम्हाला वाटते का/'

"भयंकर कडाक्याचे प्रकारचे भांडण झाले असावे. नाहीतर तिच्या मुलाप्रमाणे असणाऱ्या स्पॅनिएल कुत्र्याला रॉबर्ट अचानक कसे सोडेल? क्रेंडॉल पासून

तीन मैलावर राहणाऱ्या, ग्रीन ड्रॅगन हॉटेलचा मालक बार्नें, याला त्याने तो देऊन टाकला."

"हे नक्कीच विचित्र आहे."

"अर्थात तिचे कमकुवत हृदय आणि जलोदरासारखे गंभीर दुखणे पहाता, तिचे त्याच्याशी जमेल असे वाटत नाही. पण रोज संध्याकाळी दोन तास, तो तिच्याबरोबर तिच्या खोलीत असतो. ती खरे तर, त्याची चांगली मैत्रिण आहे. त्यामुळे तो शक्य असेल तेवढे, तिच्यासाठी करेलच. पण आता तेही सर्व, संपले आहे. तो तिच्याकडे फिरकतही नाही व हे तिला फार लागले आहे. ती वेड्यासारखी, दारू पीत सुटते."

"असे होण्यापूर्वीदेखील ती प्यायची का?"

"एरवी ती एखादा ग्लास पित असेल, पण आता पूर्ण बाटली पिते. रोज संध्याकाळचा तिचा हाच कार्यक्रम असतो, असे तिच्या बटलरने मला सांगितले. मिस्टर होम्स, अशी परिस्थिती आहे. फारच खराब! आणि जुन्या चर्च जवळील थडग्याच्या येथे, तो काय करत असतो? आणि तिथे त्याला अपरात्री भेटणारा मनुष्य कोण आहे?'

होम्सने त्याचे हात चोळले.

"चालू ठेवा, मिस्टर मेसन. हे मला अधिकाधिक रोचक वाटू लागले आहे."

"रात्री भर पावसात बटलरने त्याला जाताना पाहिले. म्हणून पुढील रात्री मी तिथे घरी गेलो, तर तो गायबच होता. स्टीफन व मी त्याच्या मागोमाग गेलो पण त्यांने आम्हाला पाहिले तर उगीच नको म्हणून आम्ही परत आलो. एकदा त्याचे

बिघडले, की तो भयंकर माणूस आहे. त्याला माणसांची काहीच पर्वा नाही. त्यामुळे आम्ही यात पुढे गेलो नाही. पण तो तिथे जातो हे नक्की! ती जागा झपाटलेली आहे व तो मनुष्य तिथे त्याची वाट बघत असतो."

"ती जागा झपाटलेली आहे?"

"सर, त्या तेथील बागेत एक जुने प्रार्थनास्थळ आहे. ते इतके जुनाट व पडके आहे, की कोणीच तिथे फिरकत नाही. आणि तिथेच, ती थडगी आहेत. ती जागा तशी वाईटच आहे. ती अंधारी, ओलसर व एकाकी आहे. असे फार थोडे लोक असतील, की जे रात्री तिथे जाऊ धजावतील. पण रॉबर्ट घाबरत नाही. तो आयुष्यात कशालाच घाबरला नाही. पण रात्री, तो तिथे काय करत असतो?"

होम्स म्हणाला, "जरा थांब. तू म्हणतोस की तिथे दुसरा एक माणूस असतो. तो तुमच्या घरातला किंवा तबेल्यातलाच कुणीतरी असला पाहीजे. तो कोण आहे ते शोधून काढ व त्याला विचार."

"तो इथला नाही."

"हे तुला कसे कळले?"

"कारण मिस्टर होम्स, मी त्याला पाहीले आहे. दुसऱ्या रात्री जेव्हां थोडा चंद्रप्रकाश होता, तेव्हा सर रॉबर्ट निघाल्याबरोबर मी व स्टीफन सशासारखे झाडाझुडुपांमधून लपतछपत, त्याच्यामागे निघालो. आमच्या मागून कुणीतरी येत होते पण त्याला आम्ही कशाला घाबरू? आम्ही चांदण्यात सहज फिरत असल्याचे सोंग केले. अगदी सहज भेटावे तसे! "हॅलो कसे काय?" मी म्हणालो. त्याने बहुधा आम्हाला पाहीले नसावे. पण आमचे बोलणे ऐकताच, जणू भूत पाहिल्यासारखे एक किंकाळी मारून तो अंधारात नाहीसा झाला. किती जोरात तो पळाला! क्षणार्धात तो

नजरेच्या व आवाजाच्याही टप्प्याबाहेर गेला. त्यामुळे तो कोण होता, ते आम्हाला समजलेच नाही.”

“पण तुम्ही चंद्रप्रकाशात, त्याला स्पष्टपणे पाहिलेत?’

‘हो. त्याचा पिवळसर चेहरा मी नक्की पाहिला. हलकट माणूस! याची सर रॉबर्टशी काय तुलना होणार?

होम्स थोडा वेळ स्वतःशीच विचार करत राहिला.

“लेडी बिट्राइस बरोबर कोण असते?” त्याने शेवटी विचारले.

“तिची नोकरांणी, कॅरी इव्हान्स असते. गेली पाच वर्षे ती तिच्याबरोबर आहे.”

“आणि अगदी विश्वासू आहे?”

मिस्टर मेसन अस्वस्थपणे घुटमळत म्हणाला, ”ती विश्वासू आहे. पण तिची निष्ठा कुणाच्या बाबतीत ते सांगता येणार नाही.”

“म्हणजे?’

“मी ठामपणे काही सांगू शकत नाही.”

“मिस्टर मेसन, मला समजले. परिस्थिती अगदी स्पष्ट आहे. डॉ वॉटसनने सर रॉबर्टचे जे वर्णन केले, त्यावरून असे वाटते की ती बाई रॉबर्टपासून सुरक्षित नाही. बहीणभावातले भांडण, त्याला कारणीभूत असेल का?”

“असं बघा. हे प्रकरण खूप दिवसापासून सुरु आहे.”

“पण तिने पूर्वी अनुभवले नसेल का? असे वाटते आहे की, तिच्या ते अचानक लक्षात आले असावे. तिला त्या नोकराणीला काढून टाकायचे असेल, पण तिचा भाऊ

तिला तसे करून देत नसावा. कमकुवत हृदयाची व इकडेतिकडे फिरण्यास फारशी समर्थ नसलेली अशी ती, तिचे म्हणणे लावून धरु शकत नाही. तिला नकोशी असलेली नोकराणी अजूनही तिच्याकडे बघते. लेडी बिट्राइस तिच्याबरोबर बोलत नाही. चेहरा पाडून दारू पित बसते. त्यांच्या पाळलेल्या कुत्र्याला रॉबर्टने रागारागाने, कुणाला तरी देऊन टाकले आहे. हे सर्व ऐकून तुम्हाला काय वाटते?'

"चालले आहे, तोपर्यंत असे चालेल."

"तेच तर. चालेल तेवढे चालेल. पण रात्री प्रार्थनास्थळातील थडग्याना दिलेल्या भेटी यात कुठे बसतात?" सर, आणि अजून काहीतरी आहे. पण ते कसे सांगावे ते मला कळत नाही."

होम्स अचानकपणे खाली बसला.

"सर रॉबर्टना एका मृत व्यक्तीचे प्रेत का उकरून काढायचे आहे कुणास ठाऊक! आम्हाला ते कालच समजले.----मी तुम्हाला पत्र लिहिल्यावर----सर रॉबर्ट लंडनला गेले होते. मग स्टीफन व मी थडग्याकडे गेलो. सगळे काही ठीक होते. फक्त एका कोपऱ्यात प्रेताचे अवशेष पडले होते."

"मला वाटते तुम्ही पोलिसाना कळवले असेल."

मिस्टर मेसन मंदपणे हसला.

"सर मला वाटते त्याना यात काही रस नसावा. ते डोके व काही हाडे होती. ते हजार वर्षांपूर्वीचे अवशेष असावे. पण पूर्वी ते तिथे नव्हते, हे मी अगदी शपथेवर सांगू शकतो. ते कोपऱ्यात ठेऊन, त्यावर एक पाटी  ठेवली आहे. पण पूर्वी तो कोपरा अगदी रिकामा होता."

"तुम्ही त्याचे काय केले?"

"आम्ही ते होते तसेच ठेवले."

“तेच शहाणपणाचे होते. सर रॉबर्ट, लंडनहून परत आले का/’

“आज येतील.”

“सर रॉबर्टनी त्यांचा कुत्रा केव्हा देऊन टाकला?

“आजपासून आठवड्यापूर्वीच. जुन्या घराबाहेर, तो कुत्रा गुरगुरत होता. सकाळपासून सर रॉबर्ट, रागावलेले होते. त्यांनी कुत्र्याला पकडले. मला वाटले ते त्याला ठार करणार आहेत. मग त्यांनी त्या कुत्र्याला जॉकी सॅडी बेनच्या हवाली केले व त्याला त्या कुत्र्याला, हॉटेल चालवणाऱ्या म्हाताऱ्या बार्नेला द्यायला सांगितले. सर रॉबर्टना पुन्हा त्या कुत्र्याचे, तोंडही बघायचे नव्हते.”

होम्स थोडा वेळ शांतपणे बसून राहीला. त्याने त्याचा चिरूट काढून पेटवला.

“मी या बाबतीत काय करायला हवे आहे हे मला अजून स्पष्ट झाले नाही. तुम्ही अधिक नेमकेपणे सांगाल का, मिस्टर मेसन?”

त्याने खिशातून एक कागद काढला व तो उघडून हाडांचे जळलेले तुकडे दाखवले.

होम्सने ते चौकसपणे न्याहाळून पाहिले.

“हे कुठे मिळाले?”

लेडी बिट्राइसच्या खोलीखाली मध्यवर्ती शेकोटी आहे. ती काही काळ बंद होती. पण सर रॉबर्टने थंडी वाजत असल्याची तक्रार करून ती परत सुरु केली. हार्वे नावाचा माझा मुलगा ती चालवतो. आज सकाळी भट्टीतील लाकडे खालीवर करताना त्याला हे सापडले. त्याला ते दृश्य बघून शहारा आला. तो ते माझ्याकडे घेऊन आला.”

“मला पण ते ओंगळ वाटते आहे. वॉटसन, याचे काय करायचे?” इति होम्स.

“ते भाजले जाऊन काळे ढुस्स झाले होते. पण त्याची अवस्था चिकित्सा करता येईल इतपत होती.”

“हे माणसाच्या मांडीचे मोठे हाड आहे.“ मी म्हणालो.

होम्स गंभीर होत म्हणाला, “बरोबर. हा मुलगा भट्टीकडे केव्हा जातो?”

“तो रोज संध्याकाळी जाऊन ती तयार करतो व निघून येतो.”

“मग तिथे कोणी जाते का?”

“हो सर.”

“तुम्ही बाहेरून तिथे जाऊ शकता का?”

“बाहेरून तिथे जायला एक दार आहे. दुसरे दार जिन्याकडून लेडी बिट्राइसच्या खोलीकडे जाते.”

“मिस्टर मेसन, इथे काहीतरी पाणी मुरते आहे. खराब पाणी! सर रॉबर्ट काल रात्री घरी नव्हते, असे तुम्ही म्हणालात नाही का?”

“हो ते नव्हते, सर.

“म्हणजे हाडे जाळणारा सर रॉबर्ट नव्हता.”

“हे खरे आहे, सर.”

“तुम्ही उल्लेख केलेले हॉटेल कुठले?”

“ग्रीन ड्रॅगन”

“बर्कशायरच्या त्या भागात मासेमारी चालते का?”

प्रामाणिकपणे मेसनच्या चेहऱ्यावर अगदी स्पष्टपणे असे दिसले, की आता त्याच्या आयुष्यात अजून काहीतरी नको ते घडणार आहे. “सर, मी असे ऐकले आहे की तेथील दोन तळयांमध्ये मासे आहेत.”

“एवढे पुरेसे आहे. वॉटसन व मी उत्तम मासे पकडणारे आहोत. नाही का वॉटसन? पुढे आम्ही ग्रीन ड्रॅगनमध्ये असू. आज रात्रीच आम्ही तिथे पोचतो. मिस्टर मेसन, तिथे तुम्ही यायची गरज नाही. आम्ही या प्रकरणात थोडी प्रगती करतो आणि मग तुमच्याबरोबर त्याबद्दल बोलतो.”

तर मग मे महिन्यातील त्या लख्ख उजेडाच्या दिवशी होम्स आणि मी, ‘आम्ही सूचना दिल्यास थांबणाऱ्या’ गाडीच्या पहील्या वर्गाच्या रिकाम्या डब्याने, शॉसकोंबसाठी रवाना झालो. तिथे पोचल्यावर थोडेसे अंतर मोटारीने कापून, आम्हीं एका जुन्या पद्धतीच्या हॉटेलवर पोचलो. तिथे उत्साही जोशिआ बार्नेने पुढे येऊन, आमच्या मासेमारीसाठी जायच्या बेताचे स्वागत केले.

“हेलन तळयावर जाऊन, पाईक मासे पकडायचा बेत ठीक राहील” होम्स म्हणाला. जोशिआचा चेहरा पडला.

“तसे नाही करता येणार, सर. पण इथून तुम्ही जाण्यापूर्वी तुम्हाला कदाचित ती संधी मिळेल.”

“का बर?’

सर, सर रॉबर्टमुळे. तो इथे अगांतुकपणे येणाऱ्यांवर खार खाऊन असतो. त्याच्या प्रशिक्षण केंद्राच्या जवळ तुम्ही दोघे परके लोक दिसलात, तर तो तुमच्या मागे लागेल. तो तुम्हाला अजिबात सोडणार नाही.”

“मी असं ऐकलं की, त्याचा घोडा शर्यतीत भाग घेणार आहे.”

"हो. आणि तो चांगला घोडा आहे. तो आमच्याकडून पैसे घेऊन आणि त्याचेही, त्या घोड्यावर लावणार आहे. पण तुम्ही घोड्यांच्या शर्यतीत इथे कधी होतात?" आमच्याकडे विचारपूर्वक नजर रोखून तो म्हणाला.

"खरे तर नाही. आम्ही लंडनला कंटाळून बर्कशायरच्या ताज्या हवेचा आस्वाद घेण्यासाठी, आलो आहोत."

"छान. तुम्ही योग्य ठिकाणी आला आहात. इथे पुष्कळ काही बघण्यासारखे आहे. पण मी तुम्हाला सर रॉबर्टबद्दल जे काही सांगितले, ते लक्षात ठेवा. तो पहिल्यांदा येऊन आरडओरडा करतो व मग बोलतो."

"नक्कीच मिस्टर बार्ने, आम्ही लक्षात ठेऊ. तो हॉलमध्ये ओरडणारा कुत्रा छान होता."

"हो. तो खरा शॉसकोंबचा जातिवंत कुत्रा आहे. त्याहून चांगला कुत्रा अख्या इंग्लंडमध्ये सापडणार नाही."

"मी कुत्र्यांचा चाहता आहे. जर तुम्ही सांगू शकत असलात, तर अशा कुत्र्यांची साधारण किंमत काय असेल?" होम्सने विचारले.

"फारच महाग सर. रॉबर्टने मला दिला आहे, म्हणूनच मला तो लक्षपूर्वक सांभाळावा लागतो आहे. मी त्याच्या भाषेत बोललो, तर तो क्षणार्धात हॉलबाहेर पळेल."

होम्स म्हणाला, "वॉटसन, काही गोष्टी हातात आल्यासारख्या वाटत आहेत. एकदोन दिवस इथे थांबून बघू. अवघडच आहे, पण काही जमते आहे का बघू. मला वाटतं, सर रॉबर्ट अजून लंडनमध्येच आहे. आपल्याला काही शारीरिक इजा न होता, आपण त्या गुप्त जागी आज रात्री कदाचित जाऊ शकू. एकदोन गोष्टींची मला खात्री करून घ्यायची आहे."

"होम्स, तू काही आडाखे बांधले आहेस का?"

"एक आठवड्यापूर्वी काहीतरी घडले व शॉसकोंब घरावर त्याचा खोलवर परिणाम झाला आहे. ते काय घडले याबद्दल, आपण फक्त त्याच्या परिणामांवरुनच अंदाज करू शकतो. हे सारे वेगवेगळया प्रकृतीचे लोक आहेत. मामला गुंतागुंतीचा आहे."

"काय काय माहिती आपल्याला मिळाली ते बघू. अपंग बहिणीला भाऊ आता भेटत नाही. तिचा आवडता कुत्रा तो देऊन टाकतो. तिचा कुत्रा! वॉटसन, यावरून तुझ्या काही लक्षात येत नाही का?"

"काय? फक्त भावाचे शत्रुत्व!"

"हो तसेही असेल किंवा — अजून एक शक्यता आहे. ते भांडण सुरु झाले तेव्हापासून — म्हणजे भांडण झाले असेल तर,— झालेल्या परिस्थितीचा आपण आढावा घेऊ. लेडी बिट्राइसचे तिच्या खोलीत रहाणे, सवयी बदलणे, तबेल्याशी जाऊन आवडत्या घोड्याला भेट देणे थांबवणे व शेवटी दारूच्या आधीन होणे. एवढेच घडले, नाही का?'

"आणि थडग्याच्या येथे झालेल्या उचापतींचे काय?"

"ते अजून वेगळेच आहे. तू ते एकत्र करू नकोस. रेषा अ ही लेडी बिट्राइसशी संबंधित आहे. त्याला थोडा खलनायकी रंग आहे. नाही का?"

"मला तर काही समजत नाही."

"ठीक तर मग. आपण रेषा ब कडे जाऊ. सर रॉबर्टविषयी बोलू. तो घोड्यांची शर्यत जिंकण्यासाठी वेडा झाला आहे. तो त्याच्या देणेकऱ्यांच्या कचाट्यात आहे. कुठल्याही क्षणी त्याचे तबेले हिसकावून घेतले जाण्याची शक्यता आहे. तो धडाडीचा, तरीही हतबल मनुष्य आहे. त्याला त्याच्या बहिणीकडून पैसे मिळतात.

त्याच्या बहिणीच्या नोकराणीला त्याने वश करून घेतले आहे, इथपर्यंत आपल्याला अंदाज आलेला आहे. खरे ना?"

"पण थडगे?"

"हो. हो. थडगे. एक टोकाची शक्यता म्हणजे सर रॉबर्टने त्याच्या बहिणीची वासलात लावली आहे."

"माझ्या प्रिय होम्स, ते अशक्य आहे"

"ठीक आहे वॉटसन. सर रॉबर्ट हा खानदानी घरातला आहे. पण कधीकधी तुम्हाला गरुडाच्या थव्यात, कावळाही सापडतो. आपण यावर चर्चा करू. सर रॉबर्टला अजून त्याचे भवितव्य माहिती नाही. ते त्या प्रिन्स घोड्यावर अवलंबून आहे. ते घडून येईपर्यंत तरी त्याला खेळ चालू ठेवावा लागेल. त्यासाठी त्याला बळी घेतलेल्याचे शव नाहीसे करावे लागेल. शिवाय बहिणीची जागा घेईल, असे असे एखादे सोंग त्याला शोधावे लागेल. त्या नोकराणीला त्याने फितवल्याने ते सहज शक्य आहे. त्या बाईचे प्रेत थडग्याच्या बाजूला नेता येईल, कारण तिथे तो वारंवार जातो. भट्टीमध्ये रात्री प्रेताची वाट लावता येईल. फक्त हाडांची खूण मागे उरेल. तुला काय वाटते, वॉटसन?"

"आपण बहिणीच्या खुनाची पहिली सैतानी घटना मान्य केली तर हे सारे घडणे शक्य आहे ----"

"वॉटसन, मला वाटतं, आपण उद्या एक प्रयोग करून बघू. त्यामुळे या प्रकरणावर थोडा उजेड पडू शकेल. आपण खरे कोण आहोत हे लपवून ठेवले, तर मिस्टर जोशिआ बार्नें आपल्याला नक्कीच एक ग्लासभर वाईन देईल. तेव्हा आपण त्याचाबरोबर ईल वगैरे माशांच्या गप्पा मारू व त्याचा विश्वास संपादन करू.

शिवाय स्थानिक गावगप्पा मारून, काही हाती लागते आहे का ते बघू."

सकाळी होम्सच्या असे लक्षात आले की बार्न्रे त्याच्या कुत्र्याला घेऊन बाहेर पडतो. मग अकरा वाजता थोडे चालायला म्हणून आम्ही बाहेर पडलो आणि आम्ही त्याच्याकडून त्या जातिवंत कुत्र्याला, आमच्याबरोबर नेण्याची परवानगी मिळवली. आम्ही शॉसकोंब बागेच्या दोन उंच दरवाज्यांशी आलो. गरुडाचे डोके व पंख आणि सिंहाचे शरीर असलेला विचित्र राक्षसी प्राणी तिथे उंचावर बसवलेला होता. होम्स म्हणाला, "हीच ती जागा. बार्नेने मला सांगितले होते, की ती लेडी आत्ता बग्गीतून इथे चक्कर मारते व तेव्हा दरवाजे उघडतात. ते वाहन अर्थातच थोडे हळू जाते. वॉटसन, तू त्या बग्गी चालवणाऱ्याशी, काहीतरी प्रश्न विचारण्याचा बहाणा करून बोलायला थांब. माझी काळजी करू नकोस. मी या झुडुपामागे उभा राहून, मला काय दिसते ते बघीन."

आम्हाला फार वाट पहावी लागली नाही. पाऊण तासात एक पिवळसर उघडी बग्गी लांबून, आम्हाला येताना दिसली. त्याला दोन देखणे, करड्या रंगाचे, डौलदारपणे टापा टाकणारे घोडे जोडलेले होते. होम्स कुत्र्याला घेऊन झुडुपामागे गेला. मी सहज हातातील काठी हलवत, रस्त्यात उभा राहीलो. बग्गी चालवणारा जोरात बग्गी चालवत दारापर्यंत गेला. दारे उघडली जाताना, बग्गीचा वेग कमी झाला व मला आत कोण बसले आहे ते बघता आले. रंगीत कपडे घातलेली एक तरूण स्त्री ,डाव्या बाजूला बसली होती. तिचे डोळे उद्धट दिसत होते. तिच्या उजवीकडे वाकलेल्या पाठीवर व तोंडावर शाल लपेटून घेतलेली एक वयस्क बाई बसली होती. तीच ती अपंग लेडी बिट्राइस असल्याचे मी मी ओळखले. जेव्हा बग्गी रस्त्याला लागली, तेव्हा, थोड्या मग्रुरीने मी हात उंचावला. बग्गी चालवणारा थांबला. मी त्याला विचारले की, शॉसकोंब राजवाड्यात सर रॉबर्ट आहेत का." त्याच वेळी तिथे होम्स अवतीर्ण झाला व त्याने कुत्र्याला मोकळे सोडले. एक आनंदाचा चित्कार काढून तो कुत्रा बग्गीकडे धावला व त्या बग्गीच्या पायरीवर उड्या मारू लागला. पण त्याचे उत्सुक हावभाव, लगेच रागीट झाले व काळा स्कर्ट त्याने तोंडाने फाडला.

“भरभर पुढे चल.” एक कठोर आवाज आला. बग्गी जोरात निघून गेली व आम्ही रस्त्यात उभे राहिलो.

“छान वॉटसन, हे चांगले झाले.” असे म्हणत होम्सने कुत्र्याला परत साखळीत अडकवले. “त्याला वाटले ती त्याची मालकीण आहे पण ती वेगळीच आहे हे त्याला कळले. कुत्रे चूक करत नाहीत.”

“पण तो आवाज तर एका पुरुषाचा होता.” मी ओरडलो.

“तेच तर! आपल्या हातात एक पत्ता आला आहे. पण आता आपल्याला सावधपणे पाऊले टाकायला हवीत.”

आता अजून काही करायचा माझ्या मित्राचा बेत दिसला नाही. आम्ही तळ्यावर जाऊन, छानपैकी मासे पकडले. आम्हाला माशांचे झकास जेवण मिळाले. नंतर होम्सने मला पुढील बेत सांगितला. आम्ही परत सकाळच्याच रस्त्याला लागलो. आम्हाला बागेची दारे लागली. एक उंच काळसर आकृती, आमची वाट बघत उभी होती. तो घोड्यांचा प्रशिक्षक जॉन मेसन होता.

तो म्हणाला, ““नमस्कार. तुमचे पत्र मिळाले. सर रॉबर्ट अजून परतलेले नाहीत. पण आज रात्री परतणार आहेत.”

होम्सने विचारले, “थडग्यांची जागा घरापासून किती दूर आहे? मिस्टर मेसन, तुम्ही आम्हाला ती दाखवा व मग तुम्ही जाऊ शकता.”

खूप अंधार होता. चंद्रप्रकाशही नव्हता. पण मेसनने आम्हाला गवताळ जागेतून नेऊन, जुने प्रार्थनास्थळ अस्पष्ट दिसेपर्यंत मार्ग दाखवला. एके काळी बांधीव छप्पर असलेल्या त्या इमारतीत शिरायच्या जागेची, आता पडझड झाली होती. तिथून आम्ही आत शिरलो. दगडांच्या ढिगाऱ्यातून अडखळत मार्ग काढत, आमचा मार्गदर्शक इमारतीच्या कोपऱ्याशी पोचला. तिथून एका उभ्या जिन्याने खाली

थडग्याच्या जागेकडे जाता येत होते. ती कोंदट उदासी दाटून आलेली जागा, एक काडी पेटवून, मी थोडी प्रकाशमान केली. पडक्या भिंती, ओबडधोबड दगड, शवपेट्यांचे ढीग --- त्यातील काही लाकडी, तर काही शिशांच्या होत्या. त्यांचे उजवीकडील गोलाकार छतापर्यंत गेलेले, अंधारी, वास्तव, आमच्यासमोर आले. होम्सने कंदिल पेटवला. त्या शोककारक दृष्यामध्ये, एक पिवळसर छोटा बोगदा दिसला. शवपेटीच्या पट्ट्यांवरून प्रकाशकिरण परावर्तित होत होते. त्या पट्ट्यांवर राजघराण्याच्या खुणा असलेला, गरुडसिंहाचा छाप असलेल्या मुकुटाचा ठसा, मृत्यूच्या दारापर्यंतही दृगोचर होत होता.

"मिस्टर मेसन, तुम्ही काही हाडांबद्दल बोलला होतात. तुम्ही जाण्यापूर्वी आम्हाला ती दाखवाल का?"

"ती इथे कोपऱ्यात आहेत. तो प्रशिक्षक तिथे चालत गेला व आश्चर्याने शांतपणे उभा राहिला. त्याठिकाणी आम्ही उजेड पाडल्यावर तो ओरडला, "तिथे काहीच नाही. हजार वर्षांपूर्वीची मृत व्यक्तीची हाडे जाळायचे कुणाला काय कारण?"

होम्स म्हणाला, "तेच तर आपल्याला शोधून काढायचे आहे. खूप वेळ लागेल. कदाचित आता तुम्ही गेलात तरी चालेल. मला वाटतं, सकाळपूर्वी हे रहस्य उकललेले असेल."

जेव्हा मेसन गेला तेव्हा होम्स कामाला लागला. स्मशानाची काळजीपूर्वक परीक्षा केली. पार सॅक्सनच्या काळापासून सुरवात करून, मध्यकालीन नॉर्मन ह्युगो व ओडोस याच्या काळापर्यंत आम्ही येऊन ठेपलो. मग सर विल्यम्स व सर डेनिस फाल्डर यांच्या अठराव्या शतकापर्यंत आलो. साधारण तासापूर्वी होम्स एका शिशाच्या थडग्यापर्यंत येऊन पोचला. तिथून एक घुमट दिसत होता. त्याचा समाधानाचा सुस्कारा मी ऐकला. काही घाईने केलेल्या हालचालींवरून तो

उद्दीष्टापर्यंत पोचल्याचे मला कळले. एका जड झाकणाच्या कडेचे तो भिंगाने निरीक्षण करत होता. मग त्याने खिशातून एक छोटे हत्यार काढले व ते तेथील एका भोकात घालून, काही फासे उलगडून, ते उघडण्याचा प्रयत्न केला. करकर असा आवाज झाला व ते थोडे मागे गेल्यासारखे झाले. आतले थोडेफार दिसू लागले. तेवढ्यात अचानक काही बाधा आली.

त्या तिथे वरती, कोणीतरी आल्याचा आवाज आला. ठाम व भरभर टाकलेल्या पावलांवरून, तेथील खडानखडा माहिती असलेला कुणीतरी विशिष्ट उद्देशाने आला असल्याचे जाणवले. जिन्यातून खाली उजेड आला आणि तो पाडणारा माणूस क्षणार्धात त्या गोथिक शैलीच्या कमानीखाली येऊन, उभा ठाकला. त्याच्या हातातील कंदिलाच्या उजेडात त्याची दणकट, मिशाळ चेहऱ्याची व रागीट डोळ्यांची आकृती प्रत्येक भिंतीतील थडग्यावरून नजर फिरवत, शेवटी मी व माझ्या मित्रावर स्थिरावली.

तो गरजला, "कुणी इथे यायचे साहस केले आहे? या माझ्या मालकीच्या जागेत तुम्ही काय करत आहात? जेव्हा होम्सने काहीच उत्तर दिले नाही, तेव्हा तो काही पाऊले पुढे आला व हातातील काठी उगारून म्हणाला, "ऐकू येते आहे का? तुम्ही कोण आहात? इथे काय करत आहात?" त्याचा आवाज घुमला.

पण माघार घेण्याऐवजी, होम्स त्याला भेटण्यासाठी पुढे सरसावला.

"सर रॉबर्ट, मलाही तुम्हाला प्रश्न विचारायचा आहे. हे कोण आहे? इथे काय करत आहे?" होम्सने आक्रमक पवित्रा घेत विचारले.

तो वळला व शवपेटीचे झाकण उघडले. कंदिलाच्या उजेडात, डोक्यापासून पायांपर्यंत कशात तरी गुंडाळलेले एक प्रेत मी पाहिले. नाक व हनुवटी पूर्णपणे एका

बाजूला लोंबत असलेले व चकाकणारे डोळे असे भयंकर चेटकिणीसारखे दिसणारे ते प्रेत होते. तो विदीर्ण चेहरा बघवत नव्हता.

तो उमराव किंकाळी मारून, एका दगडी पडक्या भिंतीला टेकून उभा राहीला.

“तुम्हाला कसे काय हे माहिती झाले? या नसत्या उठाठेवी तुम्हाला कोणी सांगितल्या आहेत?” तो परत त्याच्या भांडखोर आवाजात म्हणाला.

माझा मित्र म्हणाला, “माझे नाव शेरलॉक होम्स. बहुतेक ते तुम्हाला माहिती असेल. प्रत्येक चांगल्या नागरिकासारखे कायदा पाळणे हे माझे कर्तव्य आहे. मला वाटतं तुमच्याकडे मला उत्तर देण्यासारखे बरेच काही आहे.”

क्षणभर सर रॉबर्ट रोखून बघत राहीला. पण होम्सचा समंजस, शांत आवाज व ठामपणा; याचा त्याच्यावर परिणाम झाला.

“अरे देवा, मिस्टर होम्स, जरा सबुरीनेच घ्या. वरवर पहाता हे सर्व माझ्याविरुध्ध जाणारे वाटत असेल. पण मला असे करण्याशिवाय, काही इलाजच नव्हता.”

“असे असेल, तर मला आनंदच आहे. पण तुमचे स्पष्टीकरण, पोलिसांसमोर व्हायला हवे.”

सर रॉबर्टने त्याचे रुंद खांदे उडवले.

“ठीक आहे. तसे तर तसे. घरी चला व काय, कसे घडले त्याचा तुम्ही निवाडा करा.”

पाऊण तासाने आम्ही जुन्या घराच्या मगे असलेल्या बंदुकीच्या खोलीत होतो. तिथे बऱ्यापैकी फर्निचर होते. इथे सर रॉबर्टने आम्हाला एकटे सोडले. तो परत

आला तेव्हा त्याचाबरोबर दोघेजण होते. त्याच्या पैकी एकजण, म्हणजे लालसर चेहऱ्याची व गर्विष्ठ हावभावांची तरूण स्त्री होती. तिला मी त्या दिवशी बग्गीत पाहिले होते. दुसरा एक उंदरासारखे तोंड असलेला व बेदरकार, छुपा रुस्तुम दिसणारा मनुष्य होता. त्या दोघांचेही दिसणे घाबरवणारे होते. त्या उमरावावर आता बाजी उलटल्याचे, त्याने अजून त्या दोघाना सांगितले नसावे.

सर रॉबर्ट हाताने दर्शवत असे म्हणाला, “हे मिस्टर नॉरलेट व या मिसेस नॉरलेट उर्फ कॅरी इव्हान्स. ही गेली काही वर्षे, माझ्या बहिणीची विश्वासू नोकरांणी म्हणून काम करते आहे. मी या दोघाना इथे आणले आहे, कारण मला खरीखुरी हकीगत तुम्हाला सांगायची आहे. जगाच्या पाठीवर हे दोनच लोक असे आहेत, की जे माझ्या बोलण्याला दुजोरा देऊ शकतात.

ती बाई किंचाळली, “सर रॉबर्ट याची काय गरज आहे? तुम्ही काय करत आहात, ते तुम्हाला कळते आहे का?”

“माझे म्हणाल, तर मी ही जबाबदारी पूर्ण नाकारतो.” तिचा नवरा बोलला.

सर रॉबर्टने त्याच्याकडे तुच्छतेने पाहीले व म्हणाला, “मी सर्व जबाबदारी घेतो. मिस्टर होम्स, आता काय घडले ते मी जसेच्या तसे सांगतो.”

“तुम्हाला बऱ्याच गोष्टी माहीत आहेतच. नाहीतर तुम्ही इथे पोचलाच नसतात. त्यामुळे तुम्हाला सगळ्या शक्यता माहिती आहेत. मी एक घोडा शर्यतीत उतरवला आहे. आणि सर्व काही तो जिंकण्यावर अवलंबून आहे. मी जिंकलो तर सर्व सोपेच आहे. आणि हरलो तर — बापरे, मी त्याचा विचारही करू शकत नाही.”

होम्स म्हणाला, “ मी तुमची अवस्था समजू शकतो.”

“मी लेडी बिट्राइस या माझ्या बहिणीवर, सर्व गोष्टींसाठी अवलंबून आहे. पण हे जगजाहीर आहे की, तिचा तिच्या इस्टेटीमध्ये असलेला रस, फक्त तिच्या आयुष्यापुरताच मर्यादित आहे. आणि मी सर्वस्वी त्यावर अवलंबून आहे. जर माझी बहीण वारली, तर माझे देणेकरी या इस्टेटीवर गिधाडासारखे तुटून पडतील. सगळे, ते हिसकावून घेतील. माझे घोडे, तबेले सर्व काही! बरका, मिस्टर होम्स, माझी बहीण एक आठवड्यापूर्वी खरेच वारली.”

“आणि तुम्ही कुणालाच सांगितले नाही?”

“मी काय करणार? मी अगदी खचून गेलो. जर मी तीन आठवड्याकरता हे पुढे ढकलू शकलो, तर बरे असे मला वाटले. या बाईचा नवरा नट आहे --- हाच तो माणूस! आम्हाला,--- मला असे सुचले की या थोडक्या काळाकरता तो माझ्या बहिणीची भूमिका करू शकतो. रोज बग्गीत बसून फेरफटका मारायचा, एवढेच त्याला करायचे होते. बाकी बहिणीच्या खोलीत ही नोकरांणी सोडून कुणीच जात नव्हते. हे जमवून आणायला अवघड नव्हते. माझी बहीण जलोदराने गेली. तिला तो त्रास, गेली काही वर्षे होता.“

“ते पोलीस व डॉक्टर ठरवतील.”

“तिचे शव इथे ठेवता येईना. पहिल्या रात्री मिस्टर नॉरलेट व मी, ते जुन्या घरात आणले. ते घर सध्या वापरात नाही. पण आमच्या मागोमाग तिचा पाळलेला कुत्रा आला. तो सतत दारापर्यंत येऊन, भुंकत राहिला. म्हणून मग त्याच्यासाठी, एका सुरक्षित जागेची गरज वाटू लागली. मग त्याची सोय लाऊन, आम्ही शव प्रार्थनास्थळातील जागेमध्ये हलवले. मिस्टर होम्स, यात काही अपप्रकार किंवा वेडेवाकडे काही नव्हते. मला असे वाटत नाही की, मी काही भयंकर गुन्हा केला आहे.”

"पण तुमचे वर्तन माफ करण्याजोगे नाही, मिस्टर रॉबर्ट."

त्या उमरावाने अधीरपणे मान हलवली. तो म्हणाला, "उपदेश करणे सोपे आहे. जर तुम्ही माझ्या जागी असता, तर काय केले असते ते बघा. बेत उध्वस्त झालेले व आशा धुळीला मिळालेल्या कोणीच सहन करू शकणार नाही. ते देखील अगदी शेवटच्या क्षणी! त्यातून बचावाचा मार्ग कोणीही शोधणारच. जर माझ्या बहिणीचे शव मी तिच्या नवऱ्याच्या पूर्वजांच्या एखाद्या शवपेटीत ठेवले --- फक्त काही काळासाठी --- तर ते काही वाईट ठरणार नाही. आम्ही अशी एक शवपेटीका उघडली. त्यातील जुनेपुराणे प्रेत आम्ही तसेच झाकून जमिनीवर तर ठेऊ शकत नव्हतो. नॉरलेट व मी दोघांनी रात्री ते काढून बाहेर ठेवायचे काम गुपचूप केले. मग त्याने ते मध्यवर्ती शेकोटीत जाळले. मिस्टर होम्स, अशी एकंदरीत ही हकीगत आहे. तुम्ही मला कोंडीत पकडल्याने, मी हे सर्व तुम्हाला अगदी काहीही हातचे राखून न ठेवता सांगितले आहे."

थोडा वेळ होम्स विचार करत बसून राहीला. शेवटी तो म्हणाला, "सर रॉबर्ट, तुमच्या सांगण्यात एक विसंगती दिसते, तुम्ही रेसवर बोली लावली आहे व त्यावर तुमच्या भविष्यातील आशा अवलंबून आहेत. समजा, तुमच्या देणेकऱ्यांनी तुमची इस्टेट लुबाडली, तर घोड्यांचे काय?"

"घोडा हा इस्टेटीचाच भाग आहे. देणेकरी घोडेही ताब्यात घेतील. त्यांना माझ्या रेसमध्ये जिंकण्याची काय पर्वा आहे? अशी शक्यता आहे की ते प्रिन्सला रेसमध्ये पळविणारच नाहीत. दुर्दैवाने माझा मुख्य देणेकरी  माझा पक्का शत्रू, अत्यंत हलकट असलेला, सॅम ब्रुअर आहे. न्यूमार्केटच्या रेसकोर्सवर एकदा मी त्याला चाबकाने बडवला होता. तुम्हाला असं वाटत का की तो माझ्या बाजूने उभा राहून, मला मदत करेल?"

होम्स उठत म्हणाला, “हे बघा, मिस्टर रॉबर्ट, हे प्रकरण पोलिसांचे आहे. हे उजेडात आणणे माझे काम होते. ते आता झाले आहे. तुमच्या वागण्यातील चांगुलपणा वा तत्वनिष्ठा याबद्दल मी मतप्रदर्शन करणार नाही. वॉटसन, जवळजवळ मध्यरात्र झालेली आहे. मला वाटतं, आपण आपल्या लॉजवर परत जाऊ”.

आता हे सर्वांना माहिती झाले आहे की ही घटना सुखांत ठरली कारण सर रॉबर्टचे कृत्य गुन्हा ठरले नाही. घोड्यांची शर्यत प्रिन्सने जिंकली. मालकाला नगद ऐंशी हजार पौंड मिळाले व देणेकरी रेस संपेपर्यंत थांबले. त्यांचे सर्व पैसे रॉबर्टने परत केले. तरीही तो आयुष्यात बऱ्यापैकी पैसे राखून आहे .पोलीस व जज्ज यांनी, या घटनेकडे क्षमाशीलतेने पाहीले. फक्त लेडी बिट्राइसचा मृत्यू दडवून ठेवल्याबद्दल, रॉबर्टला शिव्याशाप बसले. सुदैवाने या विचित्र प्रसंगातून सर रॉबर्ट, ओरखडा न येता सुटला. ही गोष्ट आता घडून गेल्यात जमा झाली. त्याचे परिणाम, त्यातील आव्हाने, ही काळाच्या उदरात गडप झाली आहेत.

# लेडी फ्रान्सिस गायब



"पण टर्किश का?" माझ्या बुटांकडे एकटक पहात शेरलॉक होम्सने विचारले. मी त्यावेळी केनच्या खुर्चीत  पाठीवीर रेलून बसलो होतो. चौकस शेरलॉकचे लक्ष, माझ्या पुढे आलेल्या पायांकडे गेले. "टर्किश नाहीत, ते इंग्लिश आहेत. ते मला ऑक्सफर्ड रस्त्यावर मिळाले." मी आश्चर्याने म्हणालो. मनातून वैतागलेला असूनही शांत चेहरा ठेऊन, शेरलॉक हसला.

"टर्किश आंघोळ! पण घरी केलेली चांगली प्रसन्नता देणारी आंघोळ सोडून, ही चैनीची टर्किश आंघोळ कशासाठी?"

“कारण गेले काही दिवस थकवा येऊन, मला सांधे धरल्यासारखे वाटते आहे. टर्किश बाथ घेतल्याने आरोग्य सुधारेल, असे मला वाटले. ते एक नवीन प्रकारचे, तजेला देणारे औषध आहे. पण बरंका शेरलॉक, माझे बूट व टर्किश अंघोळ यात काही संबंध आहे, असे तुझ्या तर्कशास्त्रीय बुद्धीला जरी वाटत असले तरी, मला पामराला तू तो संबंध दाखवून दिलास, तर बरं होईल.”

शेरलॉक डोळे मिचकावून बोलला, “तर्क करणे फारसे अवघड नाही, वॉटसन. ‘सकाळी तुझ्याबरोबर खोलीत कोण होते’ असे साधे उदाहरण देऊन मी अगदी प्राथमिक स्वरूपाचे तर्क करू शकतो.”

“नवीन उदाहरण देणे म्हणजे समजावून सांगणे आहे, हे मला कबूल नाही.” मी जरा चिडून म्हणालो.

“वाः वॉटसन! अगदी तर्कसुसंगत विचार. आता माझ्या निष्कर्षासाठी काय काय मुद्दे आहेत बघूया. सर्वात शेवटचा प्रथम घेऊ. बग्गी! तुझ्या कोटाच्या डाव्या हातावर व खांद्यावर काही शिंतोडे असल्याचे तुझ्या लक्षात येते आहे का? जर तू बग्गीच्या मध्यभागी बसला असतास, तर असे शिंतोडे उडाले नसते आणि उडालेच असते तर ते दोन्ही बाजूला असते. म्हणून हे उघड आहे की तू कडेला बसला होतास. म्हणून हेही उघड आहे की कोणीतरी तुझ्याबरोबर होते.”

“ते तर स्पष्टच आहे.”

“फारच सोपे. नाही का?”

“पण बूट आणि अंघोळ?”

“अगदीच सोपे! तुला तुझे बूट हवेत उंच करायची सवय आहे. शिवाय तुझे दुहेरी बंदानी बूट बांधलेले मला आताही दिसत आहेत. पण असे, तू नेहमी बांधत

नाहीस. म्हणजे तू ते नक्कीच काढले होतेस. ते कुणी बांधले? चांभाराने की अंघोळ घालणाऱ्या पोऱ्याने? चांभार असण्याचा संभव कमीच, कारण तुझे बूट जवळजवळ नवे आहेत. बरं आता काय राहिले? स्नानागारातील आंघोळ. अगदीच विचित्र, नाही का? परंतु टर्किश आंघोळीने काम केले आहे.'

"काय ते?"

"तू म्हणालास, तुला जरा बदल हवा होता म्हणून तू टर्किश आंघोळ घेतलीस. मला असं म्हणायचं आहे की ते तू चांगलेच केलेस. पण बदलासाठी स्वित्झर्लंडमधील लुसाने कसे वाटते? मोठ्या इतमामाने. तुला सर्व खर्च व प्रवासाचे पहिल्या वर्गाचे तिकीटही मिळणार आहे."

"छान. छान. पण का?"

होम्स आरामखुर्चीत मागे रेलून बसला व खिशातून वही काढली. "जगातील सर्वात धोकादायक वर्गापैकी! " तो म्हणाला "भरकटलेली व एकाकी स्त्री! तशी ती निरुपद्रवी असते, पण मरण ओढवून घ्यायला फारच नामी! दुसऱ्याला अपरिहार्यपणे गुन्हे करायला, ती प्रवृत्त करते. ती अगतिक असते. फिरत असते. या हॉटेलातून त्या हॉटेलात! या देशातून त्या देशात! फिरायला ती भरपूर श्रीमंत असते. नेहमीच नाही तरी, कधी ना कधी, ती एखाद्या आडबाजूच्या निवासस्थानी, सापळयात अडकणारच. लबाड कोल्ह्यांच्या जगात, ती कोवळी काकडीच ठरते. जेव्हा ती कच्ची खाल्ली जाते, तेव्हा ती ते क्वचितच टाळू शकते. लेडी फ्रान्सिसवर, नक्कीच काहीतरी संकट कोसळले असल्याची मला भीती वाटते."

सर्वसामान्याकडून विशेषाकडे शेरलॉक झटकन घसरलेला बघून, मी निःश्वास टाकला. होम्स त्याची वही चाळू लागला.

“लेडी फ्रान्सिस म्हणजे स्वर्गवासी अर्ल रफ्टन याच्या घराण्याची एकमेव वारस!” शेरलॉक बोलला. ”तुला आठवत असेल की बरीचशी संपत्ती इतर नातेवाईक पुरुषाना गेली तरी, हिरे व चांदीचे जडजवाहीर लेडी फ्रान्सिसच्या वाट्याला आले. त्यावर तिचा फारच जीव होता. ती ते कधीच बँकेत ठेवत नसे. नेहमी स्वतःजवळच बाळगत असे. दयनीय व्यक्ती! लेडी फ्रान्सिस. मध्यमवयीन व अजूनही रूपवान असणारी! वीस वर्षांपूर्वी ती चांगल्या अवस्थेत होती .पण आता चमत्कारिक रित्या बेवारशी झाली आहे.”

“काय झाले तिला?”

“ओहो! तिला काय झाले? ती जिवंत आहे की मेली आहे तेच तर कोडे आहे. ती तशी सवयीची पक्की आहे. गेली चार वर्षे न चुकता तिची गव्हर्नेस मिस डॉबनेला ती पत्र पाठवते. ती तिची जुनी गव्हर्नेस आहे. ती निवृत्त असून सध्या कंबरवेलला रहाते. ह्या मिस डॉबनेने माझा सल्ला विचारला आहे. जवळजवळ पाच आठवड्यात लेडी फ्रान्सिसची बोटभर चिठ्ठीही नाही. सर्वजण काळजीत पडले आहेत. शेवटचे पत्र लुसाने येथील नॅशनल हॉटलमधून लिहिलेले आहे, त्यानंतर ती कुठे गेली ते कळतच नाही. हे श्रीमंत कूळ असल्याने, आपण ही केस यशस्वीपणे हाताळली तर मग आपल्याला पैशांची काहीच कमी नाही.”

“पण मिस डॉबने, एवढाच एकमेव माहितीचा स्त्रोत आहे? इतर काही धागेदोरे असतीलच की!”

“एक अगदी खात्रीचा स्त्रोत आहे, वॉटसन. आणि तो म्हणजे बँक. या राजघराण्यातील एकट्यादुकट्या बायकाना, जगण्यासाठी आवश्यक असते ते त्यांचे पासबुक. ते एक प्रकारे, त्यांची रोजनिशीच असते. सिल्वेस्टर येथील बँकेत, तिचे खाते आहे. मी त्यावर नजर टाकली. शेवटून दुसऱ्या चेकने, तिने लुसाने येथील हॉटेलचे

बिल भरले आहे. पण रक्कम खूप मोठी दिसते आहे. तरी बरेच पैसे तिच्या हातात उरले असणार. त्यानंतर एकच चेक दिला गेला आहे.’

कुठे आणि कोणाला?”

“मिस मेरी डिव्हाइनला. पण चेक कुठे दिला ते कळायला काही मार्ग नाही. मॉंटलीअरमधील ल्यानाइसमध्ये, तो तीन आठवड्याच्या आत वटला. रक्कम होती पन्नास पौंड.”

“मिस मेरी डिव्हाइन कोण?”

“ते मी शोधून काढले. ती लेडी फ्रान्सिसची नोकरांणी होती. पण तिला हा चेक का दिला ते मात्र कळत नाही. पण तुझे गुप्तहेर लवकरच ते शोधून काढतील, याची मला खात्री आहे.”

“माझे गुप्तहेर?”

“म्हणूनच लुसानेची आरोग्यवर्धक मोहीम. तुला माहिती आहे की, वृध्द अब्राहम मरणासन्न असताना मी लंडन सोडू शकत नाही. शिवाय मी इथून न हलणे, चांगलेच आहे. स्कॉटलंड यार्ड माझ्याशिवाय सुने वाटते आणि गुन्हेगारांमध्ये एक प्रकारचे अनारोग्यवर्धक असे वातावरण तयार होते. तर जा, माझ्या मित्रा वॉटसन, जर माझ्या नम्र सल्ल्याची तुला गरज लागलीच तर, मी तुला तार करीन. पण शब्दाला दोन डॉलर पडतात हे तुला माहिती आहे ना?’

दोन दिवसांनी मी लुसाने येथील, हॉटेल नॅशनलमध्ये होतो. तेथील व्यवस्थापक मिस्टर मोझर, यांनी माझी उत्तम व्यवस्था ठेवली. त्यांनी दिलेल्या माहिती प्रमाणे, लेडी फ्रान्सिस इथे अनेक महिने मुक्काम करून होती. तिला भेटलेल्या सर्वांनाच ती फार आवडली. अजूनही ती सुंदरातच, गणली गेली असती. मिस्टर

मोझर याना जडजवाहिराबद्दल मात्र, काही माहिती नव्हती. पण हॉटेलातील नोकरांच्या हे लक्षात आले होते, की लेडी फ्रान्सिसच्या शयनकक्षातील पलंगाखाली एक जड बॅग नेहमीच लक्षपूर्वक रित्या कुलुपबंद करून ठेवलेली असते. मिस मेरी डिव्हाइन ही सुद्धा तिच्या मालकिणीइतकीच, लोकप्रिय होती. तिचे त्या हॉटेलमधील मुख्य वेटरबरोबर, प्रेमसंबंध जुळले होते. तिचा पत्ता मिळवणे काही अवघड नव्हते. ११, रुडी ट्रॅजन, माँटपेलीअर असा तिचा पत्ता होता. हे सर्व मी थोडक्यात लिहून घेतले. मला वाटते स्वतः होम्सने सुद्धा यापेक्षा अधिक कुशलपणे माहिती गोळा केली नसती.

फक्त एकच गोष्ट अजून दडलेली राहिली. लेडी फ्रान्सिसच्या एकाएकी नाहीसे होण्यावर मात्र अजून प्रकाश पडत नव्हता. तळ्याकाठी असलेल्या तिच्या आलिशान स्वीटमध्ये ती अनेक महिने राहिली, हे ठीक वाटते. तरीही फक्त एका दिवसाच्या पूर्वसूचनेवर, ती एकदम नाहीशी झाली. त्यामुळे तिला फुकट आठवड्याचे भाडे भरावे लागले. ज्यूल विबर्ट, त्या नोकराणीचा प्रियकर, तो काही सांगू शकेल असे मला वाटले. एक उंच काळा दाढीवाला मनुष्य एकदोन दिवसापूर्वी हॉटेलमध्ये आला होता. त्याच्याशी बाईसाहेबांचा नाहीसे होण्याचा संबंध असावा असे ज्यूलला वाटत होते. तो म्हणाला, “भयंकर क्रूर नरपशू, गावात दुसरीकडे कुठेतरी तो रहात होता. तळ्याकाठी फिरण्याच्या निमित्ताने, बाईसाहेबांशी ठामपणे काहीतरी बोलताना, मी त्याला पाहिले होते. नंतर त्याने बाईसाहेबांना भेटायला बोलावले होते, पण त्या गेल्या नाहीत. तो इंग्रज होता. त्याचे नाव मात्र लेखी स्वरूपात सापडले नाही. त्यानंतर लगेच बाईसाहेबांनी येथून प्रयाण केले.”

ज्यूलला व त्याहीपेक्षा मेरीला त्या माणसाचे येणे व बाईसाहेबांचे इथून नाहीसे होणे यात काहीतरी कार्यकारण संबंध दिसत होता. एकाच गोष्टीची ज्यूलबरोबर चर्चा झाली नाही, ती ही की मेरीने आपल्या मालकिणीची नोकरी का

सोडली. त्याबद्दल तो काही बोलू शकला नाही किंवा बोलला नाही. मॉटपेलीअरला जाऊन, मेरीशी याबद्दल बोलावे असा विचार मी केला.

अशा तऱ्हेने चौकशीचा पहिला अंक संपला. लुसाने सोडल्यावर, लेडी फ्रान्सिसने जिथे मुक्काम केला त्याबद्दल आता दुसरा अंक! त्याबद्दल काहीतरी गुप्तता होती. बहुधा तिच्या मागावर कोणीतरी असावे व त्याला टाळण्यासाठी ती अचानक नाहीशी झाली असावी. नाहीतर तिचे सामान उघडपणे बदेनला जाण्यासाठी का बांधले गेले नसते? ती व तिचे सामान दोन्ही आडवळणाने, बदेनमधील मोनिष स्पा येथे पोचले. कुकच्या स्थानिक कार्यालयातून, मला एवढीच माहिती मिळाली. मी बदेनला गेलो. आतापर्यंत हाती आलेले सर्व धागेदोरे पत्राने होम्सला कळवले. त्याची विनोदी, प्रशंसापर तारही मिळाली.

बदेनला तिचा माग काढणे फारसे अवघड नव्हते. पंधरा दिवस मिस फ्रान्सिस, इग्लीश्चर हॉफ इथे होती. तिथे तिची डॉ श्लेसिंजर व मिसेस श्लेसिंजर,यांच्याबरोबर चांगली ओळख झाली. डॉ श्लेसिंजर दक्षिण अमेरिकेतील मिशनरी होते. सर्वसाधारणपणे एकाकी स्त्रियांना वाटते तसे समाधान व उद्योगरत असल्याची जाणीव, मिस फ्रान्सिसला धर्मामुळे झाली. डॉ श्लेसिंजर यांचे लक्षणीय व्यक्तिमत्व, झोकून देऊन काम करण्याची वृत्ती व मुख्य धर्मप्रेषिताचे कर्तव्य करत असताना झालेल्या धावपळीमुळे उद्भवलेल्या, आजारपणातून नुकतीच सावरू लागलेली तब्येत, याचा मिस फ्रान्सिसवर फार खोलवर प्रभाव पडला. त्या थोर विभूतीच्या शुश्रूषेसाठी, ती मिसेस श्लेसिंजर याना मदत करू लागली. हॉटेल व्यवस्थापकाने मला सांगितले, “व्हरांड्यातील आरामखुर्चीवर बसून, डॉ श्लेसिंजर यांचा सबंध दिवस जाई. खुर्चीच्या दोन्ही बाजूला त्यांची देखभाल करणाऱ्या परिचारिका असत. डॉ श्लेसिंजर, पवित्र भूमिचा एक नकाशा तयार करत होते व त्यात खास उल्लेख असलेल्या मिडीयानीटीसच्या राज्यावर ते एक शोधनिबंध लिहित होते.

नंतर तब्येत बरीचशी सुधारल्यावर, ते व त्यांची बायको लंडनला गेले. मिस फ्रान्सिसदेखील त्यांच्याबरोबर होती." ही सुमारे तीन आठवड्यापूर्वीची गोष्ट होती व त्यानंतरचे त्या व्यवस्थापकाला काही माहिती नव्हते.

त्यापूर्वी काही दिवस, मेरी खूपसा अश्रुपात करून कुठेतरी निघून गेली. इतर नोकराणींना तिने सांगितले की बाईसाहेबांची नोकरी तिने कायमची सोडली आहे. डॉ श्लेसिंजर यांनी जाण्यापूर्वी सर्वांचे बिल भरले.

"मिस फ्रान्सिसची चौकशी करणारे, तुम्ही काही एकटेच नाही. आठवड्यापूर्वीच एकजण, बाईसाहेबांची चौकशी करत आला होता." व्यवस्थापक म्हणाला.

"त्यांने नाव सांगितले का?"

"तो इंग्लिश असावा पण वेगळाच वाटत होता."

"रासवट होता का?" माझ्या मित्राच्या, शेरलॉकच्या तर्क करण्याच्या पद्धतीला धरून मी म्हणालो.

"बरोबर. तसाच वाटत होता. दाढीवाला, जाडा व रापलेला असा तो, या हॉटेलपेक्षा एखाद्या शेतकऱ्याच्या खानावळीत जास्त शोभून दिसला असता. फार भीतीदायक व उबग येईल असाच तो होता."

धुके बाजूला होऊन आकृत्या स्पष्ट दिसू लागाव्यात त्याप्रमाणे, गूढ उकलायला सुरवात झाल्यासारखे वाटत होते.

एका चांगल्या धार्मिक प्रवृत्तीच्या बाईचा, जागोजागी एका खलप्रवृत्तीच्या अज्ञात व्यक्तीकडून पाठलाग केला जात होता. ती लुसाने सोडून गेली त्याअर्थी नक्कीच त्याला घाबरत असणार. अजूनही तो तिच्या मागावर होताच. आज ना उद्या तो तिला शोधून काढणारच होता. की आधीच त्याला तिचा मागमूस लागलेला आहे व

त्यामुळेच अनेक दिवसात मिस फ्रान्सिसचा काही ठावाठिकाणा नाही हे कळत नव्हते. मिस मेरी किंवा मिस डॉबने, कोणीच कसे तिला सावध केले नाही? दुष्ट कारवायांना व धाकदपटशाला बळी पडण्यापासून, कोणीच कसे तिला वाचवू शकले नाही? या सर्वामागे काय भीषण हेतू अथवा क्रूर डाव असावा? काहीतरी समस्या होती खरी व ती मला सोडवायची होती.

या सर्व प्रकरणाच्या मुळाशी खोलवर, ठामपणे व झटपट जाण्यात मी कसा यशस्वी झालो आहे याबद्दल मी होम्सला पत्र लिहिले. त्याने उत्तरादाखल तार पाठवली. त्यात त्याने, डॉ श्लेसिंजर यांच्या डाव्या कानाबद्दल वर्णन मागवले होते. होम्सच्या विनोदाच्या कल्पना विचित्रच आहेत. त्यामुळे त्याच्या या अवेळी केलेल्या विनोदाकडे मी काही लक्ष दिले नाही. होम्सची तार मिळण्यापूर्वीच मी मेरीच्या मागावर, माँटपेलीअर इथे जाऊन पोचलो होतो.

त्या नोकराणीला शोधून काढणे व तिच्याकडील सर्व माहिती गोळा करणे, यात काही कठीण नव्हते. ती तशी निष्ठावान वाटली. आपली मालकीण आता चांगल्या लोकांबरोबर आहे याची खात्री झाल्यामुळे, तिने नोकरी सोडली. शिवाय आता तिला लग्न करून घरसंसार थाटायचा असल्याने, नोकरी सोडणे अपरिहार्यच होते. लुसाने येथे असताना मिस फ्रान्सिस तिला एकदोनदा, वाट्टेल तसे टाकून बोलली व तिच्या प्रामाणिकपणाबद्दलही शंका घेतली. त्यामुळे ही नोकरी सोडणे तिला पूर्वी जितके जड गेले असते तितके गेले नाही अशी दुःखद कबुली मेरीने दिली. पन्नास पौंड लग्नाचा आहेर म्हणून तिला मिळाल्याचे, तिने सांगितले. तळयाकाठी असलेल्या हिरवळीवर बाईसाहेबांच्या कंबरेला धसमुसळेपणे विळखा घालताना, तिने स्वतःच्या डोळयांनी त्या अनोळखी इसमाला पाहिले होते. तो भयानक भीतीदायक मनुष्य होता. त्याच्या धमकावणीला भिऊनच मिस फ्रान्सिसने श्लेसिंजर पतीपत्नींबरोबर लंडनला जाणे मान्य केले असावे. या बाबतीत तिने तिच्या

नोकराणीला, मेरीला, काहीच सांगितले नव्हते. पण बारीकसारीक गोष्टींवरून मेरीची खात्री झाली होती की, बाईसाहेब सतत अस्वस्थ व उदास होत्या. एकाएकी, मेरी खुर्चीवरून उठली. आश्चर्य व भीती यामुळे तिचा चेहरा एकदम भयानक झाला. “तो बघा.” ती किंचाळली. “तो बघा नालायक, अजून सुगावा घेतो आहे. मी ज्याच्याबद्दल बोलले, तोच हा मनुष्य आहे.”

खिडकीतून मी एक काळाकभिन्न, धिप्पाड व दाढीचे खुंट वाढलेला इसम पाहिला. घराच्या क्रमांकाकडे बारकाईने पहात, रस्त्याचा मध्यावरून तो चालला होता. माझ्याप्रमाणे, तोही मेरीच्या मागावर होता. त्या क्षणाचा फायदा उठवून, मी ताबडतोब बाहेर पडलो व त्याला गाठले.

“तू कोणी इंग्रज दिसतोस.” मी बोललो.

“असलो तरी तुला काय त्याचे?” तो मगरुरीने म्हणाला.

“तुझे नाव काय, मी विचारू शकतो का?”

“नाही. ते विचारायची काही जरुरी नाही.”

अशी काही विचित्र परिस्थिती निर्माण झाली, की सर्व गोष्टो सरळसरळ विचारून टाकणे श्रेयस्कर, असे मी ठरवून टाकले.

“मिस फ्रान्सिस कुठे आहे?” मी विचारले.

त्याने माझ्याकडे, आश्चर्याने रोखून पाहिले.

“तू तिला काय केलेस? तू तिच्यामागे, का लागला होतास? मला उत्तर हवे आहे.” मी म्हणालो.

त्याने माझ्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला व एखाद्या वाघासारखा चवताळून तो माझ्याकडे झेपावला. मी माझा बचाव करायचा खूप प्रयत्न केला. पण त्याची पकड, म्हणजे वज्रमुष्टीच होती. एखाद्या क्रूर राक्षसासारखा तो धुमसत होता. त्याचा हात माझ्या मानेवर होता व मी जवळजवळ बेशुध्द पडलो होतो. तेवढ्यात समोरील नाईट क्लबमधून, एक नीलवस्त्रधारी आला व त्याने त्याच्या हातातील जाड सोट्याने, माझ्या हल्लेखोराच्या पुढच्या हातावर चांगले रट्टे हाणले. त्यामुळे त्याची माझ्यावरील पकड ढिली होऊन, मी बचावलो. परत हल्ला करावा की नाही असा विचार करत, रागाने जळफळत, तो क्षणभर थांबला. माझ्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकून, त्या भांडकुदळ माणसाने मला सोडले व मी जिथून बाहेर पडलो तिथे तो आत शिरला. रस्त्यात माझ्याजवळ उभ्या असलेल्या माझ्या रक्षणकर्त्याकडे, आभार मानण्यासाठी मी वळलो.

“वा वॉटसन, चांगलाच भानगडीत अडकत होतास. रात्रीच्या गाडीने तू माझ्याबरोबर लंडनला यावेस ते बरे.”

एक तासानंतर शेरलॉक होम्स त्याच्या नेहमीच्या पेहरावात व रुबाबात हॉटेलमधील माझ्या खासगी खोलीत बसला होता. त्याच्या अचानक पण संधी साधून झालेल्या आगमनाचे स्पष्टीकरण, अगदी साधे होते. मी प्रवासात कुठे असेन ते नेमकेपणाने हेरून, तो लंडनहून निघाला होता. एका कामगाराच्या वेषात, माझ्या पदार्पणाची जणू वाट बघत, तो नाईटक्लबमध्ये बसलेला होता.

“माझ्या प्रिय मित्रा वॉटसन, सुसंगत परंतु एकारलेला असा तपास, तू चालवलेला आहेस. याक्षणी तरी तू काही चुका केल्या आहेस, किंवा काही गोष्टी वगळलेल्या आहेस, असे मला वाटत नाही. सर्व दिशांनी तू जागरूकपणा दाखवला आहेस, परंतु रहस्यभेद काहीच झालेला नाही.”

"कदाचित याहून जास्त चांगले काही, तू देखील करू शकला नसतास." मी कडवटपणे म्हणालो.

"कदाचित! मी निश्चितच काहीतरी उत्तम केले आहे. हे बघ, मी कुणाला आणले आहे. हा मिस्टर फिलीप ग्रीन आहे. या हॉटेलमध्ये तो तुझ्याबरोबरच रहात आहे. यशस्वीपणे तपास लावण्यासाठी तो आपल्याला सुरवातीपासून सारे काही सांगेल.

एक कार्ड आत आले व त्यापाठोपाठ तो दाढीवाला आडदांड इसम आत आला. यानेच मला रस्त्यात मारले होते. माझ्याकडे पाहिल्यावर तो चपापला.

त्याने विचारले, "मिस्टर होम्स, हे काय? तुमची चिठ्ठी मिळाली, म्हणून मी आलो. पण या माणसाचे इथे काय काम आहे?"

"आपल्या या कामात मला मदत करणारा, हा माझा जुना मित्र व सहकारी आहे."

माफी मागत त्या धिप्पाड व रापलेल्या पाहुण्याने, माझ्याबरोबर हस्तांदोलन केले.

"तुम्हाला फारसे लागले नसेल, अशी मी आशा करतो. जेव्हा तुम्ही मला तिला दुखावल्याब्द्द्ल काही बोललात, तेव्हा माझा तोलच गेला. खरे तर मी अलीकडे ताळ्यावर नाही. वीजवाह्क तारांप्रमाणे, माझ्या नसा बनल्या आहेत. त्याला आता माझा काही इलाज नाही. मिस्टर होम्स, पहिल्याप्रथम हे सांगा, की या जगात माझ्या अस्तित्वाचा शोध तुम्हाला, लागला तरी कसा?"

"मिस फ्रान्सिसची गव्हर्नेस, मिस डॉबने हिच्याशी मी संपर्क ठेवून आहे."

“ती जुनी, काळी छत्री वापरणारी मिस डॉबने? मला ती चांगलीच आठवते आहे.”

“आणि तिलाही तू आठवतो आहेस. तू दक्षिण आफ्रिकेला निघून जाणे पसंत केलेस, त्यापूर्वीच्या दिवसातील ही गोष्ट आहे.”

“तुम्हाला तर माझी सगळी हकीगत माहिती दिसते आहे. मग तुमच्यापासून काही लपवायची जरुरी नाही. तुम्हाला देवाशप्पथ सांगतो होम्स, जगातील कुठल्याही पुरूषाने एखाद्या बाईवर केले नसेल, असे अत्यंत समर्पित प्रेम, मी फ्रान्सिसवर केले. इतर उतावीळ तरुणांसारखाच, मी तिच्यापायी पुरता पागल झालो होतो. पण तिचे मन गंगाजलाप्रमाणे पवित्र होते. सवंगपणाची छायासुद्धा, तिला असह्य होती. जेव्हा तिला माझ्या काळया कृत्यांची माहिती झाली, तेव्हा तिने माझे नावच टाकले. पण तरीही नवल म्हणजे तिचे माझ्यावरचे प्रेम मुळीच कमी झाले नाही. इतके पराकोटीचे प्रेम की त्यामुळे तिच्या भर तारुण्याच्या सोनेरी दिवसातही, ती अविवाहित राहिली. बार्बेरटॉनला राहून मी चिक्कार पैसे मिळवले. मध्यंतरी अनेक वर्षांचा काळ गेला. मला वाटले की, मी कदाचित तिला शोधून काढून, तिचे मन वळवू शकेन. तिने अजून लग्न न केल्याचे मी ऐकले होते. लुसानेला ती मला सापडली. मी माझ्याकडून प्रयत्नांची शिकस्त केली. ती विरघळली, पण तिचा निश्चय कायम होता असे दिसते. कारण मी तिला परत भेटायला बोलावले, तेव्हा ती हे शहर सोडूनच गेली. मी तिला बदेनपर्यंत शोधले. आणि नंतर मला असे समजले, की तिची नोकरांणी इथे आहे. मी तसा रांगडा मनुष्य आहे. माझे आयुष्य, तसे धोपटमार्गी नव्हतेच. त्यामुळे डॉ वॉटसन माझ्याबरोबर तशा प्रकारे बोलला, तेव्हा माझे डोके एकदम गरम झाले. पण कृपा करून मला सांगा, की फ्रान्सिसचे काय झाले?”

“तेच तर आम्हाला शोधून काढायचे आहे. मिस्टर ग्रीन, तुमचा लंडनचा पत्ता काय आहे?” शेरलॉक होम्स थंडपणे बोलला.

“मी हॉटेल लघेममध्ये रहातो.”

“मग तू तिथे परत जावेस, असा सल्ला मी तुला देऊ शकतो का? मात्र मला गरज लागल्यास, तू तिथे असशील असे बघ. मी तुला खोटी आशा दाखवत नाही पण मिस फ्रान्सिसच्या सुरक्षेसाठी, जे जे करावे लागेल, ते ते आम्ही अगदी खात्रीने करूच करू. या क्षणी मी अजून काही सांगू शकत नाही. हे माझे कार्ड घे म्हणजे तुला वाटल्यास, आमच्याशी संपर्क साधता येईल. आता आपण असे करू वॉटसन, तुझी बॅग तू आवरून ठेव. मी मिसेस ह्डसनना फोन करून, उद्या साडेसात वाजता आपल्या दोघांसाठी खास जेवण तयार करून ठेवायला सांगतो.”

आम्ही बेकर रस्त्यावरील आमच्या निवासस्थानी पोचलो, तेव्हा बदेनहून आलेली एक तार आमची प्रतिक्षा करत होती. मोठ्या उत्सुकतेने होम्सने ती वाचली व माझ्याकडे भिरकावली. ‘फाडून टाका किंवा टरकवा’ असा निरोप होता.

“हा काय प्रकार आहे?” मी विचारले

होम्स बोलला, “हे सर्व काही आहे. मी तुला या सभ्य कारकुंड्याच्या डाव्या कानासंबंधी काही सुसंगती नसलेले प्रश्न विचारले होते, ते आठवत असेल. तू त्याला काहीही उत्तर दिले नव्हतेस.“

“मी तेव्हा बदेनहून निघालो होतो. त्यामुळे उत्तर देऊ शकलो नाही.”

“त्यासाठी मी बदेनच्या इग्लीश्चर हॉफच्या व्यवस्थापकाकडे एकजण पाठवला होता. त्याचे उत्तर इथे पडले आहे.”

“यावरून काय दिसते आहे?”

“माझ्या प्रिय मित्रा वॉटसन, यावरून असे दिसते आहे की आपण एका टोकाच्या कावेबाज व भीतीदायक मनुष्याबरोबर वावरत आहोत. दक्षिण अमेरिकेचा मिशनरी, डॉ श्लेसिंजर! तोच तो होली पीटर आहे. ऑस्ट्रेलीयातून अर्धचंद्र देण्यात आलेला, पण नवख्या देशात मोठ्या रुबाबात वावरणारा! एकाकी व धार्मिक प्रवृत्तीच्या महिलाना फसवणे, ही त्याची खासियत आहे. आणि त्याची ती तथाकथित बायको, फ्रॅझर नावाची इंग्लिश बाई, त्याला शोभेल अशीच आहे. त्याच्या गनिमी काव्याच्या स्वरूपावरूनच, मला त्यांची ओळख पटली. ८९ साली बकिंगहॅमयेथील सलूनमध्ये झालेल्या मोठ्या मारामारीत, त्याला चांगलेच ठोकले गेले होते. त्यामुळे ती शारीरिक विशेषता ( डाव्या कानासंबंधी ) त्याच्यात आली आहे. त्यामुळे माझा संशय पक्का झाला. ती गरीब बिचारी बाई, त्या हलकट दांपत्याच्या हातात सापडली आहे. ते काहीही करू शकतील. मिस फ्रान्सिस जिवंत आहे की नाही, याचीच मला शंका आहे. आणि जर ती जिवंत असेल तर, नक्कीच नजरकैदेत असणार. म्हणूनच मिस डॉबने किंवा इतर कुणाच मित्रमंडळीना, तिची काही खबरबात नाही. ती लंडनला पोचलीच नसणार, कारण लंडनच्या पोलिसांची नोंद घेण्याची पद्धत लक्षात घेता, एखाद्या परकीयाला त्यांच्या हातावर तुरी देणे शक्य वाटत नाही. बरं, ती लंडनमधून गेली असेल असे म्हणावे तर तेही अशक्य वाटते. कारण त्या चोर लोकाना एखाद्याला नजरकैदेत ठेवायला याहून दुसरी कुठली उत्तम जागा मिळणार? माझा आतला आवाज मला सांगतो आहे की ती लंडनमध्येच असणार. पण आता आपल्या हातात तसा काही सबळ पुरावा नसल्याने, आपण एकच गोष्ट करू शकतो, ती म्हणजे मस्त जेवणावर आडवा हात मारून ताणून देणे. नंतर संध्याकाळी फिरायला बाहेर पडल्यावर, माझा स्कॉटलंड यार्डमधील मित्र लेस्ट्रेड, याच्याबरोबर मी बोलेन.“

पण सरकारी पोलीस काय किंवा होम्सची छोटीशी पण कार्यक्षम संस्था काय, गूढ उकलण्यात कोणीच यशस्वी झाले नाही. लाखो माणसे रहात असलेल्या लंडन शहरात, आम्ही शोध करत असलेल्या तीन व्यक्तींचा अजिबात मागमूस नव्हता. जणू त्या व्यक्ती कधी इथे रहातच नव्हत्या. जाहिराती देऊन पाहिल्या. पण व्यर्थ! इतर मार्गाने, काही धागेदोरे हाती येतात का असा प्रयत्न केला, पण त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. डॉ श्लेसिंजर याचा काहीतरी संबंध आला असेल, अशा गुन्ह्याच्या जागा व्यर्थ धुंडाळल्या. त्याचे जुने सहकारी शोधले, पण ते काही सांगू शकले नाहीत. सुमारे एक आठवड्याच्या निराशाजनक गूढतेनंतर, एकाएकी आशेची वीज चमकली. एक जुन्या स्पॅनिश डिझाइनचे रुपेरी चकचकीत पदक, बोव्हिंग्टन या वेस्टमिनिस्टर रस्त्यावरील एका दुकानात गहाण ठेवलेले आढळले. गहाण ठेवणारा एक धिप्पाड, गुळगुळीत दाढी केलेला, कारकून वाटणारा इसम होता. त्याचे नाव व पत्ता अर्थातच खोटा होता. तो निसटला खरा, पण वर्णनावरून तो, डॉ श्लेसिंजरच वाटत होता.

लघेममधील आमच्या दाढीवाल्या मित्राने तीन वेळा चौकशी केली. तिसऱ्यांदा या नवीन माहितीनंतर! त्याच्या आगडबंब देहावर, त्याचे कपडे फारच सैल वाटत होते. काळजीमुळे तो कृश भासत होता. 'जर तुम्ही मला काही काम दिलेत तर,' असे त्याचे टुमणे सारखे चालले होते. शेवटी तो होम्सच्या गळयातच पडला.

“आता त्याने हिरे गहाण ठेवायला सुरवात केली आहे. आता तो आपल्याला मिळालाच पाहिजे.”

“पण म्हणजे मिस फ्रान्सिसबरोबर, काही धोका झाला आहे की काय?”

होम्सने थंडपणे मान हलवली.

“समजा, आतापर्यंत त्यांनी तिला कुठे डांबून ठेवले असेल, तर स्वतःही अडचणीत आल्याशिवाय, तिला तो मोकळी सोडणे शक्य नाही. आपण वाईटात वाईट घडले असण्याची शक्यता गृहीत धरली पाहिजे.”

“मी काय करू शकतो?”

“हे लोक काही तुला ओळखत नाहीत.”

“नाही.”

“ते अजून कोणाकडे तरी जडजवाहीर गहाण ठेवायला जाण्याची मला शक्यता वाटते. तसे असेल तर आपल्याला शोध सुरु करावा लागेल. कदाचित तो इथेच परत येईल, कारण त्याला पैशाची ददात आहेसे दिसते. इथे त्याला कुठल्याही प्रकारचे उलटसुलट प्रश्न न विचारता, बिनबोभाट चांगली रक्कम मिळालेली आहे. मी त्या दुकानदाराला एक चिठ्ठी देतो, म्हणजे ते तुला त्यांच्या दुकानात दडून बसायची, परवानगी देतील. जर डॉ श्लेसिंजर इथे आला तर त्याच्या घरापर्यंत तू त्याचा पाठलाग कर. पण जरा सबुरीने. मारामारीच्या भानगडीत तर मुळीच पडू नकोस. माझ्या सल्ल्याशिवाय, व मला कळवल्याशिवाय, तू   नवीन पाऊल उचलणार नाहीस, या अटीवरच मी तुला हे काम देतो.”

दोन दिवस फिलीप ग्रीनने (महायुद्धात नाविक दलात कमांडर असलेल्या प्रसिध्द व्यक्तीचा, तो मुलगा होता.) काही बातमी आणली नाही. तिसऱ्या दिवशी तो घाईघाईने आमच्या बैठकीच्या खोलीत घुसला. त्याचे पिळदार शरीर उत्तेजित होऊन थरथरत होते.

“आपल्याला तो मिळाला. तो सापडला.” फिलीप ओरडला. त्याच्या बोलण्यात सुसंगती नव्हती. होम्सने थोडा धीर देऊन त्याला शांत केले व एका खुर्चीत, जरा श्वास टाकायला बसवले.

“चल. आता नीट कसे कसे काय काय झाले ते सांग.”

“ती आत्ता एक तासापूर्वी आली होती, त्याची बायको. तिने जे पदक आणले, ते दुसऱ्या कुणाचे तरी होते. ती उंच, हडकुळी व घारीच्या नजरेची बाई होती.”

“तीच ती बाई.” होम्स म्हणाला.

“ती निघून गेल्यावर, मी तिचा पाठलाग केला. मी तिच्या मागून चाललो होतो. नंतर ती एका मर्तिकाचे सामान आणायच्या दुकानात गेली.”

“बर मग?” पांढऱ्या फटक चेहऱ्यामागे दडलेल्या, भीतीदायक मनाने थरथरणाऱ्या, आवाजात माझ्या मित्राने विचारले.

“दुकानातील बाईबरोबर, ती बोलत होती. मी तिथे शिरलो. आता उशीर झाला आहे, असे काहीसे ती म्हणताना मी ऐकले. ती दुकानातील बाई माफी मागत होती. ”खरं म्हणजे ती एव्हाना तयार असायला हवी होती पण नेहमीपेक्षा वेगळ्या आकाराची असल्याने, उशीर लागत आहे.” मला बघून त्या दोघी चपापल्या. मी काही जुजबी चौकशी करून, दुकानातून बाहेर पड्लो.”

“फार छान केलेस. नंतर काय झाले?”

“ती बाई बाहेर पडली, पण मी दाराशीच आडोशाला, दडून बसलो होतो. मला वाटते तिला बहुधा संशय आला असावा, कारण ती सारखी आजूबाजूला बघत होती. नंतर तिने एक टॅक्सी बोलावली व त्यात बसून ती निघाली. नशिबाने मलाही लगेच दुसरी टॅक्सी मिळाली व मी तिचा पाठलाग सुरु केला. ३६, पोल्टने स्क्वेअर, ब्रिक्स्टन इथे ती उतरली. मी मागे आलो. कोपऱ्यावर टॅक्सी सोडून दिली व त्या घरावर पाळत ठेवली.”

“तुला कोणी दिसले का?”

“खालची खिडकी सोडल्यास, बाकी सर्वत्र अंधार होता. इतका अंधार होता की मला काहीही दिसत नव्हते. काय करावे अशा विचारात मी तेथे उभा होतो, तेवढ्यात एक व्हॅन तिथे आली. त्यातून दोन माणसे उतरली. त्यांनी व्हॅनमधून काहीतरी बाहेर काढले व पायऱ्यांवरून हॉलमध्ये घेऊन गेले. मिस्टर होम्स, ती शवपेटी होती.”

“काय सांगतोस?”

“क्षणभर मी एकदम आत शिरायचा प्रयत्न केला. दोघांना येण्यासाठी व त्यांच्या हातातील ते ओझे घेण्यासाठी, दार उघडेच होते. मी तिथे उभा असलेला तिने पाहिले व बहुधा न ओळखल्यामुळे, लगबगीने दार लावून टाकले. मी तुम्हाला दिलेले वचन मला आठवले, म्हणून मी ताबडतोब इथे आलो.”

“तू तर झकास काम केलेस.” कागदाच्या एका तुकड्यावर घाईघाईने काहीतरी लिहित, होम्स म्हणाला. वॉरंट असल्याशिवाय कायदेशीर रित्या, आपण काही करू शकत नाही. तेव्हा हा कागद पोलीस कचेरीत नेऊन दाखव व वॉरंट मिळव. हिरे विकल्याचे कारण मला वाटते, पुरेसे आहे. त्यात काही अडचण येऊ नये. लेस्ट्रेड सर्व तपशील पाहील.”

“पण मध्यंतरीच्या काळात, त्यांनी तिचा खून केला तर? त्या शवपेटीचा अर्थ काय? तिच्याशिवाय दुसऱ्या कोणासाठी ती असणार?”

“मिस्टर ग्रीन, आपण आपल्याला शक्य आहे तेवढे सर्व काही करू. एक क्षणही आता दवडून उपयोगी नाही. सगळे काही आमच्यावर सोपव.”

ग्रीन निघून गेल्यावर होम्स मला म्हणाला, “आता सरकारी यंत्रणा कार्यरत होईलच. आपण खासगी गुन्हा अन्वेषक नेहमीप्रमाणे, आपल्या मार्गाने जाऊ. अगदी

तातडीने काही गोष्टी केल्या नाहीत तर, फार भीषण परिस्थिती ओढवेल. पोल्टने स्क्वेअर गाठण्यासाठी आता मिनिटाभराचाही उशीर नको."

"आपण आता काय काय कसे कसे घडले असेल ते बघू." वेस्ट मिनिस्टर पूल व पार्लमेंट हाउस पार करताना होम्स म्हणाला, "या दुष्ट लोकांनी त्या दुःखी बाईला, प्रथम तिच्या विश्वासू नोकराणीपासून तोडले. नंतर लंडनला येण्यासाठी, तिचे मन वळवले. जर तिने काही पत्रव्यवहार केला असता, तर ते अडचणीत आले असते. कुणीतरी विश्वासू माणसाकडून त्यांनी, हे सजवलेले घर ताब्यात घेतले. एकदा घर मिळाल्यावर, त्यांनी तिला त्यात डांबून ठेवले. पहिल्यापासून त्यांचे लक्ष तिच्या मौल्यवान जडजवाहीरावर होतेच. ते त्यांनी लगेच स्वतःच्या ताब्यात घेतले. या बाईच्या भविष्यामध्ये कुणाला रस आहे असे त्याना वाटणे, स्वाभाविक नव्हतेच. त्यामुळे त्याना काहीच धोकादायक वाटले नाही. पण तिला मोकळे सोडल्यास ती नक्की त्यांच्याविरुध्ध तक्रार करेल, म्हणून तिला डांबून ठेवायचे धोरण त्यांनी अवलंबले. पण ते तिला कायमचे तर कडीकुलुपात ठेऊ शकत नव्हते. तेव्हा तिचा खून करणे एवढाच पर्याय त्यांच्यासमोर राहिला."

"हे तर स्पष्ट आहे."

"आता आपण दुसऱ्या तऱ्हेने विचार करून बघू. वॉटसन, असं बघ की आपण जेव्हा वेगवेगळया दिशांनी विचार करतो तेव्हा शेवटी कुठले तरी सर्व शक्यतांमध्ये सामाईक असणारे मुद्दे आपल्याला सापडतात. आणि तेच शेवटी आपल्याला सत्याच्या जवळ नेणारे ठरतात. आपण आता शवपेटीपासून सुरवात करू, मिस फ्रान्सिसपासून नको. त्या घटनेवरून मला बाईसाहेब खात्रीने मरण पावल्या असल्याची भीती वाटते. पण मृत्यूचा दाखला व त्यावरील शिक्कामोर्तब असलेला हा दफनविधी मला विरोधाभासात्मक वाटतो. जर त्यांनी तिचा जाणूनबुजून खून केला असता तर, त्यांनी तिला मागील बागेत खड्डा खणून पुरून टाकले असते. पण इथे तर सर्व खुल्लमखुल्ला

कारभार दिसतो आहे. याचा अर्थ काय? डॉक्टरांची दिशाभूल करून, अगदी नैसर्गिक वाटेल अशा रितीने, त्यांनी तिचा शेवट केलेला दिसतो आहे. बहुधा विषप्रयोगाने. तरीही त्यांनी राजरोसपणे डॉक्टरला बोलवावे, हे जरा खटकते, नाही का? तो डॉक्टर त्याना सामील असलेलाच हवा. पण हे जरा विश्वास ठेवण्यास कठीण जाते आहे."

"मृत्यूचा दाखला लागतो, हे ते विसरले तर नसतील?"

"भयानक! फार भयानक! वॉटसन, ते असं करण्याची शक्यता मला कमीच वाटते. आटप भराभर. मित्रा, नक्की दफनविधीमध्येच काहीतरी गडबड वाटते आहे. आपण आत्ता त्या अंत्यविधीचे सामान विकणाऱ्या दुकानावरून चाललो आहोत. तू आत जातोस का? तू तिथे गेल्यामुळे, आपण जरा खंबीरपणे परिस्थिती हाताळू शकू. पोल्टने स्क्वेअर या पत्त्यावरील दफनविधी, उद्या किती वाजता होणार आहे, हे विचारून घे."

त्या दुकानातील बाई काहीही संशय न घेता मला म्हणाली की, उद्या सकाळी आठ वाजता.

"असं बघ वॉटसन, हे सगळे तर उघडपणे चालले आहे. आपली तक्रार रास्त असेल तर, आपण तिप्पट शक्तिशाली असल्यासारखेच आहे. आता कायद्याच्या चौकटीत राहून काम करणे किंवा पोलिसांची वाट बघत बसणे, आपल्याला फार महाग पडेल. चल वॉटसन, गाडी सुरु कर. आपले नशीब आपल्याला चांगली साथ देईल अशी आशा करू. पूर्वीही आपण अशी नशिबाच्या भरवशावर कामे केलेली आहेत."

पोल्टने स्क्वेअरमधील त्या अंधाऱ्या घराचे भलेमोठे दार उघडले गेले व मिणमिणत्या उजेडात एका उंच स्त्रीची आकृती दिसली.

“महाशय, आपल्याला कोण हवे आहे?” ती टोकदारपणे म्हणाली. काळोखातून ती आमच्याकडे निरखून बघत होती.

“मला डॉ श्लेसिंजरना भेटायचे आहे.” होम्स बोलला.

इथे या नावाची कोणीही व्यक्ती रहात नाही, असे म्हणून ती दार लावायचा प्रयत्न करू लागली. पण होम्सने मध्ये पाय घालून ते धरून ठेवले होते.

“मग इथे कोणी का रहात असेना, मला त्याला भेटायचे आहे.” होम्स ठामपणे बोलला. तिने विरोध दर्शवला पण नंतर दार उघडले.

“ठीक आहे आत या. माझ्या नवऱ्याला जगातील कुठल्याही माणसाची भीती नाही.” ती म्हणाली व आमच्या मागे दार लावले. हॉलच्या उजव्या बाजूस असलेल्या बैठकीच्या खोलीकडे आम्हाला जायला सांगितले. जाता जाता तिने दिवा मोठा केला. “लगेचच मिस्टर पीटर तुम्हाला भेटतील.” ती म्हणाली. त्या धुळीने भरलेल्या व कीटकांचे वसतीस्थान असलेल्या खोलीकडे आम्ही नजर टाकतो आहोत तोच दार उघडून, एक मोठा, घोटून दाढी केलेला व टक्कल पडलेला मनुष्य, दबकत प्रवेश करता झाला. आतून दुष्ट असूनही वरवर सज्जन वाटणारा मुखवटा घातलेला, असा तो मनुष्य वाटला. त्याचे गाल ओघळलेले होते व चेहरा तांबडा होता.

“सभ्य गृहस्थहो, तुमची काहीतरी चूक होते आहे. मला वाटते की तुम्ही पत्ता चुकला आहात. जर तुम्ही याच रस्त्याने थोडे पुढे गेलात तर कदाचित — “ तो उसन्या खेळीमेळीच्या स्वरात बोलला.

“हे बघ, आम्हालाही उशीर होतो आहे. तू अॅडेलेडचा हेन्री पीटर आहेस. बदेन व दक्षिण अमेरिकेचा डॉ श्लेसिंजर आहेस. मी शेरलॉक होम्स आहे हे मी जितक्या निश्चितपणे सांगू शकतो, तितक्याच निश्चितपणे मी तुला हे सांगतो.” ज्याला मी आता पीटर म्हणणार आहे तो, त्याला इतक्या हुशारीने ज्याने ओळखून काढले आहे त्याच्याकडे, अगदी पुन्हा पुन्हा निरखून बघू लागला. “हे बघ, मिस्टर होम्स, मला

तुझ्या नावाची भीती दाखवू नकोस. जेव्हा माणसाची सदसद्विवेकबुद्धी जागृत असते तेव्हा तू त्याला घाबरवू शकत नाहीस. माझ्या घरात तुझे काय काम आहे?”

“बदेनहून तुझ्याबरोबर आलेल्या मिस फ्रान्सिसचे तू काय केलेस, हे मला जाणून घ्यायचे आहे.”

पीटर मख्खपणे म्हणाला, “त्या बाईसाहेब कुठे आहेत ते तुम्हीच मला सांगितलेत तर बरे होईल. जवळजवळ शंभर पौंडाचे बिल मला, तिच्याकडून येणे आहे. ज्याच्याकडे कोणी रत्नपारखी ढुंकूनही बघणार नाही अशी खोटी पदके तिने मला त्याच्या बदली दिली आहेत. बदेनला, माझ्या बायकोशी व माझ्याशी तिची चांगली जानपहचान झाली होती. त्यावेळेस मी दुसऱ्या नावाने वावरत होतो, ही गोष्ट खरी आहे. आम्ही लंडनला येईपर्यंत, तिने आमचा पिच्छा सोडला नाही. मीच तिचे तिकीट काढले व बिलही भरले. लंडनला येताच तिचे बिल भरल्याबद्दल, आमच्या हातावर नकली हिरे ठेवून तिने पोबारा केला. मिस्टर होम्स, तुम्ही तिला शोधून काढलेत, तर माझ्यावर फार उपकार होतील.”

“मी तिला शोधून काढीनच. ती सापडेपर्यंत या घराचा कोपरा अन कोपरा मी धुंडाळून काढणार आहे.“ होम्स म्हणाला.

“का म्हणून? तू तर एक सर्वसामान्य नागरिक आहेस.”

“तुला असे म्हणायचे असेल तर, तू म्हणू शकतोस. मी व माझा मित्र असे दोघे मिळून घराची पहाणी करणार आहोत. शिवाय हा माझा मित्र चांगला तगडा गुंडही आहे.” होम्स म्हणाला.

आमच्या विरोधकाने दार उघडून म्हटले, “ॲनी, पोलिसाना बोलाव. खालून जनानी वस्त्रांची सळसळ ऐकू आली. हॉलचे दार उघडले गेले व परत लावले गेले.

होम्स म्हणाला, वॉटसन, आपल्याला अगदी थोडा वेळ आहे. पीटर, तू आमच्या मध्ये आलास, तर तुझी चांगलीच पिटाई होईल. इथे आणलेली शवपेटी कुठे आहे?”

“शवपेटीशी तुम्हाला काय करायचे आहे? ती वापरात आहे. त्यात प्रेत आहे.”

“मला प्रेत बघायचे आहे.”

“माझी परवानगी नाही.”

“मग परवानगीशिवायचं! एक धक्का मारून त्याला ढकलून, होम्स चपळाईने हॉलमध्ये शिरला. एक अर्धवट उघडे दार आमच्या समोर होते. आम्ही त्यात शिरलो. ते जेवणघर होते. टांगलेल्या अर्धमिणमिणत्या दिव्याखाली टेबलावर शवपेटी ठेवलेली होती. होम्सने दिवा मोठा करून तिचे झाकण उघडले. खोल पेटीच्या तळाशी एक क्षीण आकृती पहुडली होती. त्या वयस्क तांबूस पांढुरक्या चेहऱ्यावर, प्रकाशाची तिरीप पडली. कितीही दुष्टपणा, उपासमार किंवा रोगजर्जरता या कारणामुळेदेखील, ही झिजलेली म्हातारी, अजून सुंदर दिसणारी, मिस फ्रान्सिस ठरली नसती. होम्सच्या चेहऱ्यावर आश्चर्य दिसले व सुटकेचे भावही!

“नशीब. ही कोणीतरी दुसरीच आहे.” तो पुटपुटला.

आमच्या मागोमाग खोलीत आलेला पीटर बोलला, “मिस्टर शेरलॉक होम्स, तू एकदाचा चांगलाच ठेचकाळलास.”

“ही मृत बाई कोण आहे?”

“जर तुम्हाला जाणून घ्यायचे असेल तर ऐका. ती माझ्या बायकोची पूर्वीची परिचारीका आहे. तिचे नाव रोझ स्पेंडर आहे. ब्रिक्स्टन येथील कामगार रुग्णालयात ती आम्हाला सापडली. तिला आम्ही इथे घेऊन आलो. डॉ हॉरसॉम, रहाणार, १३,

फरबँक व्हिला याना बोलावले. पत्ता लिहून घेतला ना? ख्रिश्चन धर्मरीतीप्रमाणे आम्ही तिचे अंत्यसंस्कार काळजीपूर्वक करत आहोत. काय समजलात मिस्टर होम्स? आणल्यापासून तिसऱ्या दिवशी, ती वारली. वृद्धापकाळामुळे मृत्यू, असे डॉक्टरांचा दाखला म्हणतो. पण तुमची अक्कल जास्त चालते. आम्ही केनिंग्टन रस्त्यावरील स्टीमसन आणि कंपनीला, अंत्यविधीचे कंत्राट दिले आहे. ते उद्या सकाळी आठ वाजता दफनविधी करणार आहेत. मिस्टर होम्स, तुम्हाला यात काही विसंगती वाटते का? तेव्हा तुम्ही मूर्खासारखा एक टोला खाल्ला आहे व ते कबूल करणे तुम्हाला जड जाऊ नये. जेव्हा आत मिस फ्रान्सिस असणार, या अपेक्षेने तू शवपेटीचे झाकण उघडलेस, व त्यात नव्वद वर्षाची जख्ख म्हातारी पाहिलीस, तेव्हा तुझा पडलेला चेहरा व आ वासलेले तोंड, अगदी फोटो काढण्या लायक झाले होते."

पीटरने होम्सला टोमणा मारला, तरी होम्स नेहमीप्रमाणे शांत होता. पण त्याच्या घट्ट घातलेल्या हाताच्या घडीमधून, त्याचा टोकदार राग दिसून येत होता.

"मी तुझे घर शोधून बघणार आहे." तो म्हणाला.

"मी बघतोच तुझ्याकडे" पीटर म्हणाला. तेवढ्यात एका बाईचा आवाज आला व कोणीतरी आत येत असल्याची चाहूल लागली.

"चला इकडे या. हे लोक जबरद्स्तीने माझ्या घरात घुसले आहेत .त्यांच्यापासून माझी सुटका करा. त्याना हुसकून देण्यासाठी मला तुमची मदत हवी आहे."

दारात एक पोलीस व इन्स्पेक्टर उभे होते. होम्सने खिशातून त्याचे कार्ड काढले. "हे माझे नाव व पत्ता असलेले कार्ड आणि हा माझा मित्र वॉटसन."

"राहू दे महाशय. आम्ही तुम्हाला चांगले ओळखतो. पण तुमच्याकडे वॉरंट असल्याशिवाय, तुम्हाला इथे काही करता येणार नाही." तो इन्स्पेक्टर बोलला.

“असे करण्याचा मला कायदेशीर रित्या अधिकार नाही, हे अर्थातच मला माहिती आहे.”

“पकडा त्याला.” पीटर म्हणाला.

“हा गृहस्थ हवा असल्यास, त्याला कुठे पकडायचे ते आम्हाला माहिती आहे. पण मिस्टर होम्स, तुम्हाला इथून जावे लागेल.” इन्स्पेक्टर बोलला.

“चल वॉटसन, आपल्याला जायला हवे.”

एका मिनिटात आम्ही रस्त्यावर आलो. होम्स नेहमीप्रमाणे शांत होता. पण मी मात्र फार चिडलो होतो. इन्स्पेक्टर आमच्या मागोमाग आला.

“माफ करा मिस्टर होम्स, पण कायदाच तसा आहे.”

“बरोबर इन्स्पेक्टर, तुम्ही तरी दुसरे काय करणार?”

“तुम्ही तिथे हजर होतात त्याअर्थी काहीतरी काळेबेरे असणार असा माझा अंदाज आहे. जर मला करता येण्यासारखे काही असेल तर — “

इन्स्पेक्टर, त्या हरवलेल्या बाईची भानगड आहे व आम्हाला वाटते की ती त्या घरात आहे. मी लगेच तुमच्याकडून वॉरंटची अपेक्षा करतो.”

“ठीक आहे मिस्टर होम्स, मी या लोकांवर नजर ठेवतो. जर काही निष्पन्न झाले तर तुम्हाला नक्की कळवतो.”

फक्त नऊ वाजले होते. आम्ही जोमाने आमच्या कामगिरीवर निघालो. प्रथम आम्ही ब्रिक्स्टन येथील  कामगार रुग्णालयात गेलो. तिथे आम्हाला खरोखरच असे आढळले की काही दिवसापूर्वी इथे एक परोपकारी दांपत्य आले होते व ते एका मनोरुग्ण वृध्द महिलेला, ती त्यांची पूर्वीची नोकराणी असल्याने हक्काने, पण

परवानगी काढून घेऊन गेले. आता ती मृत्यू पावल्याचे समजल्यावर, कोणालाही आश्चर्य वाटले नाही.

आमचा पुढील मोर्चा आम्ही डॉक्टरांकडे वळवला. तो डॉक्टर म्ह्णाला की त्याला बोलावण्यात आले, तेव्हा खरोखरच ती म्हातारी मरणासन्न झाली होती व त्याच्यादेखतच तिचे प्राण गेले. त्याने मृत्युचा दाखला दिला. तो म्हणाला, “मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो, की सर्व काही अगदी नैसर्गिकपणे घडले होते व संशयास्पद असे आम्हाला काहीही वाटले नाही. पण त्यांच्यासारख्यांच्या घरात नोकरमाणूस नसावा, हे मात्र मला जरा खटकले.” एवढे बोलून तो डॉक्टर गप्प झाला.

शेवटी आम्ही स्कॉटलंड यार्डला गेलो. वॉरंट मिळवण्यासाठी अनेक कागदी घोडे नाचवावे लागले. थोडा वेळ मोडणे अटळ होते. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत, मॅजिस्ट्रेटची सही मिळणे शक्य नव्हते. जर सकाळी नऊ वाजता सही मिळाली, तर लेस्ट्रेडला बरोबर घेऊन होम्स पुढची कार्यवाही करू शकत होता. अशा रितीने दिवस संपला. मध्यरात्री त्या इन्स्पेक्टरचा फोन आला की त्या अंधाऱ्या घराच्या खिडक्यांमधून मध्यरात्री दिव्यांची उघडझाप व काहीतरी जाग असलेली वाटली. पण घरात जाताना किंवा बाहेर पडताना त्याला कोणी दिसले नाही. आपण फार उतावीळपणा करायला नको. उद्या उजाडेपर्यंत वाट पाहू असे त्याचे म्हणणे होते.

शेरलॉक होम्स फार अस्वस्थ होता. त्याला झोपही आली नाही व काही बोलायचे म्हटले, तर तो फार चिडलेला होता. आपल्या दोन्ही जाड व दाट भुवया एकत्र आणून व लांबलचक निराश बोटे खुर्चीच्या हातावर आपटत, एकामागून एक सिगरेटी ओढत, तो एकटाच बसला होता. प्रत्येक शक्यता पडताळून पाहून गूढ उकलायचा, त्याचा प्रयत्न चालला होता. रात्री अनेक वेळा, मी त्याला घरभर शोधक नजरेने फिरताना पाहिले. सकाळी मला जेव्हा त्याच्याकडून बोलावणे आले, तेव्हा तोच माझ्या खोलीत घुसला. तो त्याच्या रात्रीच्या कपड्यातच होता. त्याच्या निस्तेज

व खोल गेलेल्या डोळयांवरून रात्रभर त्याच्या डोळयाला डोळा लागला नसल्याचे मला सहज कळत होते.

"अंत्यविधीची वेळ काय होती? आठ नाही का?" त्याने उत्सुकतेने विचारले. "बरं आता सात वीस झाले आहेत. अरे देवा वॉटसन, माझी मती इतकी कुंठीत का बरं झाली आहे? चल, भरभर आटप. जीवन की मृत्यू? शंभर टक्के मृत्यू व एक टक्का जीवन अशीच शक्यता वाटते. जर आपल्याला उशीर झाला, तर मी मला कधीच माफ करणार नाही."

आम्ही बग्गीत बसून, बेकर रस्त्याने जात होतो. अजून पाच मिनिटेही झाली नाहीत, तोच साडेसात झाले. आम्ही बिग बेनवरून चाललो होतो. ब्रिक्स्टन रस्त्याला लागलो, तेव्हा बरोबर आठाचे टोले पडलेले आम्ही ऐकले. पण आमच्याप्रमाणेच, इतर लोकही उशीरा येत होते. आठ वाजून दहा मिनिटांनी शववाहिका अजून दारातच उभी होती. आमचा घोडा धापा टाकत, तिथे उभा राहिला. घराच्या पायरीवरून, तीन माणसे शवपेटी वाहून आणताना दिसली. होम्स एकदम तीरासारखा घुसला व त्याने त्यांची वाट अडवली.

"याचा अर्थ काय? पुन्हा मी तुला विचारतो की वॉरंट कुठे आहे?" चिडलेल्या पीटरने रागावून आवाज चढवला. रागाने लाल झालेल्या पीटरची नजर, शवपेटीच्या पुढील भागाकडे लागली होती.

"वॉरंट येते आहे. तोपर्यंत शवपेटी इथेच राहील." होम्सच्या आवाजातील जरबेने त्या लोकांवर चांगलाच परिणाम झाला. पीटर एकाएकी घरात अदृश्य झाला व ते लोक तसेच थांबले. "वॉटसन, चल लवकर. हा बघ स्क्रू ड्रायव्हर." तो ओरडला. शवपेटी वाहणाऱ्या पुढील माणसाच्या छातीवर हात ठेऊन तो ओरडला, "परत आत न्या. आत्ताच्या आत्ता." शवपेटी परत टेबलावर ठेवण्यात आली.

“ए, तुला सांगतो आहे रे. एका मिनिटात पेटीचे झाकण उघडले गेले पाहिजे, काय समजलास? प्रश्न नको आहेत. पटापट हात चालवा. छान. छान. तू रे. आणि तू तिकडून हात लाव. आता जोरात वर खेचा. उघडते आहे. उघडा. उघडा. एकदाची उघडली.”

सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनी आम्ही त्या शवपेटीचे झाकण उघडले. आम्ही असे करतो आहोत, तोच आतून क्लोरोफॉर्मचा, नाकात भरणारा उग्र भपकारा आला. गुंगी आणणाऱ्या ऑषधात बुडवलेल्या कापूस व लोकरीत, एका देहाचे मस्तक गुंडाळलेले होते. कापूस बाजूला करून, होम्सने आतील सुंदर पुतळयासारखा स्वर्गीय, असा एका मध्यमवयीन बाईचा च्रेहरा उघडा केला. एका झटक्यासरशी त्याने आपल्या हाताने त्या आकृतीला आधार देऊन बसते केले.

“वॉटसन, ही मेली आहे की काय? की अजून धुगधुगी आहे? नक्कीच आपण फार उशीर केलेला नाही.”

पुढील अर्धा तास आम्हाला असे वाटून गेले, की आम्ही नक्कीच फार उशीर केला. गळचेपी झाल्यामुळे म्हणा किंवा क्लोरोफॉर्मच्या विषारी दाहकतेने म्हणा, मिस फ्रान्सिस जवळजवळ न परतीच्या वाटेवर पोचल्यासारखीच वाटत होती. पण शेवटी कृत्रिम श्वासोच्छ्वासाने, इथरचे इंजेक्शन देऊन, किंबहुना शास्त्रात सुचवलेल्या प्रत्येक उपायाने, डोळयांच्या पापण्यांची थोडी हालचाल झाली. जीवनाची पुसटशी चमक दृगोचर होऊ लागली. तेवढ्यात बाहेर गाडी थांबल्याचा आवाज आला. होम्सने पडदा बाजूला करून पाहिले व म्हटले, “लेस्ट्रेड वॉरंट घेऊन आला आहे खरा, पण त्याला असे आढळेल की पक्षी आधीच उडालेले आहेत.”

बाहेरचा पायरव ऐकून तो म्हणाला, “आणि बाईसाहेबांची आपल्यापेक्षा जास्त चांगली शुश्रूषा करू शकेल अशी योग्य व्यक्ती आलेली आहे. नमस्ते मिस्टर ग्रीन.

मला वाटते की जितक्या लवकर आपण मिस फ्रान्सिसला इथून हलवू, तितके जास्त बरे. मध्यंतरी दफनविधी पार पाडायला हरकत नाही. गरीब बिचारी वृद्धा, त्या शवपेटीत अजून तशीच पडली आहे. तिला चिरविश्रांती द्यायला हवी, एकटीलाच!

“वॉटसन, तुझ्या नोंदवहीत तू ही केस लिहिलीस का?” त्या संध्याकाळी होम्सने विचारले. “पूर्णपणे संतुलित विचारांच्या मनुष्याच्या पूर्णबिंबालादेखील, तात्पुरते ग्रहण लागते, याचे हे उदाहरण होते. मर्तिकामध्ये, अशा ढोबळ चुका नेहमी होतात. त्या जाणून घेऊन, जो सुधारतो तोच खरा श्रेष्ठ होय. कदाचित हे सुधारित श्रेय थोडेसे, मलाही मिळायला हरकत नसावी.” होम्स म्हणाला. “कुठेतरी एखादा धागादोरा, एखादे विचित्र वाक्य किंवा डोळस निरीक्षण माझ्या हातून निसटले की काय, या विचाराने मला रात्रभर ग्रासले होते. आणि मग एकाएकी पहाटेच्या प्रहरी, मला ते शब्द आठवले. ते त्या अंत्यविधीच्या सामानाच्या दुकानातील बाईचे उद्गार होते व ते फिलीप ग्रीनने मला सांगितले होते. ती म्हणाली होती, ‘खरं तर ती यापूर्वीच तयार असायला हवी होती. पण नेहमीच्या आकाराची नसल्याने उशीर लागत आहे.’ ती शवपेटीबद्दल बोलली होती. आणि खरच ती नेहमीच्या आकाराची नव्हती. याचा सरळ अर्थ असा होतो, की ती मुद्दाम विशिष्ट मापाची बनवली गेली होती. पण का? कारण काय? नंतर एका झटक्यात मला त्या शवपेटीचा जास्त मोठा आकार व म्हातारीचे कृश, बारकाऊ प्रेत आठवले. इतक्या लहान शरीरासाठी इतकी मोठी शवपेटी कशासाठी? दुसरे कोणीतरी ठेवता यावे म्हणून? दोन्ही शरीरे एकाच मृत्युदाखल्यावर पुरून टाकायची. जर माझी नजर मला धोका देत नसेल, तर ही गोष्ट अगदी स्पष्ट होती. आठ वाजता मिस फ्रान्सिसलाही, मूठमाती मिळाली असती. ती शवपेटी घराबाहेर पडण्यापूर्वी थांबवण्याची, आपल्याला एक संधी होती.

ती आपल्याला जिवंत सापडेल का ही एक शंकास्पद गोष्ट होती. पण परिणाम पहाता असे म्हणावेसे वाटते, की ती खरोखरची संधी होती. माझ्या माहितीप्रमाणे, या लोकांनी खून केला नव्हता. शेवटी प्रत्यक्ष हिंसेच्या गुन्ह्यातून ते सुटतील. तिला मृत्यू कसा आला याचा काही मागमूस न ठेवता, त्याना तिला पुरता आले असते. जरी तिला उकरून वर काढले असते तरी त्यांच्यावर ठपका येणे शक्यच नव्हते. जिथे त्या बिचाऱ्या बाईला इतके दिवस कोंडून ठेवले होते, ती वरच्या मजल्यावरील अंधारी खोली होती. त्यांनी आत घुसून जबरदस्तीने तिला क्लोरोफॉर्मने बेशुध्द करून खाली आणले असणार व आणखी क्लोरोफॉर्म शवपेटीच्या आत शिंपडून ती नक्की शुद्धीवर येणार नाही अशी व्यवस्था केली असणार. मग शवपेटीचे झाकण स्क्रू पिळून बंद केले असणार. तुम्ही सहज सगळे मनःचक्षूसमोर आणू शकता. वॉटसन, डोकेबाज मार्ग आहे खरा! गुन्ह्याच्या विश्वात, ही नवीनच गोष्ट मला दिसते आहे. जर ही मिशनरी मंडळी लेस्ट्रेडच्या तावडीतून सुटली असली, तर त्यांच्या कारकीर्दीच्या भविष्यकाळात, मला नक्कीच काहीतरी नवीन, बुद्धीला चालना देणाऱ्या घटना ऐकायला मिळतील".



# सिंहाच्या आयाळीचे रहस्य



सगळया अनाकलनीय समस्या माझ्या लांबलचक आयुष्यात, नेमक्या माझ्या निवृत्तीनंतरच अचानक येऊन मला कशा काय भिडतात, कोण जाणे! लंडनमधील गजबजाटात सर्व आयुष्य काढल्यावर, मी माझे ससेक्स ( इंग्लंडमधील एक भाग ) मधले छोटेसे घर विकले व मी ज्यासाठी आसुसलो होतो ते, निसर्गाच्या सान्निध्यातील शांत आयुष्य उपभोगण्यासाठी, सज्ज झालो. माझ्या आयुष्याच्या या

सर्व काळात माझा चांगला मित्र वॉटसन, मला अगदी एखादा शनिवार रविवार सोडला, तर भेटत नव्हता, हल्ली माझा मदतनीस मीच होतो. जर तो माझ्या बरोबर असता तर, प्रत्येक कठीण गोष्ट उकलायला किती छान वाटले असते. ह्या सिंहाच्या आयाळीच्या केसमध्ये मी प्रत्येक अवघड पायरी कशी चढत गेलो, हे अगदी सरळ साध्या शब्दात, मलाच सांगायला हवे.

माझे टुमदार घर दक्षिणेच्या उतारावर आहे. तिथून खाडीचे दृष्य छान दिसते. इथे किनारा पूर्णपणे पांढऱ्या शुभ्र खडकांचा बनलेला आहे. तिथून भरतीच्या वेळीही जवळजवळ शंभर यार्ड भूभाग, पांढऱ्या छोट्याछोट्या दगडांनी व्यापलेला आहे. तरीही इतस्ततः खोल खड्डे पडले आहेत. सागराच्या लाटांबरोबर त्यात दरवेळी ताजे पाणी भरले जाऊन मस्त पोहायचे तलाव तयार झाले आहेत. हा रम्य समुद्रकिनारा दोन्ही दिशांना मैलोनमैल पसरलेला आहे. फक्त मध्ये एके ठिकाणी फुलवर्थ गाव वसलेले आहे.

माझे घर तसे एकाकीच आहे. मी, माझे काम करणारी बाई व माझ्या मधमाशा, आमच्या वावरात स्वतंत्रपणे हिंडत असतो. इथून अर्ध्या मैलावर सॅमचे कॉलेज आहे. वेगवेगळया प्रकारचे व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी तिथे तरूण मुले येतात. शिकवणारे काही शिक्षकही असतात. बऱ्यापैकी मोठी अशी ती, गेबल नावाची जागा आहे. त्याच्या काळात सॅम खूप हुशार स्कॉलर म्हणून गाजणारा, चमकता तारा होता. तिथे मी आल्याच्या पहिल्या दिवसापासून आमची छान मैत्री जमली होती. संध्याकाळी न बोलावता, आम्ही एकमेकांच्या घरी टपकत असू.

१९०७ जुलैच्या शेवटी जोराचे वादळ आले. घोंघावणाऱ्या वाऱ्याबरोबर जोरात येणाऱ्या लाटा किनाऱ्यावर आदळून, भरतीबरोबर तळी तयार होत होती. दुसऱ्या दिवशी सकाळी, भीतीदायक वारा वाहत होता. सर्व निसर्ग सुस्नात होऊन,

ताजातवाना दिसत होता. अशा आनंदी दिवशी, काम करणे अशक्य होते आणि म्हणून सकाळी न्याहारीपूर्वी छान हवेचा आस्वाद घ्यायला, मी रमतगमत फिरत होतो. मी खडकांमधील रस्त्याने उतारावरुन, किनाऱ्याकडे चाललो होतो. एकदम माझ्या मागे, मला हाक ऐकू आली. तिथे सॅम हात हलवून, छान हसतहसत, मला अभिवादन करत होता.

"मिस्टर होम्स, काय छान सकाळ आहे! तू इथे भेटशीलच, असे मला वाटले होते."

"पोहायला चालला आहेस वाटतं?"

"काय चेष्टा करतो आहेस? पण हो. मॅक भल्या पहाटे बाहेर पडला. तो देखील इथे भेटेल, या अपेक्षेने मी आलो.".

तरुण व होतकरू मॅक हा सायन्सचा शिक्षक होता. त्याचे आयुष्य हृदयविकार व संधिवाताच्या तापाने, ग्रासलेले होते. तसा तो जात्याच खेळाडू होता पण त्याच्यावर जास्त ताण येणार नाही, अशा प्रत्येक खेळात त्याने प्राविण्य मिळवलेले होते. उन्ह्याळयात व हिवाळयात, तो पोहायला जात असे. मी पण पोहणारा असल्याने आम्ही भेटत असू.

आता इथे सॅम व मी चाललो असताना, एक मनुष्य एकटाच फिरताना पाहीला. जिथे रस्ता संपत होता, तिथे खडकातून, त्याचे डोके दिसत होते. दारू प्यायलेल्या माणसासारख्या, त्याच्या झोकांड्या जात होत्या. पुढच्याच क्षणी त्याने हात वर करून एक किंकाळी फोडली व तोंडावर पडला. सॅम व मी धावलो — साधारण पन्नास यार्ड अंतर असावे — त्याला पाठीवर वळवून उताणे केले. नक्कीच तो मॅक होता व मरणपंथाला लागला होता. अर्धोन्मिलीत डोळे व भयानक काळसर

गाल, तेच दर्शवत होते. क्षणभर त्याची जीवनज्योत फडफडली व त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले, “सिंहाची आयाळ”. हे काहीतरी अगम्य व असंबद्ध होते. त्यातून काहीच अर्थबोध झाला नाही. मग तो जमिनीपासून अर्धवट उठला. त्याचे हात हवेत उंच गेले व कुशीवर पडून मरण पावला.

माझा मित्र ते बघून गर्भगळीत झाला, पण मी मात्र एकदम सावध झालो. आमच्यासमोर घडलेल्या या घटनाक्रमामुळे, ही काहीतरी वेगळीच केस असल्याचे जाणवून, माझ्यातला गुप्तहेर जागा झाला.

मॅकने अंगात पॅन्ट व लांब कोट घातला होता — म्हणजे नुसता पांघरला होता, कारण तो कोलमडल्यावर कोट बाजूला पडून, तो उघडा पडला. पायात लेस न बांधलेले कॅनव्हासचे बूट होते. आम्ही त्याच्याकडे आश्चर्याने बघू लागलो. त्याच्या पाठीवर लाल ठळक रेषा होत्या. बारीक तारेने ओरबाडल्यासारखे ते भयानक दिसत होते. त्याच्या खांद्यावर व छातीवरही आसूडाचे वळ उठले होते. शिक्षा म्हणून त्याला, मरणांतिक मारपीट केल्याचे दिसत होते. त्याच्या ओठावर वार केल्याने जखमेतील रक्त हनुवटीवरून गळत होते. अचानक त्याच्यावर हल्ला करून, त्याचा छळ केल्याचे दिसत होते. त्याचा छिन्नविछिन्न चेहरा, किती जोरात मारपीट झाली ते दर्शवत होता.

मी त्या प्रेताजवळ खाली बसलो होतो व सॅम उभा होता. मरे आमच्या बाजूलाच उभा असलेला, त्याच्या सावलीमुळे कळला. मरे हा गणिताचा शिक्षक असून काळासावळा, उंच, कृश व फारच मुखदुर्बळ होता. त्याला कुणी मित्र नव्हते. जणू शंकू व अपूर्णांकांच्या उंच हस्तिदंती मनोऱ्यात, तो रहात असे. एक विक्षिप्त वल्ली, म्हणूनच विद्यार्थी त्याच्याकडे बघत व त्याला टोमणे मारत. त्याच्यात वेगळ्याच प्रकारचे विचित्र रक्त होते. ते त्याच्या कोळशासारख्या काळ्या डोळ्यातून व कुरूप चेहऱ्यातून व प्रसंगवशात चढणाऱ्या रागाच्या पाऱ्यातून भयंकर रित्या व्यक्त

होई. एकदा सॅमचा लहानसा कुत्रा त्याला चावला, तेव्हा त्याने त्या कुत्र्याला खिडकीच्या काचेच्या तुकड्याने पिटून काढले. मग सॅमने त्याला शिक्षकाच्या नोकरीतून, डच्चू द्यायचा विचार केला. तसा तो फार चांगला शिक्षक नव्हताच. असा विचित्र मनुष्य, आमच्या शेजारी येऊन उभा राहीला होता. तो ते दृष्य बघून हादरला होता. तरी कुत्र्याच्या मारझोड प्रकारावरून, असे वाटत होते की मेलेल्या माणसाबद्दल त्याला, फारशी सहानुभूती नसणार.

“गरीब बिचारा मॅक ! मी काय करू बरं? मी कशी मदत करू शकतो?”

“तू त्याच्याबरोबर होतास का? काय घडले ते तू सांगू शकशील का?”

“नाही. नाही. आज मी उशीरा उठलो. मी समुद्रकिनारी आलोच नव्हतो. मी आत्ता सरळ गेबलवरूनच आलो. मी काय करू?”

“तू पटकन फुलवर्थच्या पोलीसस्टेशनला जाऊन तिथे या घटनेची खबर दे.”

लगेच तो धावत सुटला आणि मी ते प्रकरण हाताळायला पुढे सरसावलो. सॅम अजूनही दिग्मूढ अवस्थेत प्रेताजवळ उभा होता. माझे पहिले काम साहजिकच असे होते की तेव्हा समुद्रकिनारी कोण कोण होते याचा शोध घेणे. मला उतारावरचा सर्व रस्ता सुनसान दिसत होता. पण दोनतीन गडद आकृत्या फुलवर्थ गावाच्या दिशेने जाताना दिसत होत्या. हे पाहून मी समाधानाने खाली उतरू लागलो. जिकडे तिकडे ओलसर वाळू पसरली होती. तिथे वरखाली मला तेच तेच पावलांचे ठसे दिसले. पण आज सकाळपासून तर कोणीच इथे फिरकले नव्हते. एका ठिकाणी मला हातांचे बोटासकट ठसे दिसले. बिचारा मॅक चढताना पडला असावा. तिथे गोलगोल खुणाही होत्या. त्यावरून असे वाटत होते की तो फक्त एकदाच नाही तर जास्त वेळा गुडघ्यांवर घसरत खाली आला असावा. रस्त्याच्या शेवटी समुद्राचे पाणी साठून, तळे तयार झाले होते. तिथे एक टॉवेल ठेवलेला दिसला. म्हणजे बहुतेक मॅक कपडे काढून पाण्यात उतरला असावा. पण टॉवेल घडी केलेला, कोरडा होता. त्यावरून असे वाटत

होते की तो पाण्यात उतरला नसावा. मी आजूबाजूला शोध घेत असताना, मला त्याच्या नुसत्या पावलांचे ठसेही दिसले. बहुतेक पाण्यात उतरून अंघोळ करायची त्याने तयारी केली, पण प्रत्यक्ष केली मात्र नाही.

आणि इथे प्रश्न धूसरपणे सामोरा आला — मी आतापर्यंत सोडवलेल्या प्रश्नांमध्ये विचित्र असा! नक्कीच पाऊण तासापेक्षा जास्त मॅक समुद्रकिनाऱ्यावर नव्हता. गेबलपासून तो सॅमच्या पुढेच चालत होता, याबद्दल काहीच शंका नव्हती. तो अंघोळीसाठी कपडे काढू लागला, असे त्याच्या अनवाणी पायांच्या ठशावरून, स्पष्ट होत होते. नंतर परत त्याने काढलेल्या कपड्यांवर हात ठेवला असावा, कारण ते विखुरलेले होते. अंघोळीचा बेत त्याने रद्द केला असावा, त्यामुळे अंग कोरडे होण्याचा काही प्रश्नच नव्हता आणि असा बेत बदलायचे कारण त्याला क्रूर, रानटी पद्धतीने, अमानुषपणे चाबकाचे फटकारे देण्यात आले. खालचा ओठ फाटून रक्त ठिबकू लागले. त्याच्या अंगात खुरडत जाण्याइतकीच शक्ती उरली व तो मरणपंथाला लागला. हे दुष्कृत्य कोणी केले? खडकांवर मध्येमध्ये व तळाच्या बाजूला छोट्या गुहा होत्या. परंतु उगवती सूर्यकिरणे त्यावर पडत होती. त्यामुळे तिथे लपून बसायला काही वाव नव्हता. ती लांबवर दिसणारी तीन माणसे! त्यांचे काय? पण गुन्ह्याशी संबंधित असायला, ती फारच लांब होती. ज्या तळयात मॅक उतरणार होता, ते त्याच्या व त्या तीन लोकांच्या मध्ये होते. मध्ये खडक होते. समुद्रावरील दोनतीन मच्छीमार बोटी फार अंतरावर नव्हत्या. त्या बोटींच्या मालकांची तपासणीदेखील सवडीने करायला हवी. शक्यतांच्या वाटा अनेक होत्या पण उत्तरापर्यंत पोचवेल अशी कुठली दिसत नव्हती.

मी परत प्रेताजवळ आलो, तेव्हा भोवती बघ्यांची गर्दी झाली होती. सॅम तिथेच होता. गावातील कॉन्स्टेबलला, ॲडरसनला घेऊन, मरे नुकताच आला होता. तो एक भलादांडगा, भरघोस मिशा असलेला व माझ्यासारखाच ससेक्समधून

आलेला, इसम होता. वरवर गप्प राहून आतून खूप जाणणारी, अशी ही जात आहे. आम्ही सांगितलेले सगळे शांतपणे ऐकून घेऊन, मग त्याने मला बाजूला बोलाविले.

"मिस्टर होम्स, तुम्ही मार्गद्रर्शन केलेत, तर मला आनंद होईल. हे प्रकरण मला हाताळायला, मोठे वाटते आहे. जर माझे काही चुकले तर, माझा बॉस मला फाडून खाईल. माझा बॉस व डॉक्टर येतीलच, पण ते येईपर्यंत येथील कशालाही — ताज्या पाउलखुणांसकट — धक्का न लावलेला बरा."

मधल्या वेळात, मी मृत माणसाचे खिसे चाचपले. त्यात त्याचा रुमाल, मोठा चाकू व एक न दुमडलेल्या कागदाचा कपटा असलेली डबी होती. तो कपटा मी ॲंडरसनच्या हातात दिला. त्यावर बायकी अक्षरात घाईघाईने असे खरडले होते,

"मी तिथे नक्की येते आहे हे धरून चाल,"

मॉड

हे काहीतरी प्रेमप्रकरण / भेटण्याचे वचन असावे, असे वाटत होते. पण कधी, केव्हा, हे काहीच त्यात नव्हते. ॲंडरसनने ती चिठ्ठी डबीत ठेवली व इतर गोष्टींबरोबर स्वतःच्या खिशात ठेऊन दिली. नंतर जास्त काही करण्यासारखे न उरल्याने, मी न्याहारी करण्यासाठी घराकडे वळलो. मात्र खडकांचा तळाकडील भाग, पूर्णपणे तपासायच्या सूचना देऊन आलो.

तासादोनतासात सॅम मला सांगत आला, की प्रेत गेबलला हलविले आहे व तिथे चौकशी होईल. त्याने बरोबर एक गंभीर व नेमकी बातमी आणली होती. मला वाटत होते त्याप्रमाणे खडकाच्या तळाकडील भागात काहीच सापडले नाही. पण मॅकच्या कपाटातील कागदपत्र तपासले असता, त्यात फुलवर्थला राहणाऱ्या मिस मॉडला लिहिलेल्या, खूपशा प्रेमळ चिठ्ठ्या सापडल्या. त्या चिठ्ठ्या मॅकच्याच

हस्ताक्षरातील असल्याची खात्री करण्यात आली. सॅमने स्पष्टीकरण दिले, “ती पत्रे पोलिसांकडे आहेत. मला ती आणता आली नाहीत. पण हे खरेखुरे प्रेमप्रकरण असावे. त्या मिस मॉडने त्याच्याबरोबर भेटीची वेळ ठरवली होती.”

“पण तुम्ही सगळे नेहमी वापरता त्या अंघोळीच्या तळयात, बहुधा नव्हे.” मी म्हणालो.

‘खूप विद्यार्थी मॅकबरोबर नव्हते, अशी ती वेळ होती.”

“असे मॅकने मुद्दाम घडवून आणले होते का?”

सॅमने भुवया ताणून विचार केला.

“मरेने सगळयाना मागे ठेऊन घेतले. न्याहारीपूर्वी त्याला विद्यार्थ्यांना बीजगणितातील काही भाग दाखवायचा होता. बिच्चारा! या प्रकरणात उगीचच गोवला गेला.”

‘आणि तरीही मला असे वाटते की ते मित्र नव्हते.”

“एके काळी ते नव्हते, पण सुमारे वर्षभरापूर्वीपासून ते खूप जवळ आले होते. मरे स्वभावतः फारसा संवेदनशील नाही.’

“मला माहिती आहे. एका कुत्र्याला त्याने बेदम मारहाण केल्याचे तू मला सांगितलेले, मला आठवते आहे.”

“ती जुनी गोष्ट झाली.’

“पण त्यामुळे काही कटू भावना कदाचित, मागे उरल्या असतील.”

“नाही. नाही. ते सच्चे मित्र होते हे नक्की.”

“ठीक तरं मग. त्या मुलीकडून माहिती मिळवायला हवी. तू तिला ओळखतोस?”

“सगळे तिला ओळखतात. ती आसपासच्या सर्व भागातील सुंदरी आहे — खरोखरच खूप सुंदर आहे. त्यामुळे सगळयांचे तिच्याकडे लक्ष असते. मॅक तिच्याकडे आकृष्ट झाल्याचे, मला माहिती होते. पण प्रेमपत्रे लिहिण्याइतके, हे प्रकरण पुढे गेल्याचे मला माहिती नव्हते.”

“पण ती कोण आहे?”

“ती म्हातार्‍या टॉमची मुलगी आहे. फुलवर्थमधील सर्व बोटी व बोटींचे धक्के, त्याच्या मालकीचे आहेत. पूर्वी तो कोळी होता. पण आता बडी असामी झाला आहे. तो आणि त्याचा मुलगा विल्यम्स, व्यवसाय चालवतात.”

“आपण फुलवर्थला जाऊन त्याना भेटायचे का?”

“काय म्हणून?”

“ओहो, आपण सहजपणे काहीतरी कारण काढू शकू. या गरीब माणसाने नक्कीच हे कृष्ण कृत्य केले नसेल. जर खरच त्या जखमा चाबकाच्या फटकार्‍याने झालेल्या असतील, तर ते खरे दुःसाहसच म्हणायला हवे. या सुनसान जागी, त्याच्या ओळखीचे फार लोक नसतील. या गोष्टीचा आपण चहू दिशांनी मागोवा घेऊ आणि गुन्ह्याकडे नेणारा हेतू आपल्याला त्यातून नक्कीच सापडेल.”

“आपण पाहिलेल्या दुःखद गोष्टीने आपली मने निराश झाली नसतील, तर आपल्याला सुगंधित झुडुपांमधील रस्त्यावरून छान फेरफटका मारत जाता येईल. खाडीच्या बाजूला अर्धगोलाच्या खोल भागात, हे गाव वसलेले आहे. जुन्या वस्तीनंतर, बरीच आधुनिक पद्धतीची घरे चढाच्या भागात बांधलेली आहेत. या घरांपैकी एका घराकडे मी सॅमबरोबर निघालो.

“ते कोपर्‍यावरचे घर बघ. उंच मिनार व फरशीचे छप्पर! रंक अवस्थेपासून सुरवात केलेल्या माणसासाठी, चांगलेच आहे. अरे, तिकडे बघ.”

त्या घराचे बागेतील दार उघडे होते व तिथून एक मनुष्य बाहेर पडला. तो उंच, कृश व काळासावळा होता. तो गणितज्ञ मरेच होता हे मी ओळखले. पुढच्याच क्षणी रस्त्यावर आम्ही भेटलो.

“कसं काय?” सॅम म्हणाला. मरेने त्याच्या चौकस काळ्या डोळयांनी, आमच्याकडे एक दृष्टीक्षेप टाकला व बाजूला होऊन आम्हाला वाट करून दिली. पण सॅमच्या प्रश्नाने त्याला परत फिरवले.

सॅमने विचारले,” तुम्ही इथे काय करत होतात?”

मरेचा चेहरा रागाने लाल झाला. ”मी तुमचा कनिष्ठ आहे. तुमच्या हाताखाली काम करतो, पण खासगी गोष्टी मी तुम्हाला विचारून करायला हव्यात, हे मला माहिती नव्हते.”

सॅमने त्याचा राग गिळला. एरवी खरे तर तो शांत राहिला असता. पण आता तो फारच चिडला.

“मिस्टर मरे, या परिस्थितीत तुमचे उत्तर उद्धटपणाचे आहे.”

“तुमचा प्रश्न देखील तसाच असावा.”

“आज पहिल्यांदाच काही मी तुमच्या अशा वागण्याकडे डोळेझाक करत नाही आहे. पण आता मात्र हे शेवटचेच. तुम्ही लवकरच तुमच्या भविष्याची दिशा ठरवून, नोकरीतून कटावे ते बरे.”

“मी तसेच करणार आहे. गेबलमध्ये रहाणारा व ही संस्था भरभराटीला आणणारा असा मी मनुष्य, पण आज या सर्वाला मुकलो आहे.

तो त्याच्या रस्त्याने निधून गेला. त्याच्याकडे सॅम रागीट डोळयांनी बघत राहिला. ”हा सहन करायला अशक्य असा मनुष्य आहे, नाही का?” तो किंचाळला. माझ्या मनःपटलावर एक गोष्ट मुद्रित झाली की गुन्ह्यापासून दूर जाण्याची संधी, मरे

शोधतो आहे. धूसर संशयाची पाल माझ्या मनात चुकचुकू लागली. आता या घरी जाऊन, काय नवीन समजते ते बघू. सॅमबरोबर मी त्या घरात शिरलो.

टॉम तसा फार म्हातारा नसून, मध्यमवयीन वाटत होता. त्याला लाल दाढी होती. तो घुश्यात असावा, कारण त्याचा चेहराही दाढीच्याच रंगाचा झाला होता.

“नाही सर, मला काहीही विचारू नका. माझा मुलगा व मी दोघांचेही असे एकमत आहे की मॅकचे मॉडकडे असलेले लक्ष हे अपमानकारक होते. आणि हो सर, लग्न हा शब्द तर इथे कधी निघालाच नव्हता. तरी पत्रे व भेटीगाठी चालू होत्या. त्या आम्हाला अजिबात पसंत नव्हत्या. मॉडला आई नाही. आम्ही दोघेच तिचे पालक आहोत. आम्ही असे ठरवले आहे — “

तेवढ्यात ती मुलगीच तिथे अवतीर्ण झाली. जगातील कुठल्याही घोळक्यात ती सुंदर ठरली असती, यात काही वाद नव्हता. असे फूल अशा वातावरणात, अशा जागी उमलेल, अशी कोणी कल्पना तरी केली असेल का? मला स्त्रियांचे आकर्षण नेहमीच वाटते, पण माझ्या हृदयावर नेहमी मेंदूची सत्ता चालते. तिच्या ताज्यातवान्या, नितळ रंगाकडे व नाजूक तनुलतेकडे पहाताना, जणू मंदमधुर चंद्र पाहिल्याचे, भासत होते. कुठल्याही तरुण मनुष्याचे हृदय ती नक्कीच तुडवत जात असणार, यात काही शंका नव्हती. अशी रूपवान मुलगी दार उघडून बाहेर आली आणि सॅमच्या पुढे, ती डोळे विस्फारून तणावपूर्ण रीतीने उभी राहीली.

ती म्हणाली, “मॅक मेला हे मला माहिती आहे. त्याच्याबद्दल अजून काही माहिती सांगायला किंवा माझ्याकडून ऐकायला मुळीच कचरू नका.”

तिचे वडिल ओरडून म्हणाले, “आत्ता येऊन गेलेल्या माणसाने, ते आम्हाला सांगितले आहे.”

“माझ्या बहिणीला तुम्ही उगीच या प्रकरणात गोवत आहात.” तिचा भाऊ, विल्यम गुरगुरला. बहिणीने त्याच्याकडे एक जळजळीत व घाबरवणारी नजर टाकली. ”विल्यम, तू माझ्या कामात ढवळाढवळ करू नकोस. मला माझ्या पद्धतीने ते हाताळू दे. गुन्हा घडला आहे हे नक्की. तो आता या जगात नाही. त्याला कुणी मारले याविषयी, मी काही मदत करू शकले तर, तेवढे त्याच्यासाठी मी नक्कीच करीन.”

माझ्या मित्राकडून, तिने सगळी हकीगत अगदी लक्ष देऊन ऐकून घेतली. तिचे शुध्द चारित्र्य व सौदर्य यामुळे, मिस मॉड एक परिपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण स्त्री म्हणून, माझ्या कायम लक्षात रहाणार होती. ती मला बहुधा ओळखत असावी, कारण ती शेवटी माझ्याकडे वळून म्हणाली, “मिस्टर होम्स, ते कुणीही असले तरी माझी मदत व सहानुभूती तुम्हाला राहील.” मला असे वाटले की बोलताना ती धीटपणे विरोधी भूमिका घेतल्याच्या थाटात, वडिलांकडे व भावाकडे बघत होती.

“आभारी आहे. अशा प्रसंगी अशा महिलेच्या भावनांचा, मी आदर करतो. यात एक मारेकरी नसून अनेकजण असावेत, असे तुम्हाला वाटते का? मी तुमच्या एकटीबरोबर थोडे बोलू शकतो का?”

तिचे वडील रागाने ओरडले, “मॉड, तू या भानगडीत पडू नकोस.”

तिने असहाय्यपणे माझ्याकडे पाहीले व म्हणाली, “मी मिस्टर मॅकला चांगले ओळखते. तो शूर व सशक्त मनुष्य होता. एकटा माणूस त्याच्यावर हल्ला करू शकला नसता.”

“सगळ्या जगाला या गोष्टी आज ना उद्या, कळणारच आहेत. त्याची मी इथे उघडपणे चर्चा करायला हरकत नाही. मला खासगीपणा, जास्त बरा वाटला असता पण तुमच्या वडीलाना तसे नको असेल तर, त्यांनाही आपल्या बोलण्यात

सहभागी होऊ दे.” मी म्हणालो. मग मी मृत माणसाच्या खिशात सापडलेल्या कागदाच्या तुकड्याबद्दल बोललो. “ती चिठ्ठी कोर्टासमोर नक्कीच येणार आहे. त्याबद्दल तुम्ही काही सांगू शकता का?”

ती म्हणाली, “यात काहीच गूढ नाही. आमचे लग्न ठरलेच होते. पण आम्ही हे गुप्त ठेवले होते कारण मॅकचे काका अगदी मरणोन्मुख होते व त्यांच्या मनाविरुद्ध मॅकने जर लग्न केले असते, तर त्यांनी त्याला त्यांचा वारस म्हणून बाद केले असते. दुसरे काहीच कारण नव्हते.”

तिचे वडील गुरगुरले, “हे तू आम्हाला सांगायला हवे होतेस.”

“तुम्ही मला मायेने विचारले असते, तर मी सांगितले असते.”

“माझ्या मुलीने परक्या माणसाबद्दल असे काही सांगायला, माझा विरोध आहे.”

“तुमचा त्याच्याबद्दल जो पूर्वग्रह होता, त्यामुळे आम्ही तुम्हाला काही सांगितले नाही. अगदी आमच्या या ठरलेल्या भेटीपर्यंत” हाताने तिच्या ड्रेसमधून एक चुरगळलेली चिठ्ठी तिने काढली. ह्या त्याच्या चिठ्ठीला मी उत्तर लिहिले होते.

प्रिय,

मंगळवारी सूर्यास्तानंतर समुद्रकिनारी आपल्या नेहमीच्या जागी. हा एवढाच वेळ मी काढू शकेन,

M

“आजच मंगळवार आहे व आज संध्याकाळी आम्ही भेटणार होतो.”

मी चिठ्ठीकडे वळलो. “ही पोस्टाने तर आलेली नाही. मग ही तुम्हाला मिळाली कशी?”

"याचे उत्तर मी देणार नाही. तुम्ही तपास करत असलेल्या बाबीचा, याच्याशी काही संबंध नाही. पण त्या तपासासंबंधी काही असेल, तर मात्र मी मोकळेपणाने सांगेन."

ती बोलल्याप्रमाणेच वागली. पण आमच्या तपासामध्ये, त्यामुळे काहीच मदत झाली नाही. तिच्या प्रियकराला कोणी छुपा शत्रू होता असा विचार करायचे, तिला काहीच कारण नव्हते. पण तिने कबूल केले की तिचे चाहते असणारे खूपजण होते.

"त्यापैकी एक मरे होता का, असे मी विचारू शकतो का?"

ती लाजून, गोंधळून गेली व म्हणाली, "एके काळी मला वाटते तो होता. पण जेव्हा त्याला मॅक व माझ्यातील संबंध समजले, तेव्हा सर्व बदलले."

परत त्या विचित्र माणसाबद्दल वाटणारा संशय, डोके वर काढू लागला. त्याची खोली तपासली पाहीजे व तीदेखील गुप्तपणे! सॅमच्या मनात पण असा संशय आल्याने, तो या गोष्टीस तयार झाला. आम्ही मॉडच्या घरून परत आलो. या प्रकरणाचे धागेदोरे हातात आल्यासारखे आम्हाला वाटू लागले.

एक आठवडा गेला.

कोर्टात या बाबीवर काहीच प्रकाश पडला नाही. पुढील तारीख पडली. सॅमचा कनिष्ठ मरे, याच्या खोलीचा आम्ही वरवर शोध घेतला, पण काहीच सापडले नाही. व्यक्तिशः मी शरीराने व मनानेही, सर्व प्रकाराचा परत परत शोध घेतला. पण काही निष्कर्षांप्रत आलो नाही. माझ्या आतापर्यंतच्या सर्व केसेसमध्ये मला इतका हतबल झालेला, माझ्या वाचकांनी कधी पाहिला नसेल. या चमत्कृतीवर माझ्या कल्पनेच्या भरारीनेही, काही उत्तर सापडेना. मग मला कुत्र्याची घटना आठवली.

माझ्याकडे काम करणाऱ्या बाईच्या कानावर या गोष्टी आल्या. गावगप्पांमधून या गोष्टी पसरतातच.

“सर, मॅकच्या कुत्र्याची करूण गोष्ट आहे.” एका संध्याकाळी ती म्हणाली.

“मॅकच्या कुत्र्याचे काय?”

“सर, तो मेला. मालकाच्या दुःखाने मेला.”

“कोणी सांगितले?”

“का सर? सगळेच तर असं म्हणत आहेत. फारच वाईट झाले. आठवडाभर त्याने काही खाल्ले नाही. मग गेबलमधील दोघाना तो समुद्रकिनाऱ्यावर मेलेला आढळला. जिथे त्याचा मालक मेला, त्याच जागी!”

“अगदी त्याच जागी” हे शब्द माझ्या स्मृतीत खोल जाऊन बसले. एक छोटासा धागा महत्वाचा असल्याचे, मला लख्ख जाणवले. मालकानंतर कुत्र्याने मरणे, हा कुत्र्याचा चांगला इमानदारीचा स्वभाव आहे. पण ‘त्याच ठिकाणी’! तो समुद्रकिनारा इतका महत्वाचा होता का? की त्याचा पण कोणी सूडाने बळी घेतला? असे शक्य असेल का?— हो. ही पुसटशी शक्यता होतीच. पण माझ्या मनात काही आकार घेऊ लागले होते. काही मिनिटातच मी गेबलकडे निघालो. तिथे सॅम मला त्याच्या अभ्यासिकेत भेटला. ज्याना तो कुत्रा सापडला, त्या दोन विद्यार्थ्यांना त्याने बोलाविले.

“हो. तो त्या तळयाच्या काठावर पडला होता. त्याने बहुधा त्याच्या मालकाचा माग काढला असावा.” त्यांच्यापैकी एकजण म्हणाला.

तो इमानी छोटासा प्राणी हॉलमध्ये सतरंजीवर पडला होता. त्याचे शरीर कडक झाले होते, डोळे बाहेर आले होते व पाय वेडेवाकडे झाले होते. हा नक्कीच छळ होता.

गेबलकडून मी किनाऱ्यावरील त्या तळयाकडे गेलो. सूर्यास्त झाला होता व खडकांच्या काळया सावल्या त्यावर पसरून ते शिशाच्या पत्र्याप्रमाणे भासत होते. ती जागा सुनसान होती. डोक्यावर उडणारे दोन समुद्रपक्षी सोडले, तर जिवंतपणाची काहीच खूण तेथे नव्हती. संधीप्रकाशात मला त्या छोट्या कुत्र्याच्या पायांच्या खुणा, जिथे त्याच्या मालकाचा टॉवेल पडला होता बरोबर त्याच जागी, वाळूवर, उमटलेल्या दिसल्या. माझ्या भोवतालच्या सावल्या गडद होईपर्यंत, मी तिथे ध्यानमग्न होऊन बसलो. माझ्या मनात. विचारांचा कल्लोळ उडाला होता. काहीतरी एक अगदी महत्वाची वस्तू तुम्ही शोधत आहात, ती तिथे आहे हे तुम्हाला माहिती आहे पण तरीही ती तुम्हाला सापडत नाही आहे, अशा तऱ्हेची आपल्याला पडणारी स्वप्ने, तुम्हाला माहिती असतील. त्या मरणजागी, त्या संध्याकाळी, एकट्याने उभे राहून मला काहीसे असेच वाटत होते. शेवटी मी उठून, घराकडे चालू लागलो. मी चढाचा रस्ता चढत असताना एकदम मला ते उमगले. मी फुकटच ज्या गोष्टीमागे इतका वेळ घालवत होतो, ती क्षणार्धात माझ्यासमोर लख्ख प्रकाशली. तुम्ही किंवा वॉटसनही असे समजत असता, की माझ्याकडे शास्त्रीय चाकोरीत न बसणारे खूप ज्ञान आहे व ते माझ्या कामासाठी खूप उपयोगी असते, तर ते खरेच आहे. माझ्या मनात इतक्या गोष्टी साठलेल्या असतात की कधीकधी मी देखील, त्यातल्या काही विसरून जातो. त्यातील काही, हा गुंता सोडवायला उपयोगी पडतील अशा आहेत. त्या तशा धूसरच असतात पण त्या कशा समोर आणायच्या, हे निदान मला उमगते. ती भयंकर पण शक्य वाटणारी गोष्ट, मला आजमावून बघायची होती.

माझ्या छोट्याशा जागेत एक बऱ्यापैकी मोठा माळा आहे. त्यात ठासून पुस्तके भरलेली आहेत. ती चाळण्यात मी एक तास घालवला. शेवटी एका पुस्तकात मला काहीतरी असे सापडले, की त्याबद्दल वाचलेले मला अंधुकपणे आठवत होते. त्याचा खरच दूरान्वयाने संबंध लागंत होता. खरे तर हे अशक्य होते, पण हे खरे असू शकते का, हे समजल्याशिवाय आता मला चैन पडत नव्हते. पुढे काय करायचे आहे हे ठरवून, मी स्वस्थ बसलो.

पण मध्ये माझी चिडचिड वाढेल असा एक अडथळा आला. माझा चहा होतो आहे व मी समुद्रकिनारी जायला निघतो आहे तोच, इन्स्पेक्टर बार्डल ( जो ससेक्सचा होता ) आला. तो विचारी डोळयांचा व धिप्पाड होता. तो माझ्याकडे त्रासिक चेहऱ्याने बघत होता.

तो म्हणाला, "मला तुमचा दांडगा अनुभव माहिती आहे, सर. अर्थात हे सर्व खासगीत आहे व थोडक्यात सांगतो. या मॅकच्या केसमध्ये मरेला अटक करावी की नाही याबद्दल मी गोंधळून गेलो आहे."

"मरेला अटक?"

"हो सर. अजून दुसऱ्या कुणावरच संशयाची सुई फिरत नाही. तेथील सुनसानपणाचा हा फायदा आहे. आम्ही संशयाचे वर्तुळ अगदी लहान करत आणले आहे. हे कृत्य जर त्याने केले नसेल, तर मग कुणी केले?"

"तुम्हाला त्याच्याविरुध्ध काही सापडले आहे?'

तोही माझ्यासारखाच विचार करत होता. मरेचे चारित्र्य व त्याचा विचित्रपणा यामुळे त्याच्यावर संशय येत होता. कुत्र्याच्या बाबतीत त्याने दाखवलेला अति संतापीपणा, पूर्वी त्याचे मॅकशी असलेले भांडण, मिस मॉडबद्दल त्याला पूर्वी

वाटत असलेली आपुलकी व आता होत असलेला पश्चात्ताप; या सर्व गोष्टी! हे सर्व मुद्दे आमच्या दोघांचे सारखेच होते. मरे हळूहळू इथून जायच्या तयारीला लागला होता.

“एवढे सगळे मुद्दे त्याचा विरोधात असून मी त्याला जाऊ दिले तर माझी काय इभ्रत राहील?” तो दणकट मनुष्य त्रासून म्हणत होता.

मी म्हणालो, “या केसमधील सगळे कच्चे दुवे आपण लक्षात घेऊ. गुन्ह्याच्या दिवशी सकाळी तो निरपराध असल्याचे, त्याने सांगितले आहे. तो त्याच्या हुशार विद्यार्थ्यांबरोबर अगदी शेवटच्या घटकेपर्यंत होता आणि आपल्याला मॅक दिसल्यावर काही मिनिटातच तो आपल्यामागे उभा होता. त्याच्याइतक्याच बळकट माणसावर, त्याने इतका क्रूर हल्ला करणेही खरे वाटत नाही. शेवटी प्रश्न उरतो तो म्हणजे जखमा केले गेलेले हत्यार!”

“एखादा चाबूक की धारदार हत्यार काय असावे?”

“तुम्ही त्या जखमा नीट पाहिल्यात का ?” मी विचारले.

“मी व डॉक्टरनेही त्या पाहिल्या.

“पण मी त्या अगदी काळजीपूर्वक भिंग घेऊन पाहिल्या. त्या विशेष प्रकारच्या होत्या.”

“मिस्टर होम्स, त्या कशा प्रकारच्या होत्या?”

मी माझ्या आतील टेबलावरून त्याचा मोठा केलेला फोटो आणला. “अशा केसमध्ये माझी अशी पद्धत असते.” मी स्पष्ट केले.

‘मिस्टर होम्स, तुमची पद्धत अगदी खोलवर विचार करणारी आहे.”

“मी असे केले नाही, तरच नवल! आता उजव्या खांद्यावरील वळ व जखमांचा विचार करू. तुम्हाला त्या, वैशिट्यपूर्ण वाटत नाहीत का?”

“मला वाटतात, असे मी म्हणू शकत नाही.’

“त्या जखमा कमीअधिक खोलीच्या आहेत हे नक्की. रक्तवाहिनीतून इतर ठिकाणी रक्त पसरल्याचे हे डाग इतरत्रही आहेत. याचा अर्थ काय?”

“मला कल्पना नाही. तुम्हाला आहे का?’

“बहुधा मला आहे. कदाचित नाहीही. लवकरच मी सांगू शकेन. कशामुळे या जखमा झाल्या आहेत हे कळले, तर गुन्ह्याचा माग काढता येईल.”

“ही खरे तर, अनाकलनीय कल्पना आहे, पण वायरचे तापलेले जाळे पाठीवर ठेवले गेले, तर असे उल्लेखनीय रक्ताचे ठिपके व एकमेकाना छेदणाऱ्या जखमी रेषा दिसू शकतील.”

“हे फारच हुशारीचे निरीक्षण आहे. रक्ताच्या ठिपक्यासारख्या बारीक गुठळया व जाळीचे एकमेकांना जोडले गेलेले बिंदू याचा काहीतरी संबंध असू शकेल.”

“मिस्टर होम्स, मला वाटतं हा अंदाज खरा असावा.”

“मिस्टर बार्डल, किंवा कदाचित दुसरे काही कारण असेल, पण मरेला अटक करण्याइतके कुठलेच पुरेसे  नाही. शिवाय मॅकचे ते शेवटचे शब्द, ‘सिंहाची आयाळ’ ( LION’S MANE )

“मला आश्चर्य वाटतं, मरे —--“

‘मी तो विचार केला आहे. दुसऱ्या शब्दाचे (  MANE ) मरेशी  काही साम्य असावे का? पण नाही. ते शब्द,  ) LION”S MANE ) हे त्याने अति आर्ततेने उच्चारले होते. तो दुसरा शब्द नक्की ( MARE ) मरे असा नसून आयाळ (MANE ) असाच होता.”

“मिस्टर होम्स, दुसरा काहीच पर्याय नाही का?’

“कदाचित आहे .पण काहीतरी ठोस हाती लागल्याशिवाय मी त्याबद्दल काही बोलणार नाही.”

“पण मग कधी बोलायचे?”’

“एखाद्या तासाभरात.”

इन्स्पेक्टरने त्याची हनुवटी खाजवली व माझ्याकडे संशयाने बघितले.

“मिस्टर होम्स, तुमच्या मनात काय चालले आहे हे मी समजू शकलो असतो तर! कदाचित त्या मच्छिमार बोटी.”

“नाही. नाही. त्या तर खूप लांब होत्या.”

“मग मिस मॉडचे वडील किंवा भाऊ? त्यांचे मॅकशी फार काही बरे नव्हते. त्यांनी काहीतरी भलेबुरे केले असेल का?”

“नाही. नाही. माझी तयारी झाल्याशिवाय मला कुठल्याही भरीला पाडू नका.” मी हसून म्हणालो. इन्स्पेक्टर, आता आपल्या प्रत्येकाला स्वतःचे काम आहे. आपण दुपारी भेटू—-“

माझे बाहेरचे दार उघडे होते. अडखळत्या पावलांनी अचानक, मरे खोलीत आला. त्याचे कपडे रानटीपणे विस्कटलेले होते. फिकुटलेला व गबाळा असा तो दिसत होता. त्याचा काटकुळ्या हातांनी तो खुर्चीचा आधार घेऊन, उभा रहायला बघत होता. तो धापा टाकत म्हणाला, “ब्रँडी ब्रँडी” आणि सोफ्यावर पडला.

तो एकटा नव्हता. त्याच्यामागे बोडक्या डोक्याचा, त्याच्याइतक्याच धापा टाकणारा सॅम होता. तो ओरडला, “हो. हो. ब्रँडी. हा मरे बेशुध्द पडायला आला आहे. मी कसेबसे त्याला इथवर आणले आहे. वाटेत दोनदा तो चक्कर येऊन पडला.

थोडी ब्रँडी प्यायल्यावर, मरेमध्ये आश्चर्यकारक बदल झाला. एका हातावर जोर देत तो ढकलल्यासारखा उठला. खांद्यावरून त्याचा कोट काढला. “कृपया तेल व औषध — काहीतरी गुंगीचे औषध. हे असह्य दुःख कमी करण्यासाठी काहीही!” तो ओरडला.

ते दृश्य पाहून इन्स्पेक्टर व मी थिजून गेलो. मरेच्या खांद्यावर मॅकसारख्याच रक्ताळलेल्या विचित्र खुणा होत्या. अशाच जखमांनी मॅक मेला होता.

दुखणे खरोखरीच भयानक होते. एकाच ठिकाणी नव्हते. मध्येच मरेचा श्वास थांबून, चेहरा काळानिळा पडत होता आणि मग जोराने धापा टाकत, तो त्याचे हात छातीवर ठेवत होता. त्याच्या कपाळावरून घाम गळत होता. तो कधीही मरेल असे वाटत होते. अधिकाधिक ब्रँडी त्याच्या घशात आम्ही ओतत होतो. प्रत्येक डोस त्याला जीवनाकडे खेचून आणत होता. त्याच्या जखमांव्रर आयोडीनमध्ये बुडवलेला कापूस लावल्याने वेदना कमी होऊ लागल्या होत्या. तो अर्धवट झोपेत होता पण निदान जिवंत होता.

त्याला काही प्रश्न विचारणे शक्य नव्हते. पण त्याच्यात सुधारणा बघून, सॅम माझ्याकडे वळून म्हणाला, “हे काय चालले आहे?”

“तुला तो कुठे सापडला?”

“खाली समुद्रकिनाऱ्यावर. मॅकचा अंत जिथे झाला बरोबर तिथेच. मॅकचे हृदय जसे दुबळे होते तसे याचे असते, तर तो आत्ता इथे नसता. त्याला आणताना वाटेत दोनदा मला असे वाटले, की तो मेलाच. गेबल गाव फार लांब असल्याने, मी त्याला इथे आणले.”

“तू त्याला किनाऱ्यावर पाहिलेस का?”

“मी खडकांवर फिरत होतो, तेव्हा त्याची किंकाळी ऐकली. तो पाण्याच्या कडेला होता. एखाद्या दारुड्यासारखा गरगरत होता. मी खाली धावलो. त्याच्याकडे कपडे फेकले व त्याला वर आणले. होम्स, कृपा करून तुझी सर्व शक्ती पणाला लाव, पण या शापित जागेचे काहीतरी कर. इथे जगणे कठीण झाले आहे. तू एवढा जगभर प्रसिध्द आहेस आणि आमच्यासाठी काहीच करू शकत नाहीस?”

“सॅम, मला वाटते मी करू शकेन. आता माझ्याबरोबर ये आणि इन्स्पेक्टर तुम्हीदेखील या. या केसमधील खुन्याला तुमच्या ताब्यात देता येते का ते पाहू.”

माझ्या घरकाम करणाऱ्या बाईवर जखमी माणसाला सोपवून, आम्ही तिघे त्या भयानक तळयाकडे गेलो. काठावर काही कपडे, टॉवेल वगैरे पडले होते. ते मरेचेच असावेत. मी हळूहळू काठाने फिरलो. माझ्या मागोमाग माझे सोबती देखील! बहुतेक तळे उथळ होते. पण खडकांच्या खाली ते चारपाच फूट खोल होते. पोहणारा नक्कीच या भागात जाणार! तो भाग अगदी आरशासारखा चकचकीत व शांत असून त्यात खडकांचे प्रतिबिंब पडले होते. मी पाण्यात उतरलो. खोल गेलो. अगदी खोल, शांत भागात पोचलो आणि मी ज्याचा शोध घेत होतो ते माझ्या डोळयाना दिसले. मी विजयोन्मादाने ओरडलो, ”मोठा, केसाळ जेलीफिश, जणू सिंहाची आयाळच!”

मी खडकाचा पाण्यातील जो भाग बघत होतो, तो खरच तोडलेल्या सिंहाच्या आयाळीसारखा दिसत होता. पाण्यापासून खाली साधारणपणे तीन फूटावर ते विचित्र जाळयासारखे हलणारे मऊ खडकाचे की प्रवाळाचे पुढे आलेले पोकळ टोक होते. ते पिवळया रंगाचे व मध्येच शुभ्रपणे चकाकणारे होते. ते हळूवारपणे थोडे प्रसरण पावल्यासारखे होऊन पुन्हा आकुंचन पावत होते.

“त्याने भरपूर विनाश केला आहे. आता त्याचे दिवस संपले. सॅम मला मदत कर. त्या खुन्याचा नेहमीकरता नायनाट करून टाकू.” मी ओरडलो.

समुद्राचे पाणी आदळून, झीज होऊन, मऊसर व जाळीदारपणे धारदार झालेला असा तो भाग, पाण्यातील खडकावर तयार झाला होता. आम्ही जोरदारपणे ढकलून तो पाण्यात पाडला. जोरदार आवाज झाला व खूपसे बुडबुडे येऊन गेल्यावर तो खालील तळाच्या खडकावर स्थिर झाला. त्या जाळीदार भागाच्या आत तो जेलीफिश वळवळत होता. त्या जाळीदार भागावरील धुळकट तेलाचा थर वर आला व त्याबरोबर तो जाळीदार धारदार भाग आपटून फुटल्याने त्यातून तो जेलीफिश बाहेर येऊन पृष्ठभागावर तरंगू लागला.

इन्स्पेक्टर ओरडला, “आला तो! मी त्याला पकडला. मिस्टर होम्स, ते काय होते? मी इथेच जन्मलो व वाढलो पण असले काही मी कधी पाहिले नव्हते. तो ससेक्सचा नाही.”

“तो ससेक्सचाच आहे. नैऋत्येच्या वाऱ्याने तो इकडे आला असेल. तुम्ही दोघेही माझ्या घरी चला. समुद्रातील या मोठ्या भयानक जेलीफिशच्या तावडीत सापडलेल्या एकाचे अनुभव तुम्हाला सांगतो. आम्ही माझ्या घरी पोचलो तेव्हा मरे बराच सावरलेला होता व बसू शकत होता. पण अजून विचार वगैरे करू शकत नव्हता. सारख्या कळा येऊन कण्हत होता. अडखळत तो म्हणाला, इतक्या असह्य वेदना एकाएकी त्याला झाल्या, यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. काठावर येण्याचे धैर्य मात्र त्याने दाखवले.

मी म्हणालो, “ हे पुस्तक बघा. यात वाचून, माझ्या डोक्यात प्रकाश पडला. या प्रसिध्द पुस्तकात लेखक म्हणतो, की या भयंकर प्राण्याच्या तावडीत सापडण्यापासून, तो थोडक्यात बचावला. त्यामुळे त्याचे अनुभव अस्सल आहेत. त्या रौद्र प्राण्याचे नाव, मोठा केसाळ जेलीफिश ( CYANEA CAPILIATA ) आहे. त्याचा चावा कोब्रा नागासारखाच, पण त्याहून जास्त वेदनादायी आहे. त्याचा सुटा लवलवणारा भाग सिंहाच्या आयाळीसारखा दिसतो. त्याच्या चाव्याने, छातीत गोळी

शिरल्यासारख्या वेदना होतात. रक्ताभिसरणावर पण त्याचा वाईट परिणाम होतो. इन्स्पेक्टर, तुम्ही हे पुस्तक घेऊन जा व वाचा. मग बिचाऱ्या मॅकची कशी गत झाली ते तुम्हाला कळेल.

मरे कसनुसे हसत म्हणाला, “नशीब बलवत्तर म्हणून मी वाचलो. मिस्टर होम्स, मी तुम्हाला दोष देत नाही. इन्स्पेक्टर, तुम्हालाही नाही. तुमचा संशय साहजिकच होता. माझ्या गरीब बिचाऱ्या मित्राचे नशीब मी स्वतःच अनुभवले व मला अटक होण्याच्या संध्याकाळीच, हे घडल्यामुळे मी सुटलो.”

“नाही मिस्टर मरे, मी आधीच या पाण्यात असणाऱ्या संकटाच्या मागे होतो. पण अजून थोडे आधी मी ते शोधले असते, तर तुम्हाला या भयंकर अनुभवातून मी जाऊच दिले नसते.“

“पण तुमच्या ते कसे लक्षात आले, मिस्टर होम्स?”

“मी बरेच वाचन करत असतो आणि सिंहाची आयाळ हे शब्द माझ्या मनात घुमत राहीले. याबद्दल वेगळ्या संदर्भात मी कुठेतरी वाचले आहे. मॅकने या प्राण्याला पाण्यात पोहताना पाहिले असणार आणि हे दोन शब्द उच्चारून त्याने मरण्यापूर्वी आपल्याला सावध करायचा प्रयत्न केला असणार.”

मरे म्हणाला, “हं. आता मला सर्व नीट समजले. एकदोन स्पष्टीकरणाचे शब्द बोलतो. कारण तुमच्या चौकशीची सुई कुठल्या दिशेने फिरणार हे मला माहिती होते. मी मिस मॉडवर प्रेम करत होतो, हे खरे आहे पण तिने माझा मित्र मॅक याला निवडल्यापासून, ती सुखी कशी होईल, हाच माझा ध्यास होता. मी बाजूला उभा राहून त्याना मदत करायला तयार होतो. मी त्यांच्या निरोपाची देवाणघेवाण करत असे. मी त्यांच्या विश्वासातील होतो. ती मला प्रिय होती, त्यामुळे मी अचानक हृदयशून्य पद्धतीने, माझ्या मित्राच्या मृत्यूची बातमी तिला जाऊन सांगितली. ती हे

तुम्हाला सांगणार नाही. कारण तुम्ही त्यावर नाक मुरडाल व मला त्रास होईल. पण तुमचा निरोप घेऊन मला गेबलला गेले पाहिजे. माझा येथील बाडबिस्तरा मला गुंडाळायला हवा.”

सॅमने त्याचा हात धरला. “आपले भांडण मिटले असे समज. मरे, भूतकाळातील गोष्टींबद्दल मला क्षमा कर. यापुढे आपण एकमेकांना चांगले समजून घेऊ.” मित्रांसारखे हातात हात गुंफून ते बाहेर पडले. त्याच्या उग्र डोळयांनी माझ्याकडे टक लाऊन बघत इन्स्पेक्टर मागे राहीला.

शेवटी तो उद्गारला, “छान! तुम्ही जिंकलेत. मी तुमच्याबद्दल वाचले होते. पण माझा विश्वास बसला नव्हता. हे आश्चर्यकारकच आहे.”

मला हातमिळवणी करावीच लागली. खरे तर अशी स्तुती ऐकणे, म्हणजे स्वतःचे स्थान खाली करून घेणे होय.

पण मला निष्कर्षाप्रत यायला उशीर झाला, फारच उशीर! जर प्रेत पाण्यात सापडले असते, तर मी त्यामागचे रहस्य लगेच शोधून काढले असते. कोरड्या टॉवेलमुळे माझी फसगत झाली. त्या बिचाऱ्या माणसाला अंग कोरडे करायचे सुचले नसणार. त्यामुळे मला असे वाटले की तो पाण्यात उतरलाच नाही. त्यामुळे पाण्यातील एखाद्या प्राण्याने हल्ला केला असेल असे मला कसे सुचणार? तिथेच मी भरकटलो. ठीक आहे’.

“इन्स्पेक्टर, मी पोलीस खात्यातील तुम्हा लोकांना कमी लेखत होतो. पण त्या मोठ्या जेलीफिशने जवळजवळ माझ्यावर सूडच उगवला.”



# माझारिन हिरा



बेकर रस्त्यावरील पसारा असलेल्या त्या खोलीत परत एकदा आल्यामुळे, डॉ वॉटसनला बरे वाटले. इथे अनेक प्रकारच्या उल्लेखनीय साहसांचा, उगम झाला होता. त्याने भिंतीवर लावलेल्या शास्त्रीय तक्त्यांकडे फिरून पाहिले. आम्लाने भरलेल्या रासायनिक बाटल्यांचा कोपरा, व्हायोलिनची उघडी केस, तंबाखूच्या जुन्या नळया पडलेले कोळशाचे धातूचे भांडे; असे सर्व सामान तिथे पडले होते. शेवटी त्याचे डोळे बिलीच्या हसऱ्या व तरतरीत चेहऱ्यावर स्थिर झाले. बिली हा होम्सचा नोकर तरूण, अत्यंत हुशार व युक्तीबाज होता. त्या महान गुप्तहेराचे एकाकीपण, कमी करण्यासाठी त्याचा हातभार लागत असे.

"बिली, काहीच बदललेले दिसत नाही. तू देखील होतास तसाच आहेस. मला अशी आशा आहे, की त्याच्याबद्दल पण असेच म्हणता यावे." डॉ वॉटसन बोलला.

बिलीने थोड्या उदासीनतेने, झोपायच्या खोलीच्या बंद दाराकडे पाहिले व म्हणाला, "मला वाटतं तो अजून अंथरुणात झोपलेला आहे."

छान उन्हाळयातील संध्याकाळचे सात वाजले होते. त्याच्या जुन्या मित्राच्या ठराविक दिनक्रम नसण्याची सवय अंगवळणी पडलेल्या डॉ वॉटसनला, याचे फारसे आश्चर्य वाटले नाही.

"म्हणजे मला वाटतं एक केस?"

"हो सर, तो सध्या त्यात फार गुंतलेला आहे. मला त्याच्या तब्येतीची काळजी वाटते. तो अशक्त व फिकट होत चालला आहे. काही खात नाही. 'मिस्टर होम्स, तुम्हाला केंव्हा जेवायला आवडेल' असे मिसेस हडसनने विचारल्यावर तो म्हणाला, 'परवा साडेसात वाजता!'. तुम्हाला माहिती आहे की एखाद्या केसच्या मागे तो असेल, तर कसा वागतो."

"हो बिली, मला माहिती आहे."

"तो कुणाचा तरी पाठलाग करतो आहे. काल तो एका काम शोधणाऱ्या कामगाराच्या वेषात होता. आज तो एक म्हातारी बाई झाला होता. आणि मी फसलो. खरच फसलो. पण आता मला त्याचे हे उद्योग, माहिती झाले आहेत व आता त्याने अजून कसले सोंग घेतले तरी, मी त्याला नक्की ओळखेन." सोफ्यावर टेकून ठेवलेल्या एका मोठ्या छत्रीकडे निर्देश करत, हसत बिली म्हणाला, "ती त्या म्हातारीचे सोंग घेण्याच्या साहित्यातील एक वस्तू आहे."

“पण बिली, हे सर्व काय चालले आहे?”

राज्याची गुप्त खलबते करावी, तशा खालच्या आवाजात बिली बोलला, “तुम्हाला सांगायला माझी काही हरकत नाही, सर, पण हे बाहेर कुठे फुटता कामा नये. ही राणीच्या मुकुटातील हिऱ्याची केस आहे.”

“काय, तो एक लाख पौडांचा दरोडा?”

“हो सर. तो हिरा त्यांना परत मिळवायचा आहे. पंतप्रधान व गृहसचिव या सोफ्यावर बसले होते. मिस्टर होम्स त्यांच्याशी खूपच आदराने वागत होते. त्याने थोड्याच वेळात त्यांना शांत केले आणि शक्य असेल तेवढी मदत करण्याचे आश्वासन दिले. मग उमराव कॅन्टलमिअर — “

“बापरे!”

“याचा अर्थ काय माहिती आहे? पंतप्रधान मला ठीक वाटले. पण जर मी काही बोलायचेच ठरवले तर असे म्हणेन, की तो गृहसचिव कॅन्टलमिअर, मला फारच कडक वाटला. तसे पाहता तो सुजाण व मदतीला तत्पर असणारा असावा, पण त्याची अरेरावी मला सहन होत नाही व मिस्टर होम्सनाही. असं बघा, मिस्टर होम्सवर, त्यांचा विश्वास नाही. मिस्टर होम्सकडे हे काम सोपवायलादेखील, ते नाराज होते. पण त्यांचे काही चालले नाही.”

“मिस्टर होम्सना हे माहिती आहे?”

“जे समजायला पाहिजे ते, मिस्टर होम्सना नेहमीच समजते.”

“आपण अशी आशा करू की, तो त्याच्या कामात यशस्वी होईल आणि उमराव कॅन्टलमिअर खजिल होईल. पण मी काय म्हणतो बिली, ती खिडकी पडद्याने का झाकली आहे?”

"तीन दिवसांपूर्वी मिस्टर होम्सने तसे केले आहे. त्यामागे काहीतरी मजेशीर कारण असावे."

बिल पुढे झाला व सोंग घ्यायचे सामान, भिंतीवरील गोलाकार खिडकीसमोरून बाजूला केले.

डॉ वॉटसनच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडल्याशिवाय राहिला नाही. त्याच्या मित्राच्या चेहऱ्याशी जुळणारा मुखवटा तिथे पडला होता व गाऊनही पडला होता. त्या मुखवट्याचा पाऊण भाग, खिडकीच्या दिशेने खाली झुकलेला होता. जणू काही एक अदृष्य पुस्तक वाचले जात होते. धड खुर्चीवर बसले होते. बिलीने तो मुखवटा हलवून हवेत धरला.

"आपण तो वेगळया कोनात ठेऊ म्हणजे खरा वाटेल. जर खिडकीचा पडदा खाली नसता, तर मी त्याला हात लावायचे साहस केले नसते. पण पडदे उघडलेले असतील तेव्हा ते लांबूनही दिसू शकेल."

"आपण असेच काहीतरी मागे देखील वापरले होते."

"मी येण्यापूर्वी असेल." बिली म्हणाला व त्याने खिडकीचे पडदे बाजूला करुन बाहेर रस्त्यावर पाहिले. "तेथून लोक आपल्याकडे बघत आहेत. आता एकजण मला खिडकीशी दिसतो आहे. तुम्ही पहा."

वॉटसन एक पाऊल पुढे गेला. तेवढ्यात झोपायच्या खोलीचे दार उघडून, उंच व बारीक होम्स आत आला. त्याचा चेहरा थोडा फिकट व ओढलेला दिसत होता, पण त्याचे एकंदर दिसणे नेहमीप्रमाणे दमदार होते. एका उडीत, तो खिडकीजवळ आला व पडदे ओढून घेतले.

"हे असे पाहिजे. बिली, मुला, तुझ्या जिवावर बेतले होते हे विसरलास? अजून तरी माझे, तुझ्याशिवाय अडते. बरं वॉटसन, तुला या पूर्वीच्या जागी परत एकदा बघून चांगले वाटले. तू अगदी योग्य वेळी आला आहेस."

“मी पण तसेच समजतो.”

“बिली, तू जाऊ शकतोस. वॉटसन, हा मुलगा म्हणजे एक अडचण होऊन बसला आहे. त्याला धोक्यात उडी घालायला सांगायचा माझा निर्णय, कितपत बरोबर आहे कुणास ठाऊक?”

“होम्स, कसला धोका?”

“अचानक मरणाचा. मी आज संध्याकाळी कसली तरी अपेक्षा करतो आहे.”

“कसली अपेक्षा?”

“खून होण्याची, वॉटसन”

“नाही. नाही. होम्स, तू विनोद करतो आहेस.”

“माझ्या अत्यंत तोकड्या विनोद्बुद्धीतूनदेखील, मी यापेक्षा चांगला विनोद करू शकेन. पण मधल्या काळात आपण आरामात असू शकतो, नाही का? आपण पेयपान करू शकतो का? सिगरेटी व सोडा, जुन्या जागीच असेल. तू नेहमी बसायचास, त्या हाताच्या खुर्चीत तुला बसलेले मला पाहूदे. तुला माझा पाईप आणि तंबाखू सहन होते आहे अशी मी आशा करतो. सध्या त्या गोष्टींनी, अन्नाची जागा घेतली आहे.”

“पण तू नेहमीसारखे खात का नाहीस?”

“कारण उपासमार केली की शरीर पुन्हा ताजेतवाने होते. एक डॉक्टर म्हणून माझ्या प्रिय वॉटसन, तुला हे कबूल केलेच पाहिजे की अन्नपचनानंतर शरीराला जे पोषण मिळते, त्यातील बरेचसे मेंदूच्या कार्यात संपून जाते. मी मेदू आहे,

वॉटसन. माझे बाकी शरीर म्हणजे जणू काही आंत्रपुच्छ आहे. म्हणून मला मेंदूकडे लक्ष द्यायला हवे.”

“पण हे प्रकृतीला हानिकारक आहे, होम्स.”

“तुझ्या स्मरणशक्तीला कामाला लावून, माझ्या खुन्याचे नाव व पत्ता तू लक्षात ठेवू शकतोस. नंतर माझे प्रेम आणि आशीर्वाद यांच्यासह तुला ते स्कॉटलंड यार्डकडे पाठवता येईल. काऊंट निग्रेटो सिलव्हियस असे त्याचे नाव आहे. लिहून ठेव बरं. लिहून ठेव. १३६, मूरसाईडस गार्डन, एन डब्ल्यू; असा त्याचा पत्ता आहे. कळले?’

वॉटसनचा चेहरा अचानक काळजीयुक्त झाला. होम्स जो टोकाचा धोका पत्करत होता तो वॉटसनला माहिती होता आणि तो जे म्हणाला, ती अतिशयोक्ती नसून, आहे त्यापेक्षा कमीच त्याने सांगितले असणार. वॉटसन हा कार्यतत्पर माणूस होता. या प्रसंगाला तोंड देण्यासाठी तो लगेच तयार झाला.

“तू माझ्यावर विसंबून राहा. होम्स. मला एकदोन दिवस काही काम नाही आहे.”

“तुझी नीतीतत्वे कधी सुधारणार नाहीत. वॉटसन, खोटे बोलण्याचा दुर्गुण तू तुझ्यात नव्याने सामावलेला दिसतोस. प्रत्येक तासाला फोन येणारा व सतत कार्यमग्न असणारा असा, तू एक व्यग्र डॉक्टर असल्याचे मला माहिती आहे.”

“पण ते ह्या कामाइतके महत्वाचे नाही. पण तू या गुन्हेगारांना अटक करू शकत नाहीस का?”

“हो. वॉटसन, मी ते करू शकतो. त्याचीच त्यांना काळजी पडली आहे.”

“पण मग तू ते करत का नाहीस?

“कारण हिरा कुठे आहे, हे मला माहिती नाही.”

“बिली मला बोलला, मुकुटातील हरवलेल्या हिऱ्याबद्दल.”

“हो. मोठा, पिवळा मॅझनीन हिरा. मी जाळे टाकले आहे व मासा गळाला लागला आहे. पण मला हिरा मिळालेला नाही. त्या गुन्हेगाराला पकडून काय फायदा आहे? त्याना गजाआड करून आपण जग अधिक सुंदर करू शकू. पण ते माझे उद्दिष्ट नाही. मला हिरा मिळायला हवा आहे.”

“काऊंट सिलाव्हियस, हा तुझा गळाला लागलेला मासा आहे का?”

“हो. पण तो शार्क आहे. तो चावतो. दुसरा, सॅम मर्टन टॉन बॉक्सर जातीचा मासा आहे. तो तितका वाईट नाही. पण काऊंटने त्याला वापरले आहे. सॅम शार्क नाही. तो मूर्ख, आडदांड आणि रेम्याडोक्या आहे. तोही माझ्या जाळ्यात अडकलेला आहे.”

“हा काऊंट निग्रेटो सिलव्हियस आहे कुठे?”

“मी आज पूर्ण सकाळभर, त्याच्या अगदी जवळ होतो. तू मला एका म्हाताऱ्या बाईच्या वेषात, पाहिले असशील. वॉटसन, मी ते सोंग अगदी बेमालूम वठवले. त्याने एकदा माझ्याकरता, माझी छत्री देखील उचलली. तो अर्धवट इटालियन भाषेत व दक्षिणेकडील हेलात बोलला, ‘मॅडम तुम्हाला सलाम.’ वॉटसन, आयुष्य हे विचित्र घटनांनी भरलेले आहे.”

“पण त्याचा दुख्खांत शेवट होऊ शकला असता.”

“शक्य आहे. मी स्ट्रॅबेंझीच्या कारखान्यापर्यंत त्याचा पाठलाग केला. स्ट्रॅबेंझी एअरगन बनवतात. पलिकडील खिडकीत ठेवलेली, एका माणसाच्या

पुतळ्यासारखी प्रतिमा, तू पाहिलीस का? बिलीने तो 'माणूस' तुला दाखवला असेल . त्याच्या सुंदर डोक्यात कधीही गोळी बसू शकते. ओहो, बिली काय झाले?"

एका ट्रेमध्ये कार्ड घेऊन, बिली परत खोलीत येत होता. होम्सने त्याच्याकडे भुवया उंचावून कार्ड पाहिले व मनोरंजन झाल्यासारखा हसला.

"तो मनुष्य स्वतःच! मला हे अनपेक्षित होते. वॉटसन, लक्ष दे. तो पिळदार स्नायूंचा मनुष्य आहे. नेमबाज म्हणून त्याचे नाव तू कदाचित ऐकले असशील. त्याने जर त्याच्या प्रतिस्पर्ध्यांच्या यादीत माझे नाव घातले, तर ते त्याच्या नेमबाजीच्या प्रदीर्घ भव्य कारकिर्दीत, आणखी एक लक्ष्यवेध ठरेल. मी त्याच्यावर हल्ला करायला टपून बसल्याचे, त्याला कळले असल्याचे, यामुळे सिध्द होत आहे."

"पोलिसाना बोलाव."

"बहुतेक मी ते करीन पण इतक्यात नाही. वॉटसन, तू खिडकीबाहेर जरा चौकस नजर टाकतोस का? रस्त्यात कोणी रेंगाळते आहे का ते बघ."

वॉटसनने पडद्याच्या कडांमधून काळजीपूर्वक पाहिले. "हो. दाराजवळ एक दांडगट इसम आहे."

"तो सॅम मर्टन असणार. विश्वासू पण मूर्ख सॅम. हा बिली कुठे गेला?"

"तो वाट बघत थांबायच्या खोलीत आहे."

"मी घंटी वाजवल्यावर त्याला पाठव."

"हो सर."

दार लावले जाईपर्यंत वॉटसन थांबला व मग तो तत्परपणे त्याच्या सहकाऱ्याकडे वळला.

“इकडे बघ होम्स, हा गुन्हेगार माणूस आहे. तो काहीही करू शकतो. तो तुझा खून करायला सुद्धा आलेला असू शकतो.”

“मला काही नवल वाटणार नाही.”

“मी तुझ्याबरोबर राहतो.”

“तू भयानक रीत्या संकटात सापडशील.”

“त्याच्या तडाख्यात?”

“नाही रे माझ्या प्रिय मित्रा, माझ्या तडाख्यात.”

“असो. तरीही मी तुला सोडू शकत नाही.”

“वॉटसन, तू जा. कारण आजपर्यंत माझ्या खेळीतील भूमिका, तू योग्य प्रकारे निभावली आहेस. मला वाटते ती तू शेवटपर्यंत निभावशील. तो मनुष्य काहीतरी हेतू मनात ठेऊन आला आहे. पण तो माझे सावज असू शकतो.”

होम्सने त्याची वही काढून काहीतरी लिहिले. ‘स्कॉटलंड यार्डसाठी टॅक्सी कर व मुख्य सीआयडीला हे दे. पोलिसाना घेऊन परत ये. ते त्या माणसाला अटक करतील.”

“मी ते आनंदाने करतो.”

“तू येण्यापूर्वी हिरा कुठे आहे हे शोधण्यासाठी, मला अगदी थोडाच वेळ मिळेल.” त्याने घंटीला हात लावला. “मला वाटतं आपण झोपायच्या खोलीतून जाऊ. हा बाहेर पडायचा दुसरा मार्ग चांगलाच उपयोगी आहे. मला माझा शार्क बघायचा आहे, पण त्याने मला बघता कामा नये आणि तुम्हाला माहिती आहे की असे करायचे मार्ग माझ्याकडे आहेत.”

एका मिनिटाने काऊंट सिलव्हियसला मार्ग दाखवत, बिली आत शिरला. ती खोली रिकामी होती. तो प्रसिध्द, चतुरस्त्र खेळाडू आत आला. त्याच्याबरोबर तो धिप्पाड, गावरान, मोठ्या मिशा असलेला, फेंगाडे नाक असलेला, पातळ ओठांचा व दुष्ट चेहऱ्याचा माणूस, सॅमही होता. सॅमला जरा बाहेर बसवून, काऊंट व बिली असे दोघेजण आत शिरले. काऊंटने उत्तम कपडे घातले होते. मानेभोवती छान टाय, चकाकणारी पिन व चकाकणाऱ्या रिंगा त्याच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास दाखवत होते. बिलीने बाहेर जाताना त्याच्यामागे दार लावल्यावर, काऊंटने रागीट डोळयांनी भोवताली पाहिले. जसे काही प्रत्येक वळणावर त्याच्यासाठी सापळेच लाऊन ठेवले आहेत. खिडकीजवळील हाताच्या खुर्चीत, त्याने गाऊनच्या कॉलरवर एक भावनाशून्य डोके पाहिले, तेंव्हा प्रथम त्याच्या चेहऱ्यावर मनोरंजन झाल्याचे भाव होते पण नंतर त्याने आक्रमक पवित्रा घेतला. त्याच्या काळया, खून उतरलेल्या डोळयात, भयानक आशेचा प्रकाश तरळला. त्याने परत सभोवताली पाहून, कुणी पाहत नसल्याची खात्री केली. मग हळूच पाय न वाजवता, त्याची काठी अर्धवट उगारून, तो त्या शांत आकृतीकडे निघाला. तो आता निर्णायक उडी मारून घाव घालणार, इतक्यात एका शांत, फसव्या आवाजाने झोपायच्या खोलीच्या दारातून, त्याचे स्वागत केले.

“ते मोडू नकोस, काऊंट ते मोडू नकोस.”

मारेकरी मागे वळला. त्याच्या आक्रसलेल्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव उमटले. झटक्यात त्याने त्याची अर्धवट उगारलेली काठी पूर्णपणे उगारली व त्या नकली माणसापासून खऱ्या माणसाकडे, त्याची हिंसक मुद्रा वळवली. त्या स्थिर करड्या डोळयांमध्ये, खट्याळ हसू होते. त्यामुळे त्याचा हात बाजूला घेतला गेला.

त्या पुतळयाजवळ जात होम्स म्हणाला, “ही छोटीशी, छान वस्तू आहे. फ्रेंच मूर्तिकार टॅव्हेनिअर याने ती बनवली आहे. तुझा मित्र स्ट्रॅबेंझी हवाई पिस्तुल बनवण्यात जितका हुशार आहे, तितकाच हा मेणाचे पुतळे बनवण्यात हुशार आहे.”

“काय म्हणता आहात सर, हवाई पिस्तुल?”

“तुझी टोपी व काठी बाजूच्या टेबलावर ठेव. आभारी आहे. खाली बस. तू तुझे पिस्तुल काढून बाजूला ठेवण्याचे कष्ट घेशील का? ओहो, जर त्यावर तुला बसायचे असेल तर छान. छान. तुझी ही भेट फारच उत्तम आहे. कारण मला तुझ्याबरोबर काही मिनिटे गप्पा मारायच्या आहेत.”

काऊंटने त्याच्या धमकीवजा भुवया ताणून, जडपणे बघितले. “होम्स, मलाही तुझ्याशी थोडे बोलायचे आहे. म्हणूनच मी इथे आता आलो होतो, हे मी नाकबूल करत नाही”

टेबलाच्या कडेला बसलेल्या होम्सने त्याचे पाय हलवले.

“तुझ्या डोक्यात काहीतरी वेगळीच कल्पना असल्याचे माझ्या लक्षात आले. माझ्याकडे तुझे इतके खासगीपणे लक्ष का?”

“कारण तू मला त्रास देण्यासाठी काहीतरी वेगळीच पद्धत अवलंबलीस. तू तुझे हस्तक, माझ्यावर पाळत ठेवण्यासाठी नेमलेस.”

“माझे हस्तक? मी तुला सांगतो असे काही नाही.”

“हलकट! मी त्यांचा पाठलाग केला, होम्स.”

“काऊंट सिलव्हियस, हा लहानसा मुद्दा आहे. पण माझ्याशी बोलताना माझ्या नावामागे रीत म्हणून तरी तू मिस्टर लावायला हवे होतेस. जेव्हा तू माझ्याशी बोलत होतास, तेव्हा तुला कळले असते, की माझे नेहमीचे काम म्हणून मी चोरांच्या

फलटणीतल्या अर्ध्यांचा तरी पाठलाग करत असतो. पण तुला हे पटेल की कधी कधी एखाद्या बाबतीत ते अन्यायकारक ठरू शकते.'

"ठीक आहे तर मग मिस्टर होम्स."

"छान. पण मी तुला खात्री देतो की माझ्या तथाकथित सहकाऱ्यांबद्दल तुझा गैरसमज झाला आहे."

काऊंट सिलव्हियस छद्मीपणे हसला.

"तुझ्यासारखे इतर लोकांनाही निरीक्षण करता येऊ शकते. काल एक वयस्क उत्साही मनुष्य होता. आज एक वयस्क बाई होती. ते दिवसभर माझ्या मागावर होते.'

"खरच सर, तुम्ही मला धन्यवाद देत आहात. म्हातारा बॅरान डोसन फाशी देण्यापूर्वीच्या आधीच्या रात्री मला म्हणाला, 'कायद्याने माझ्यावर जे आरोप लावले गेले ते ठीक होते, पण मी घेतलेली सोंगे मात्र तू ओळखून माझे कसब वाया घालवलेस' आणि आता काऊंट तू, मी वठवलेल्या सोंगांची स्तुती करतो आहेस."

"तो तू --- तू स्वतः होतास?"

होम्सने खांदे उडवले. मिनोरीजमध्ये तू माझ्या हातात दिलेली, त्या कोपऱ्यात पडलेली छत्री, तू बघू शकतोस. त्यानंतर तुला संशय येऊ लागला."

"जर मला माहिती असते तर — तुला कधीच — "

"तर मग, हे चांगले घर तू कधीच पाहिले नसतेस, हे मला नक्की माहिती होते. आपण सगळयांनी एकमेकांबद्दल नापसंती दर्शवण्याच्या, संधीकडे दुर्लक्ष केले. जसे झाले तसे तुला माहिती नाही, म्हणून आपण इथे आहोत."

काऊंटच्या धमकीवजा डोळयांपेक्षा त्याच्या आक्रसलेल्या भुवया जास्तच आक्रसल्या.

“तू जे म्हणतो आहेस, त्याने गोष्ट आणखी चिघळणार आहे. ते तुझे सहकारी नव्हते. ती तूच घेतलेली सोंगे होती, तू स्वतःच होतास. तू मुद्दाम असे केलेस. का?”

“चल काऊंट, तू अल्जेरियामध्ये सिंहांची शिकार करत होतास.”

“बरं मग?”

“पण का?”

“का? तो खेळ होता. --- धोका होता, साहस होते.”

“आणि निःसशय उपद्रवी गोष्टींपासून देशाला वाचवायला.”

“बरोबर.”

“पण माझे अंदाज, मी सध्या माझ्याजवळच ठेवतो.”

काऊंटने त्याचे पाय उंचावून उडी मारली आणि त्याचा हात आपोआप पॅन्टच्या मागच्या खिशात गेला.

“खाली बसा महाशय, खाली बसा. यापेक्षा अधिक व्यवहारी कारण आहे. मला तो पिवळा हिरा हवा आहे.”

काऊंट सिलव्हियस दुष्ट्पणाने हसत त्याच्या खुर्चीवर बसला.

“तुला माहिती आहे की मी त्यासाठी, तुझ्या मागे होतो. आज रात्री तू इथे आहेस, कारण मला याबाबत कितपत माहिती आहे हे आजमावण्यासाठी, आणि माझी येथून उचलबांगडी करणे कितपत महत्वाचे आहे हे ठरवण्यासाठी! तुझ्या दृष्टीकोनातून मला असे म्हणावे लागेल, की ते अत्यंत महत्वाचे आहे, कारण मला या

प्रकरणाबद्दल पूर्ण माहिती आहे, फक्त एक गोष्ट सोडून, जी तू मला आता सांगणार आहेस."

"ओहो, खरं का? आणि ती कुठली गोष्ट आहे?"

"मुकुटातील हिरा आत्ता कुठे आहे?"

काऊंटने तीक्ष्णपणे, त्याच्याकडे पाहिले. "तुला ते जाणून घ्यायचे आहे का? पण मी ते तुला का म्हणून सांगेन?"

"तू सांगू शकतोस व तू सांगशील."

'खरच?"

"काऊंट सिलव्हियस, तू मला थापा मारू शकत नाहीस." होम्सचे डोळे त्याच्याकडे टक लाऊन बघताना बारीक झाले व धोक्याची सूचना देत, स्टीलसारखे चमकू लागले. "तू जणू एखादी काच आहेस व मला तुझे मन पूर्णपणे दिसते आहे."

"मग हिरा कुठे आहे, हे देखील तुला दिसेल."

होम्सने मजेने टाळया वाजवल्या. मग शब्दात पकडल्याच्या थाटात तो म्हणाला, "म्हणजे तुला ते माहिती आहे. तू ते कबूल केले आहेस."

"मी काहीही कबूल केलेले नाही.

"हे बघ काऊंट, तू शहाणा असशील तर मी सांगतो ते ऐकायला तयार हो. नाहीतर मग तुरुंगात जायची तयारी ठेव."

काऊंट सिलव्हियसने त्याचे डोळे छताकडे वळवले. "तू खोटे बोलतो आहेस."

एखाद्या बुद्धिबळपटूने त्याची जिंकण्यापूर्वीची खेळी खेळताना जसा विचार करावा, तशा तऱ्हेने होम्सने त्याचाकडे पाहिले. मग त्याने टेबलाचा खण उघडून, लहानशी वही काढली.

“मी या वहीत कायकाय लिहिले आहे, माहिती आहे?”

“नाही सर, मला माहिती नाही.”

“तुला लिहिले आहे.“

“मला?”

‘हो तुला. तू इथे आहेस व तुझे प्रत्येक वाईट कृत्य व धोकादायक आयुष्य, या वहीत लिहिलेले आहे.”

अंगार भरलेले डोळे घेऊन काऊंट ओरडला, “छे छे होम्स, माझ्या सहनशीलतेला मर्यादा आहेत.”

“काऊंट, ती प्रत्येक गोष्ट इथे आहे. तुला ज्या मिसेस हॅरॉल्डने ब्लायमर इस्टेट दिली व जी तू चुटकीसरशी जुगारात हरवून बसलास, त्या मिसेस हॅरॉल्डच्या मृत्युबद्दलच्या सत्यकथा.”

“तू स्वप्ने बघतो आहेस.”

“आणि मिनी वॅरेंडरचा, पूर्ण जीवनेतिहास.”

“गेलास उडत. त्यातून तुला काहीच मिळणार नाही.”

“काऊंट, अजूनही पुष्कळ आहे. १३ फेब्रुवारी १८९२ मध्ये रीव्हेराला जाणाऱ्या डिलक्स गाडीत केलेली चोरी, त्याच वर्षी क्रेडीट ल्योनिअस बँकेचा दिलेला, खोटा चेक.”

“नाही तू चुकतो आहेस.”

“म्हणजे इतर सर्व आरोप खरे आहेत. आता असे बघ, काऊंट तू उत्तम पत्ते खेळणारा आहेस. पण जेव्हा दुसऱ्याच्या हातात सर्व हुकमाची पाने असतात, तेव्हा तुझा उतारी करायचा वेळ वाचतो.”

“तू म्हणत होतास त्या हिऱ्याचा या सर्वाशी काय संबंध आहे?”

“हळू, काऊंट, तुझे अधीर मन शांत ठेव. मला माझ्या संथ पद्धतीने सर्व उलगडू दे. हे सर्व तुझ्याविरूद्धचे पुरावे माझ्याकडे आहेत. सर्वात वरताण म्हणजे, मुकुट हिराचोरी संबंधी माझ्याकडे तू व तुझा मित्र, दोघांविरुद्ध भक्कम पुरावे आहेत.”

“खरच?”

“तुला व्हाईटहॉलकडे नेणारा टॅक्सीचालक व परत आणणारा टॅक्सीचालक मला ठाऊक आहे. तुला तिथे पाहणाऱ्या एलकेने मला कळवले आहे. तुझा खेळ आता खलास झाला आहे.”

काऊंटच्या कपाळावरील शिरा तट्ट फुगल्या. त्याच्या काळया हाताच्या मुठी रागाने आवळल्या गेल्या. त्याने बोलायचा प्रयत्न केला पण त्याच्या तोंडून शब्द फुटेनात.

होम्स म्हणाला, अशी माझी खेळी आहे. मी माझे सर्व पत्ते टेबलावर मांडले आहेत. पण एक पत्ता त्यात नाही. तो म्हणजे हिऱ्यांचा राजा. तो कुठे आहे ते मला माहिती नाही.”

“तुला कधीच माहिती होणारही नाही.”

“नाही? काऊंट, आता तरी शहाण्यासारखे वाग. परिस्थिती नीट लक्षात घे. तुला वीस वर्षांचा तुरुंगवास होईल. सॅम मर्टनचेही तसेच. तुला त्या हिऱ्याने काय

लाभ होणार आहे? काहीच नाही. पण तू जर तो परत केलास, — तर खरे तर, मी गुन्हा दाखल करायचे टाळीन. मला तू किंवा सॅम नको आहात. आम्हाला हिरा हवा आहे. तो देऊन टाक व माझ्या मते, तू भविष्यात काही गैर धंदे करत नाहीस, तोपर्यंत तू मोकळा असशील. — पकडला जाणार नाहीस. पण तू आताही काही चलाखी केलीस, तर ती शेवटचीच ठरेल. आत्ताचे माझे काम हिरा मिळवण्याचे आहे, तुला कैद करायचे नाही."

'पण मी नकार दिला तर?"

"का देशील? मग तुझ्या दुर्दैवाने, माझे काम तुला पकडणे हे राहील. हिरा मिळवणे नव्हे."

घंटीचा आवाज ऐकून बिली आत आला.

"काऊंट, मला वाटते इथे तुझा मित्र सॅमही हजर असलेला बरा. शेवटी त्याचे म्हणणे काय आहे, हे देखील पहायला हवे. बिली, तुला एक कुरूप व आडदांड इसम दाराबाहेर दिसेल, त्याला आत यायला सांग."

"सर, त्याने नकार दिला तर?"

"काही मारामारी वगैरे करू नको. त्याच्याशी सभ्यपणे वाग. जर तू त्याला सांगितलेस की काऊंट सिलव्हियसने त्याला बोलावले आहे तर तो नक्की येईल."

बिली गेल्यावर काऊंटने विचारले, "आता तू काय करणार आहेस?

"माझा मित्र वॉटसन माझ्याबरोबर होता. मी त्याला सांगितले की एक शार्क व एक मूर्ख माझ्या गळाला लागले आहेत. आता मी माझे जाळे खुले केले की लगेच पोलीस येतील."

काऊंट त्याच्या खुर्चीतून उठला. त्याचा हात त्याच्या पाठीमागे होता. होम्सने त्याचा गाऊनच्या खिशामधून अर्धवट बाहेर डोकावणारे काहीतरी काढून हातात धरले.

“तू तुझ्या अंथरुणावर मरणार नाही आहेस, होम्स.”

“माझीही तशीच कल्पना आहे. त्यामुळे काय फरक पडतो? काऊंट, तू इथून गेलास की बहुधा फासावरच लटकायची शक्यता जास्त वाटते आहे. हा भविष्यातील होरा चांगला नाही. पण आपण आत्ता आनंद का साजरा करू नये?”

निर्ढावलेल्या गुन्हेगाराचे धोकादायक डोळे असलेला एक रानटी पशू, अचानक हलकीशी उडी मारून अंधारातून येऊ लागला.

“माझ्या मित्रा, पिस्तुलाचा नेम धरून काही उपयोग नाही.” होम्स शांत आवाजात बोलला. “तुला चांगलेच माहिती आहे की मी तुला ते पिस्तुल काढायला वेळ दिला तरी तू ते वापरायचे धाडस करू शकत नाहीस. ती भीतीदायक आवाज करणारी गोष्ट वापरण्यापेक्षा ते हवाई पिस्तूल बरे. आहा, मला वाटतं तुझ्या प्रिय मित्राचा पायरव मी ऐकला. नमस्कार मिस्टर मर्टन.”

मारामारीपटू, दणकट, मूर्ख मनुष्य दारात चमत्कारीकपणे उभा राहिला. त्याचा उभट चेहरा हट्टी दिसत होता. तो होम्सकडे प्रश्नार्थक नजरेने बघत होता. होम्सची सुसंस्कृत पद्धत, त्याचासाठी नवीन अनुभव होता. आणि जरी ती त्याला पुसटपणे शत्रुत्वाची वाटत असली, तरी त्याला कळत नव्हते की होम्सशी कसे वागावे. तो मदतीसाठी त्याच्या हुशार मित्राकडे वळला.

काऊंटने त्याचे खांदे उडवले व होम्सने उत्तर दिले.

“मिस्टर मर्टन, जरी मी आता काही गोष्टी उघड केल्या नाहीत, तरी त्या आज ना उद्या बाहेर येणारच आहेत.”

त्या बॉक्सरने अजूनही त्याच्या सहकाऱ्याकडे बघणे, चालू ठेवले.

“हा फालतू विनोद करायचा प्रयत्न करतो आहे का? मी आत्ता त्या मनस्थितीत नाही.”

“नाही तशी माझी अपेक्षा नाही.” होम्स बोलला. “मला वाटतं मी तुला नक्की सांगू शकतो की जसजशी संध्याकाळ होत जाईल, तसतसे तुला कमी विनोदी वाटत जाईल. आता इकडे बघ, काऊंट सिलव्हियस, मी कामात व्यग्र असणारा माणूस आहे आणि मी वेळ फुकट घालवू शकत नाही. मी त्या झोपायच्या खोलीत जातो आहे. मी नसलो तरी तुम्ही घरच्यासारखेच मोकळेपणाने रहा. माझा अडथळा गेल्यामुळे तू तुझ्या मित्राला काय काय कुठपर्यंत येऊन ठेपले आहे, हे स्पष्ट करू शकशील. मी माझ्या व्हायोलीनवर एक हॉफमनची धून वाजवायचा प्रयत्न करतो व पाच मिनिटात, तुझे अंतिम उत्तर ऐकण्यासाठी परत येतो. तुला काय पर्याय आहेत याचा चांगला अंदाज आला असेल, नाही का? तुम्हाला अटक करून घ्यायची आहे की हिरा द्यायचा आहे?

होम्स त्याचे व्हायोलीन घेऊन गेला. थोड्या वेळाने त्या बंद खोलीच्या दारातून त्या धूनमधील रेंगाळणारे स्वर ऐकू येऊ लागले.

त्याचा मित्र त्याच्याकडे वळल्याबरोबर, मर्टनने अधीरतेने विचारले, “मग काय ठरले? त्याला हिऱ्याबद्दल माहिती आहे का?”

“त्याला नक्कीच माहिती आहे. त्याला हिऱ्याबद्दल काहीच माहिती नाही, यावर माझा विश्वास नाही.“

“अरे देवा!” बॉक्सरचा फिकट चेहरा अजून पांढरा फटक पडला. “एलके सँडर्सने आपल्याला धोका दिला आहे”.

“त्याने असे का केले? का?”

“बरं. पण आता आपल्याला काय करायचे ते ठरवायला हवे.”

झोपायच्या खोलीच्या दाराकडे संशयाने बघत बॉक्सर म्हणाला, “एक मिनिट थांब. तो निरीक्षण करणारा सावध माणूस आहे. पण मला वाटतं तो ऐकत नसावा.”

“त्या व्हायोलीनच्या आवाजापुढे त्याला काय ऐकू जाणार आहे?”

“ते बरोबर आहे. पण पडद्यामागे कुणीतरी आहे. या खोलीत फारच पडदे आहेत.” आजूबाजूला बघत तो बोलला. त्याला खिडकीत पहिल्यांदाच एक पुतळा दिसला. तो पुतळा निरखून बघत राहिला. काही बोलायला तो फारच आश्चर्यचकित झाला होता. ,

काऊंट म्हणाला, “अरे, हा खोटा आहे.”

“खोटा आहे? पण मला धक्का बसला. मॅडम तुसॉचा वाटतो आहे. गाऊन आणि कायकाय! सगळा त्याचा मूर्खपणा आहे. पण मग पडदे, काऊंट!”

“ओहो, पडदे बघायचे सोड. आपण आपला वेळ फुकट घालवत आहोत त्या पडद्यांमध्ये विशेष काही नाही. तो हिऱ्याच्या बाबतीत आपल्याला मागे टाकू शकेल.”

“तो हिऱ्याचा माग काढू शकेल?”

“पण हिरा कुठे आहे हे आपण सांगितले तर, तो आपल्याला पळून जाऊ देईल.”

“काय? एक लाखाचा हिरा सोडून द्यायचा?”

“एक तर हे तरी, नाहीतर ते तरी.”

सॅम मर्टनने त्याचे डोक्यावरील छोटे केलेले केस खाजवले, “तो तिथे एकटाच आहे.”

काऊंटने मान हलवली. “तो सशस्त्र आहे. त्याला गोळी मारली तरी या अशा जागेतून बाहेर पडणे कठीण आहे. शिवाय त्याच्याजवळ पुरावे आहेत, ते पोलिसाना पण माहिती असायची शक्यता आहे. हॅलो, ते काय आहे?”

खिडकीतून काहीतरी खोटा आवाज ऐकल्याचा भास झाला. दोघे गरकन वळले. पण सर्व काही शांत होते. खोली तर नक्की रिकामी होती. पण खुर्चीत एक विचित्र आकृती कशी काय बसलेली दिसत होती?

मरटॉन म्हणाला, ”रस्त्यात काहीतरी — इथे बघ बॉस, तुझे डोके चांगले चालते. आपण नक्कीच इथून निसटू शकू. जर निसटणे शक्य नसले, तर मग आता तू काय ते ठरव.”

“मी याच्यापेक्षा हुशार लोकांना फसवले आहे. हिरा माझ्या गुप्त खिशात आहे. तो मला काही झाले तरी द्यायचा नाही. आज तो इंग्लंडमधून बाहेर जाईल व रविवारपूर्वी ॲमस्टरडॅममध्ये, त्याचे चार तुकडे होतील. त्याला व्हॅन सेंडरबद्दल काही माहिती नाही.”

“मला वाटतं व्हॅन सेंडर पुढील आठवड्यात जातो आहे.’

“जाणार होता, पण आता त्याला पुढील बोटीने जावे लागेल. आपल्यापैकी कुणीतरी हिरा घेऊन लाईम रस्त्याला जाऊन त्याला सांगायला हवे.”

“पण ते खोटारडे तयार नसतील.”

“आता आपण ठरवले, ते त्याला ऐकावेच लागेल, दुसरे काही नाही. आता एक क्षणही दवडता कामा नये.”

धोक्याची जाणीव होणे, ही त्या खेळाडूची नैसर्गिक सवय बनली होती. तो थांबला व खिडकीकडे निरखून पाहिले. हो. नक्कीच रस्त्यावरून तो हळू आवाज आला होता. त्याने पुढे चालू ठेवले, ”आपण होम्सला सहज उल्लू बनवू शकतो. असं बघ, तो

मूर्ख शिरोमणी, त्याला हिरा दिला तर आपल्याला पकडणार नाही. ठीक आहे. मग आपण त्याला हिरा देत असल्याचे सांगू. आपण त्यासाठी त्याला भलत्याच ठिकाणी पाठवू. आणि तो चुकीच्या मार्गावर आला आहे, हे त्याला कळण्यापूर्वी तो हिरा हॉलंडला पोचेल आणि आपण देशाबाहेर."

सॅम मर्टन तोंड भरून हसत म्हणाला, 'हे ठीक वाटते आहे."

"तू जाऊन त्या डच माणसाला, बिलीला, घाई करायला सांग. मी त्या भोळया बावळटाला, खोटे खोटे शरण आल्यासारखे भासवतो. मी त्याला सांगतो की हिरा लिव्हरपूलमध्ये आहे. आणि ती पिरपिर, तो व्हायोलीनचा आवाज थांबव. तो माझ्या अंगावर येतो आहे. जेव्हा त्याला कळेल की हिरा लिव्हरपूलमध्ये नाही, तेव्हा तो तिथे अडकेल व आपण समुद्राच्या निळया पाण्यात असू. दाराच्या भोकातून दिसणार नाही, अशा तऱ्हेने इकडे ये. हा बघ हिरा."

"बापरे! तो तू स्वतःबरोबर बाळगतोस हे नवल आहे."

"मग मी तो कुठे सुरक्षित ठेवणार? जर आपण तो व्हाईटहॉलमध्ये ठेवला असता तर कोणीतरी नक्कीच माझ्या सामानातून चोरला असता."

"आपण त्याच्याकडे एक दृष्टीक्षेप टाकू."

काऊंटने त्याच्या मित्राकडे आनंदाने एक कटाक्ष टाकला, पण त्याचा न धुतलेला हात पुढे आलेला बघून, त्याने त्याच्याकडे दुर्लक्ष केले.

"तुला काय वाटलं --- मी तो तुझ्याकडून हिसकावून घेईन? हे बघ, मला तुझ्या असल्या वागण्याचा, कंटाळा आला आहे."

“ठीक आहे, सॅम, आपल्याला भांडण परवडणार नाही. जर तुला सोंग घेण्यासाठी नटायचे सामान बघायचे असेल तर, खिडकीजवळ ये.”

“आता तो हिरा उजेडात धर. हं अस्सा.”

“आभारी आहे.”

एक उडी मारून, होम्स त्या बोगस खुर्चीतून उठला व तो अमूल्य हिरा हस्तगत केला. त्याने तो एका हातात धरला व दुसऱ्या हाताने पिस्तुल काढून काऊंटच्या डोक्यावर नेम धरला. ते दोन खलनायक बेसावधपणे, अत्यंत नवल वाटून मागे सरकले. ते भानावर येण्यापूर्वी, होम्सने घंटी वाजवली.

“मारामारी नको. सभ्य गृहस्थहो, झटापट नको. मी तुम्हाला विनंती करतो, निदान फर्निचरचा तरी विचार करा. तुम्हाला हे कळले असेल, की तुम्ही इथून हलू शकत नाही. खाली पोलीस थांबले आहेत.”

काऊंटच्या राग व भीतीवर, गोंधळलेल्या भावनेने मात केली. तो आश्चर्याने तोंड वासून बोलला, “तुला कसे कळले?”

“तुला आश्चर्य वाटणे साहजिक आहे. माझ्या झोपायच्या खोलीपासून निघणारे दुसरे दार, पडद्यामागे येऊन पोचते. मी असा तर्क केला, की मी पुतळा हलवला तेव्हा तुम्ही तो आवाज ऐकला. पण माझे नशीब जोरावर होते, त्यामुळे तुमचे स्फोटक संभाषण मला ऐकायला मिळाले. मी ऐकतो आहे हे तुम्हाला कळले असते तर, तुम्ही नक्कीच ते थांबवले असते.

काऊंटने माघार घेतल्याचे हावभाव केले.

“होम्स, तुझी कमाल आहे तू खराखुरा राक्षसच आहेस.”

“त्याच्यापासून फार वेगळा नाही.” होम्स नम्रपणे हसत उद्गारला.

सॅम मर्टनच्या मंद बुद्धीने, हळूहळू परिस्थितीचा अंदाज घेतला. आता जिन्यात जोरात पायरव ऐकू येऊ लागला, तेव्हा त्याने शांतपणा सोडला.

तो बोलला, “पोलीस आले. पण मी काय म्हणतो, मला अजून ते व्हायोलीन वाजत असल्याचा आवाज येतो आहे.”

होम्स म्हणाला, “तो आवाज होय? तुझे बरोबर आहे. ते चालूच आहे. नवीन ग्रामोफोन, हा खास शोध आहे.”

एकदम बरेच पोलीस आत घुसले. हातकड्या घालून गुन्हेगारांना खाली थांबलेल्या गाडीत नेण्यात आले.  वॉटसन होम्सबरोबर रेंगाळला. एक नवीन मानाचा तुरा होम्सच्या टोपीत खोवला गेल्याबद्दल, वॉटसनने त्याचे अभिनंदन केले. तेवढ्यात, हातात कार्ड असलेला ट्रे घेऊन बिली आल्यामुळे, त्यांच्या संभाषणात व्यत्यय आला.

“उमराव कॅन्टलमिअर आले आहेत, सर.”

“बिली, त्याना आत घेऊन ये.”

“हा माझ्याबरोबर काम करणारा मुलगा, कामात चांगला रस घेतो आहे.” होम्स बोलला.”

एका बारीक, कडक शिस्तीचा वाटणाऱ्या माणसासाठी दार उघडले गेले. त्याचा चेहरा चिंचोळा होता. खाली वळलेल्या, काळया, व्हिक्टोरियन काळातल्या चकाकणाऱ्या मिशा त्याच्या गोल खांद्यांना व कृश शरीराला शोभत नव्हत्या. होम्सने पुढे होऊन मित्रत्वाने हस्तांदोलन केले पण फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

“उमराव कॅन्टलमिअर, कसे काय? वर्षातील या काळात हवा थंड असते पण आत थोडे गरम आहे. मी तुमचा मोठा कोट उतरवायला मदत करू का?”

“नको. आभारी आहे. मी तो काढत नाही.

होम्सने जोराने त्याचा हात शर्टावर दाबला.

“माझा मित्र वॉटसन, तुम्हाला आश्वासन देईल की हा हवाबदल फसवा असतो.”

त्या उमरावाने अधीरतेने स्वतःला मोकळे केले व बोलला, “मी अगदी आरामात आहे, सर. मी इथे थांबत नाही. मी फक्त तुम्ही स्वतःहून अंगावर घेतलेल्या कामात किती प्रगती केली आहे, हे बघायला आलो होतो.”

“ते कठिण आहे. — फारच कठिण.”

“तुम्हाला ते तसे वाटेल, अशी भीति मला वाटतच होती.” त्या वयस्क माणसाच्या ओठांवर फसवे स्मित होते “प्रत्येक माणसाच्या मर्यादा असतात मिस्टर होम्स, पण आत्मसमाधानाच्या खुजेपणापासून त्या आपल्याला वाचवतात.”

“हो सर, मी मोठ्या कोड्यात पडलो आहे.”

“निःसंशय.”

“विशेषतः एका बाबतीत, बहुधा तुम्ही मला मदत करू शकाल.’

“दिवसभरात तुम्ही ते करायला बहुधा फार उशीर केलात. मला वाटले तुमच्याकडे तुमच्या परिपूर्ण पद्धती आहेत. तरीही अजून मी मदत करायला तयार आहे.”

“उमराव कॅन्टलमिअर, असे बघा. आपण खऱ्या चोरांविरुद्ध्ध नक्कीच केस करू शकतो.”

“जर तुम्ही त्याना पकडलेत, तर.”

"बरोबर. पण प्रश्न असा आहे की — आपण त्यासाठी कशी हालचाल करायची?"

"हे जरा अति लवकर होत नाही का?"

"हे जवळजवळ आपले बेत तयार असल्यासारखे आहे. पण त्यांच्याविरुध्ध, तुम्ही कुठला भक्कम पुरावा धरणार?"

"प्रत्यक्ष हिरा त्यांच्याजवळ असणे."

"तुम्ही त्या जोरावर त्याला पकडू शकाल?"

"अगदी संशयातीतपणे"

होम्स क्वचितच हसे पण आत्ता तो बऱ्याच काळाने, हसण्याच्या अगदी जवळ आलेला, त्याचा जुना मित्र वॉटसन याला वाटले.

"तसे असेल तर प्रिय सर, मग मी दुखाःने तुम्हाला अटक करायची गरज आहे, असे सांगेन.'

उमराव कॅन्टलमिअर खूप रागावले. त्यांचे फिके गाल एखाद्या जुन्यापुराण्या वणव्यासारखे तेजाळून उठले.

"मिस्टर होम्स, तुम्ही फारच स्वातंत्र्य घेता. गेल्या पन्नास वर्षांच्या माझ्या व्यावसायिक आयुष्यात, मला अशी केस आठवत नाही. मी महत्वाची कामे करण्यात गर्क असलेला व्यग्र माणूस आहे. माझ्याकडे मूर्ख विनोदांसाठी वेळ नाही व मला त्याची आवडही नाही. सर, मी तुम्हाला मोकळेपणे सांगू शकतो, की तुमच्या सामर्थ्यावर माझा कधीच विश्वास नव्हता. ही बाब पोलिसांकडे सोपवली गेली

असती, तर ते जास्त सुरक्षित ठरले असते. असे माझे कायम मत होते. तुमचे वर्तन बघता, माझा होरा खरा ठरला आहे. तेव्हा आता मी तुमची रजा घेतो.”

होम्सने त्याची जागा बदलली आणि तो त्यांच्या व दाराच्या मध्ये जाऊन उभा राहून म्हणाला, “एक मिनिट सर, तो हिरा तात्पुरता ताब्यात असण्यापेक्षा, तो कायमचा खराखुरा घेऊन जाणे हा जास्त गंभीर गुन्हा ठरेल.”

“सर, हे अगदी असहनीय आहे. मला जाउदे.”

“तुमच्या लांब कोटाच्या उजव्या खिशात हात घाला.”

“सर, याचा अर्थ काय?”

“इकडे या. मी काय सांगितले ते करा.”

एका झटक्यात होम्सच्या समोर आश्चर्यचकित झालेला माणूस उभा होता. त्याच्या थरथरणाऱ्या तळव्यावर, तो लखलखता पिवळा हिरा होता. तो अवाक होऊन, राग प्रकट करत उभा होता.

“काय हे? हे कसे काय होम्स?”

‘फार वाईट, सर कॅन्टलमिअर, फार वाईट.” होम्स ओरडला. “ माझा जुना मित्र तुम्हाला सांगेल की मला व्यवहारी विनोद करायची सवय आहे आणि एखादी नाटकी परिस्थिती, मी कधीच टाळू शकत नाही. मी तेवढे स्वातंत्र्य घेतो. — मोठे स्वातंत्र्य! मी कबूल करतो की आपला वार्तालाप सुरु होतानाच, मी तुमच्या खिशात तो हिरा टाकला.”

त्या वयस्क माणसाने हिऱ्याकडून त्या हसऱ्या चेहऱ्याच्या माणसाकडे, नजर वळवली.

"सर, मी गोंधळून गेलो आहे. पण — हो. — हा खराच हिरा — मॅझरीन हिरा आहे. मिस्टर होम्स, तुम्ही म्हटल्याप्रमाणे तुमचा विनोदी स्वभाव थोडा नकोसा वाटला व त्याचे प्रगट होणे जरा अवेळी होते, तरी शेवटी आम्ही तुमचे ऋणी आहोत. तुमच्या व्यवसायिक कारकीर्दीच्या आश्चर्यकारक यशाविषयी संशय व्यक्त केल्याचे माझे वक्तव्य, मी मागे घेतो. पण कसे काय — "

"ही केस अजून अर्धीच संपलेली आहे. त्याचे सर्व बारीकसारीक स्पष्टीकरण आपण नंतर करू. उमराव कॅन्टलमिअर, आता परत गेल्यावर तुमच्या उच्चपदस्थ वर्तुळात, या यशस्विततेची वाखाणणी करण्याचा आनंद तुम्ही घ्याल, तेव्हा मी केलेल्या छोट्याश्या विनोदी गमतीचे परिमार्जन होईल. बिली, उमरावाना बाहेर घेऊन जा व मिसेस हडसनना सांग, की त्यांनी आपल्या दोघांसाठी जेवण पाठवले, तर मला आनंद होईल."

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची बारा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत
अध्यक्ष
ई साहित्य प्रतिष्ठान